

# कोकण दिनांक



संपादक
अभिजित हेगशेट्ये

दिवाळी अंक २०२४
मूल्य रु. २००/-


Siddhivinayak CONSTRUCTIONS
Ratnagiri
Prop. Deepak Yashwant Salvi.
Proud Member Of
CREDAI
RATNAGIRI
HAPPY
DIWALI
BLUEMONT
P52800051050
Opp. Collector Office Jaystambh, Ratnagiri
SAIDEEP
P52800046852
Narhar Vasahat, Shivaji Nagar, Ratnagiri
Laxmikeshav
PHASE II Nagar
P52800017021
Opp. D Mart, Behind Homeguard Office, Ratnagiri
OCEAN
INFINITY
P52800023055
Opp. Fisheries College, Shirgaon, Ratnagiri
8010747319 / 9021170223
OFFICE : NILDEEP COMPLEX, 1ST FLOOR,
AROGYA MANDIR, RATNAGIRI 415639


हिंद सायकल ट्रेडिंग कं.
HIND CYCLES
The Family Store for Multi Branded Bicycles & Tricycles
9921788605
शिवाजी नगर, रत्नागिरी.
(02352) 270242
HINDCYCLE
INDIA'S MOST RELIABLE & AFFORDABLE E-CYCLE BRAND
बजाज फायनान्स उपलब्ध आहे
SALES & SERVICE OF ALL TYPES GEAR & NON GEAR BICYCLES
Authorised Dealers
FIREFOX
COSMIC
montra
91 NINETY ONE
HERO CYCLES
LECTRO E-CYCLES
HERCULES
KROSS
RALEIGH
BSA


P52800052311
THE WOODLAND
LUXURIES LIVING
GREAT DIWALI OFFER
रत्नागिरीतील सर्वात पहिला 12 मजली लक्झरियस टॉवर..
1, 2 & 3 BHK
SHIVAJI NAGAR
For Booking
9011086861 to 7, 9325903003
ARIHANT GROUP
SIDDHIVINAYAK REALTY
Office : 1st Floor, Siddhivinayak Community Centre, Shiddhivinayak Nagar, Shivaji Nagar, Ratnagiri - 415612
Site: Ratnagiri-Kolhapur Highway, Shivaji Nagar, Ratnagiri - 415612
Tel. No. (02352) 223052, 223952, 9011086861 to 7


लक्ष लक्ष दिव्यांनी उजळून निघो ही दिशा,
घेऊन येवो नवी उमेद नवी आशा.
दिवाळीच्या
सर्वांना प्रकाशमय
शुभेच्छा...!
P. N. LAD
CREDAI
RATNAGIRI
MahaRERA :
P52800046838
2 BHK & 3 BHK Sea View Flats Available.
मिनी
टाऊनशिप
Concept & Design By Nandai Digital Marketing 7020370486
Amenities For A Wing
• Conceiled Wiring
• Gypsum Fall Ceiling
• L Shape Kitchen Otta With Modular Kitchen Trolley
• Jaguar Plumbing Fitting
• CCTV Camera In Building Lobby (Ground Floor)
• Video Door System
• Steel Railing With Tuffen Glass - Balcony / Terrace
1RK, 1BHK, 2BHK, 3BHK Flats
Twin Bunglow & Individual Bunglow
पी. एन्. लाड कन्स्ट्रक्शन
बी-१, वेदांग पॅराडाइज, थिबापॅलेस रोड, रत्नागिरी.
८२०८७८७०५४/९०११९८४२००
लक्ष्मीकेशव नगर
साईट : निसर्ग हॉटेल समोर, कुर्ली फाटा,
कसोप, रत्नागिरी.


शुभ
दीपावली
बांधकामासाठी लागणारे सर्व साहित्य एकाच छताखली मिळण्याचं खात्रीशीर ठिकाण.
मलुष्टे
प्लंबींग अँड सिरॅमिक्स
MALUSHTE'S
7719 043 444 / 7038 075 444
प्रवीण ट्रेडर्स
म्हणजेच बांधकामाचा मजबूत पाया
pravintradersratnagiri@rediffmail.com
E/99, M.I.D.C. Mirjole, Near D-mart, Ratnagiri. (02352) 228188, 230444. M.: +91 9422430850



# कोकण दिनांक

## दिवाळी २०२४

वर्ष : सत्ताविसावे

संपादक : अभिजित हेगशेट्ये

व्यवस्थापक : सीमा हेगशेट्ये

कार्यकारी संपादक : कोमल कुलकर्णी-कळंबटे

जाहिरात प्रमुख : उन्मेश रोडे

अक्षरजुळवणी : सायली ग्राफिक्स

छपाई : शिव इंप्रेशन, कोल्हापूर


कार्यालय : कोकण दिनांक, डी २३, जावकर प्लाझा, जयस्तंभ रत्नागिरी

मोबाईल : ९९६०२१८५५९, ९४२२०५२३१४

konkandinank@gmail.com






# मनोगत

गेली २७ वर्षे अखंडितपणे दिवाळी अंकाची परंपरा सुरू ठेवणाऱ्या कोंकण दिनांकचा दिवाळी अंक यंदाही वाचकांसाठी साहित्यिक फराळाची मेजवानी घेऊन सज्ज झाला आहे. कोकणच्या विशिष्ट भौगोलिक रचनेमुळे रेल्वे कोकणात आणणे हे काम बोलण्याइतके कृतीत उतरवणे नक्कीच सोप्पे नव्हते. मात्र माजी खासदार प्रा. मधु दंडवते यांची इच्छाशक्ती आणि कोकण रेल्वेतील अभियंत्यांची कल्पकता यांच्यामुळे ही अशक्यप्राय गोष्ट सत्यात उतरली आणि डोंगर-दऱ्या फोडून, खोदून रेल्वे कोकणात धावली. यात या अभियंत्यांचे विशेष कौतुक होते. कोकण रेल्वेच्या अभियंत्यांची ही गौरवशाली परंपरा पुढे नेतानाच 'केवळ अशक्य' वाटणाऱ्या चिनाब नदीवरील पूलही या अभियंत्यांनी साकारला आणि पुन्हा एकदा अशक्यप्राय वाटणारी गोष्ट सत्यात आली. कोकण रेल्वेच्या अभियंत्यांच्या कामाचा गौरव करणारा चिनाबवरील विशेष लेख हे अंकाचे वैशिष्ट्य असणार आहे. त्याचप्रमाणे कातळशिल्पांवर गेली २४ वर्षे काम करणारे सिंधुदुर्गचे सतीश लळीत यांचा कोकणातील कातळशिल्पांचे महत्त्व अधिरेखीत करणारा लेख, निसर्गाच्या दुष्टचक्रात अडकलेला हापूस आंबा आणि बागायतदार यांची व्यथा मांडणारा लेख, आपल्या छंदातून पक्ष्यांचे भावविश्व उलगडणारे पक्षी निरीक्षक तेजा मुळ्ये यांचे अनुभव, कोकण अभ्यासक ॲड. विलास पाटणे यांचा लेख, दिवंगत साहित्यिक प्र. ल. मयेकर यांच्यावरील अशोक लोटणकर यांचा लेख, रत्नागिरीतील ज्येष्ठ साहित्यिक अनिल दांडेकर यांची कथा, संगीता अरबुने आणि मान्यवर कवितांचा सहभाग असलेले काव्य दालन, प्रा. प्रकाश नाईक यांची कथा, डॉ. सुहास वासावे यांचा समाजमाध्यमांचा वापरावरील लेख अशा दर्जेदार अनेक मान्यवरांच्या कथा, लेख, कविता यांचा यामध्ये समावेश आहे.

कोकण दिनांक दिवाळी अंकासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व लेखक, कवी, साहित्यिक, जाहिरातदार, वाचक, प्रिंट आणि डिजीटल मिडियातील सर्व सहकारी यांना दीपावलीच्या हार्दिक शुभकामना! ही दीपावली आणि नवे वर्ष आपणाला आरोग्य संपन्न आणि सुखकारक जावो या शुभेच्छा!

# अंतरंग

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ''चिनाब पुल'' अभियांत्रिकी चमत्काराचा अदभूत साक्षात्कार | अभिजित हेगशेट्ये | ७ |
| कातळशिल्पे हा अश्मयुगाशी दुवा | सतीश लळीत | १२ |
| विकासाच्या नकाशावरील कोकणचे स्थान निश्चित करा | ॲड. विलास पाटणे | १७ |
| दिवंगत साहित्यिक, बेस्ट नाटककार : प्र. ल. मयेकर | अशोक लोटणकर | २० |
| 'स्पर्श' | अनिल दांडेकर | २३ |
| कविता विभाग<br>संगीता अरबुने, ज्योती कपिले, प्रिया कालिका बापट,<br>अनुराधा नेरुरकर, एकनाथ आव्हाड, कीर्ती पाटसकर,<br>डॉ. सुरेखा धनावडे, सुदेश मालवणकर, माधुरी मरकड,<br>शशिकांत हिंगोणेकर, जान्हवी जोशी, डॉ. सखाराम डाखोरे,<br>सतीश लोथे. | | २९<br>ते<br>३७ |
| जयंती | प्रा. प्रकाश नाईक | ३९ |
| रत्नागिरीत हवे सुसज्ज मार्केटयार्ड | कोमल कुळकर्णी-कळंबटे | ४४ |
| बर्ड अँड वाईल्ड फोटोग्राफी : छंदपूर्ती | तेजा मुळ्ये | ४६ |
| नवनिर्माण संस्था वाटचाल अनवाणी ते समृध्दी.... | अभिजित हेगशेट्ये | ४९ |
| 'वाशिष्ठी डेअरी'ची यशस्वी वाटचाल! | | ५५ |
| Social Media - समाज माध्यमांचा वापर करताना | डॉ. सुहास वासावे | ५८ |

# ''चिनाब पुल''

## अभियांत्रिकी चमत्काराचा अदभूत साक्षात्कार



अभिजित हेगशेट्ये

**अंजी ब्रीज हे रेल्वे मार्गाच्या बांधकाम क्षेत्रातील नाविन्यपुर्ण संशोधन आहे. (asymmetrical) प्रमाणबध्द नसलेले डिझाईन या प्रकारात ते येते, दोन्ही किनाऱ्याला आवश्यक जागा नसल्याने नदीच्या मध्यभागी ४० मिटर खोल मायक्रोपीलर आणि २० मिटर हायब्रिड वॉल असे त्याचे फाऊंडेशन उभारले आहे. नदीच्या पातळी पासून ३३१ मिटर उंचीचा हा एकखांबी मनोरा गगनाला गवसणी घालतांना या संपूर्ण पुलाचा आणि रेल्वे मार्गाचा भार पेलत आहे. या उंच मनोऱ्याच्या दोनही बाजूला ९६ केबल आहेत. ८२ मीटर पासून २९५ मिटर लांबीच्या केबलनी हा पुर्ण ब्रिज या मध्यवर्ती खांबाने तोलून धरला आहे. काश्मिरच्या अंजी नदिवरील दोन्ही उंच डोंगरकड्याच्यामधील हा केबल पुल म्हणजे कश्मिरी ऐतिहासीक परंपरेच्या राजतरंगिणी् राजपरंपरेची कथाच ही विणाधारी कश्मिरीयत कथन करत आहे. काश्मरीच्या निसर्गसुंदरतेतील हा सौदर्याचा लखलखता आविष्कर म्हणजे नंदनवनाच्या मुकुटातील कश्मिर कोहीनुरच !**

भारतीय परंपरा आणि संस्कृतीत फार मोठे योगदान असणारा आणि देशाचे नंदनवन म्हणून मानला जाणारा अदभूत निसर्ग सौदर्याचा खजाना असे काश्मिर खोरे देशाशी जोडणारा चिनाब नदीवरील चिनाब ब्रिज हा जगातील सर्वाधिक उंचीचा रेल्वे ब्रिज आहे. अत्यतं अवघड आणि अशाश्वत हिमालयन जिऑलॉजी, भूकंपप्रवण क्षेत्र, हाडे गोठवणारी थंडी आणि दोनशे किलोमीटर वेगाने वहाणारे वादळी वारे, अवचीत होणारी ढगफूटी आणि समोर दिसणारे पाकिस्तानचे डोंगर कधीही अतिरेक्यांचा गोळीबार आणि आक्रमणाला सामोरे जाण्याची धोकादायक स्थिती या परिस्थितीवर अद्ययावत तंज्ञान आणि अभियंत्यांची दुर्दम्य इच्छाशक्तीच्या सहाय्याने

उभारलेला चिनाब ब्रिज हा फक्त सर्वोच्च जागतिक उंची मोजणारा मापदंडच नाही तर संपुर्ण भारत देशाला काश्मिरच्या खोऱ्याशी तेथील जनतेशी, मना मनांशी जोडणारा देशातील आणि जगातील एक अदभूत दुवा आहे. हे जोडण्याचे कामात कोकण रेल्वे कार्पोरेशनच्या संपुर्ण टीमचे योगदान अधिक महत्वाचे आहे.

ब्रिटीश राजवटीत देशात रेल्वे प्रकल्प आले. मात्र अत्यंत अवघड आणि प्रचंड धोकादायक नैसर्गिक रचना असल्याने कोंकण आणि काश्मीर हे प्रमुख दोन झोन रेल्वेने विचारात घेतले नव्हते. त्यापैकी कोकण रेल्वे प्रकल्प केंद्रिय रेल्वेमंत्री प्रा. मधु दंडवते यांच्या पुढाकाराने सुरु झाला. चेअरमन इ श्रीधरन यांच्या नेतृत्वाने त्याला अद्ययावत तंत्रज्ञान आणि व्यवस्थापकीय गतीमानता दिली



आणि काऊंट डाऊन पध्दतीने हा प्रकल्प एक एक टप्पे करत पुर्ण झाला. यातूनच जम्मू ते श्रीनगर हा काश्मिर रेल्वे प्रकल्प होऊ शकतो हा विश्वास दुणावला. १९९६ मध्ये पंतप्रधान नरसिंहराव यांच्या काळात जम्मु ते बारामुल्ला या ३३८ किमीच्या रेल्वे प्रकल्पाला मान्यता मिळाली आणि २००२ मध्ये पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात हा राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करण्यात आला व १५ ऑगस्ट २००७ पर्यंत हा प्रकल्प पुर्ण करण्याची टाइमलाईन देण्यात आली. श्रीधरन कमिटीच्या अध्यक्षतेखाली काश्मिर रेल्वे प्रकल्पाचे आरेखन आयोजन सुरु झाले. सुरवातीला इरकॅानने या प्रकल्पाचे आरेखन सुरु केले. यांतील उधमपुर ते बारामुल्ला ह्या प्रकल्पाने वेग घेतला मात्र कटरा ते बनीहाल हा मार्ग काश्मीरची डोंगर दर्यामधील घसरणारी माती, सुटे दगड मातीचे अस्थिर दगड यामुळे येथून मार्ग निघूच शकणार नाही असा निष्कर्ष २००८ साली काढण्यात आला. कटरा ते क्राझीगंझ हा मार्ग रद्द करण्याचा निर्णय मंत्रीमंडळाने घेतला. याचे कारण होते, या भागातील (जॉईंटेड रॅाक सॉइल) एकसंघ नसणारा दगड, यामुळे येथे तयार केलेले टनेल हे आतल्या बाजूने आणि बाहेरील बाजूने केंव्हाही कोसळण्याचा धोका असतो. तसेच येथील मरी फॉर्मेशन आणि डोलामाईट फार्मेशन असणारा भूभाग यामुळे येथे कोणत्याही प्रकारे रेल्वे प्रकल्प होऊच शकणार नाही असा निष्कर्षाप्रत रेल्वे बोर्ड आले. पुन्हा नव्याने सर्वे करण्याचा निर्णय घेण्यात आला. काश्मिर रेल्वे प्रकल्पाचे एकुण तीन वेग वेगळे पातळीवर रेल्वेलाईन सर्वे करण्यात आले आहेत. त्यापैकी सुरुवातीला नॉर्दर्न रेल्वेने केलेल्या काही सर्वे आणि कामावर जवळपास १००० कोटी रुपये खर्चही झाले होते. त्यातील १०० –१०० मिटर बोगदे खोदकाम करुन सोडून द्यावे लागले होते. यांतील सर्वात आवाहन होते ते अत्यंत खोल आणि विशाल असणारी चिनाब रेल्वे पार करत काश्मिर रेल्वेचा मार्ग पुढे नेणे, खऱ्या अर्थाने हे फार मोठे आवाहन होते. आणि हे आवाहन स्विकारण्याचे आणि पेलवण्याचे शिवधनुष्य कोकण रेल्वे कार्पोरेशनच्या अभियंत्यानी व सार्या टीमनेच पेलले म्हणूनच आज कश्मिर रेल्वे चिनाब नदी पार करत श्रीनगरपर्यंत पोहोचू शकत आहे.

भारतीय परंपरेचा हजारो वर्षाचा वारसा सांगणारी चिनाब नदी हिमाचलप्रदेश, जम्मु काश्मिरमधून पाकिस्तानात १९७४ कि. मी. लांबीचा प्रवास करणारी महत्वाची नदी आहे. हिमालयातील चंद्र आणि भागा या दोन प्रवाहांच्या मिलनातून तयार झालेली (चंद्रभागा) चिनाब नदी पाकिस्तानी मैदानी प्रदेशात सिंधु नदी होते. किश्तवार, डोडा, रामबन, रियासी जिल्ह्यातील चिनाब नदीचा प्रवास हा अत्यंत खोल दर्या–खोर्यातून होतो. त्यातील रियासी जिल्ह्यातील बक्कल, कौरी या भागातून चिनाब नदी जातांना अती खोल दरीतून वहात रहाते. येथील डोंगर हे अत्यंत छोट्या दगडांच्या मातीच्या भरावाचेच आहेत. हे डोंगर कडे अनेकवेळा ढगफुटीच्या पावसात कोसळतात आणि डोंगराचा काही भाग नष्ट होण्याच्या घटना घडतात. येथील हवामान ही असमतोल आहे. उन्हाळ्यात ३०–३५ डीग्री तापमान तर थंडीच्या दिवसात उणे २० सेल्सीअस तपमान, या खोऱ्यात प्रचंड वेगाने वाहणारे वारे साराच निसर्ग क्षणाक्षणाला आपले रुप बदलणारा, या डोंगरातून रेल्वेचा मार्ग नेतांना टनेल आणि ब्रिज हाच पर्याय त्यामुळे येथील मार्ग उभारणे हे एक फार मोठे आवाहन होते. चिनाब नदी पार करणे हे रेल्वे तंत्रज्ञांसमोरचे आवाहन होते. जोपर्यंत चिनाब पार करत नाही तोपर्यंत कटरा ते श्रीनगर रेल्वे धावू शकत नाही आणि काश्मिर देशाच्या रेल्वे मार्गाशी जोडला जाऊ शकत नाही ही वास्तवता होती. यामुळेच चिनाब नदीवरील ब्रीज आणि अंजी नदीवरील रेल्वेचा पहिला रोप ब्रिज हे काश्मिरातील नैसर्गिक तुफानाला आव्हान देत नव्या तंत्रज्ञानाच्या विस्मयचीत करणाऱ्या संशोधनाने उभारले वास्तव आहे.

चिनाब नदीवरील बक्कल आणि कौरी या दोन डोंगरांना जोडणारा रेल्वे पुलावर उभे राहील्यावर जणू आपण परग्रहावरील एका अनोख्या स्वर्गीय ठिकाणी असल्याचा आभास होतो. जवळपास

समुद्रसपाटीपासून १५००० फुट उंचावर अत्यंत नाजूक दिसणाऱ्या या लोखंडी रेल्वे पुलावर उभे असतांना समोरच्या उंचच उंच डोंगर आकाशाला गवसणी घालणारे त्या हिरव्या गर्द झाडीतून सुर्य किरणांच्या प्रकाशाने चमकणारी छोटी छोटी पत्र्याची छत असणारी घरे, डोंगराच्या कपारीत रोखून पहिल्यास दिसणाऱ्या मुलायम, तलम, रेशमी लोकरीने आच्छादीलेल्या पश्मीन बकऱ्यांचे थवे आणि त्यांना सांभाळणारे बकरवाल. चारही बाजूंनी डोंगर कड्यानी व्यापलेला हा भू प्रदेश काश्मिरातील न पाहील्या गेलेल्या अनवट सौदर्यांचा आविष्कार देत रहातो. आपली नजर खाली जाण्यास धजावत नाही इतकी खोल खोल खोली.जणू पाताळाच्या गुहेचा शोध घेणारी!! त्या प्रचंड खोलीवर दिसतो पाण्याचा अखंड प्रवाह काही शेकडो किलोमीटर वाहत जाणारा निळेशार हिरवे चमकते पाणी हिच ती चिनाब नदी सोबतचे माझे सहकारी अंगुली निर्देश करत दाखवत रहातात.

कोकण रेल्वेतील ज्येष्ठ पदाधिकारी रमेश तांबे यांच्यामुळेच या चिनाब ब्रिजवर सीआरपींच्या बंदूकधारी बंदोबस्तातून प्रवेश मिळाला होता. आम्ही कौरी स्टेशनच्या बाजूने (श्रीनगर बाजूने) या रेल्वे ब्रिजवर आलो होतो. कलात्मक पध्दतीने लोखंडी कमानींचा हा रेल्वे ब्रिज म्हणजे अत्यंत सुबक कारागिरीच वाटत होती. खाली खोल चिनाब नदी हजारो वर्षांच्या भारतीय संस्कृतीचा, परंपरांचा वारसा जपत वहात आहे. या नदीवरील दोन उंच डोंगराना जोडणारा हा पुल मानवाच्या अदभूत अभियांत्रिकी कलात्कतेचा एक अनोखा नमुना!! समोरील खोली ही भोवळ आणणारी. समोरील अंतर हे देखील तसेच अफाट अवकाशाला गवसणी घालणारे आणि या दोन डोंगरांना अशक्य ते शक्य करत जोडणारा पुल किती कलात्मक जणू नाजूक खेळणे वाटावा इतका सुरेख, रेखीव, कातीव, ओतीव. या कल्पकतेची आणि या कलात्मक उभारणीची कमाल वाटत होती. जणू कोणी अफाट अचाट शक्तीनेच हे शिल्प साकारल्याचा आभास होत होता. डोळे दिपून गेले होते. भर भरुन आले होते. अगदी या शिल्पाला दाद देण्यासाठी मन गहीवरुन आले होते. देशाभिमान, देश प्रेम आणि देशभक्तीचा एक ओतप्रोत आविष्कार समोर छान पणे उभा होता. आणि त्याची नजाकत तर भन्नाटच होती. तुफानी वार्याला आणि वार्याच्या वेगाने जाणाऱ्या रेल्वेला अलगद फुलासारखे झेलतांना आतील पॅसेंजरच्या पाण्याचा ग्लासही हलणार नाही याची काळजी घेणारे.

चिनाब पुल आयफेल टॉवरपेक्षा ३५ मिटर म्हणजे १०० फुट उंच आहे सांगितले तेंव्हा मी पुन्हा डोकावून पाहू लागलो. आयफेल टॉवर पॅरीसला पाहिला होता. एका रुंद पठारावर लोखंडी विविध कमानी करत सुळका होत उंचच उंच जाणारा तो टॉवर त्याच्या विशालता आकाशाकडे नजर करुन पहातांना समोंहीत करुन जाते. त्यावर काही मजले चढून जात त्यांच्या उंचीचा आवाका पहाण्याचा आनंदही लूटला होता. जागतिक आश्चर्य असणारा आयफेल टॉवर पेक्षा १०० फुट अधिक उंचावर रेल्वे ट्रकच्या डेकवर मी उभा आहे हे वास्तवच अंगावर रोमांच उभारणारे होते. माझ्या नसा नसा जणू अनवट आनंदाने आणि अभिमानाने उसळून येत होत्या. आयफेल टॉवर तर त्रीशंकु पिलर होता. प्रचंड रुंद पाया आणि वर निमुळता होत जाणारा, एक लोखंडी सांगाडा. मात्र हा रेल्वे ब्रिज म्हणजे एक लोखंडी कमान एकाला एक जोडत या डोंगरापासून त्या डोगंराला जोडणारी अत्यंत नाजूक आणि तितकीच पोलादी क्षमतेची २५० किलोमीटरच्या वाऱ्याला छातीडावर झेलतांना, वेगवान रेल्वे अलगद पार करणारी. देशाला थेट काश्मीरला जोडत सलोख्याचा प्रदेश जोडणारी. या तांत्रिक कौशल्याबलची उत्सूकता अधिकच उल्हासित करणारी होती. येथे मी ज्या उंचीवर होतो तेथून मी पाहिलेला आयफेल टॉवर फारच खूजा वाटत होता. जागतिक आश्चर्याचे साक्षात शिल्पावर मी उभा रहात आकाशाला स्पर्ष करत होतो.

ह्या पुलाच्या लोखंडी कमानी हवेतच एक मेकाला जोडल्या गेल्या हे फारच आश्चर्य कारक आणि अविश्वसनीय वाटत होते. रेल्वे अधिकारी रमेश तांबे सांगत होते, हा लोखंडी कमानीचा ब्रिजची मुख्य सलग कमान आहे ती ४६९ मिटरची आहे. बक्कल डोंगर ते कौरी अशी थेट चिनाब नदी पार करत दोन बेटमेंटना जोडणारी. ही



कमान त्याचे वेगवेगळे भाग एकमेकांला जोडत पुढे नेली आहे. या गोल्डन जॉइंटचे उदघाटन १६ ागस्ट २०२२ रोजी करण्यात आले. ही हवेतील जोडणीचे तंत्रज्ञान फार आश्चर्यकारक आहे.

या वेळी ब्रिज डीझाईन आणि अम्मल बजावणी यांत गेली अनेक वर्ष कोकण रेल्वे काश्मिर प्रकल्पात काम करणारे वरीष्ठ अधिकारी रश्मी राजन मलीक यांची भेट झाली. त्यांनी या प्रकल्पा बाबत अधिक विस्ताराने तांत्रिक माहिती फार सोप्या भाषेत सांगितली. चिनाब नदीवर ब्रिज होणारच नाही या निर्णयाप्रत रेल्वे कार्पोरेशन आले असतांना, दुसरा पर्यायच नाही अशी एक वेळ आली आणि तेथून विविध पर्यायांचा आणि जागतिक पातळीवर असणार्या विकसीत तंत्रज्ञानाचा शोध सुरु झाला. डीझायनर्स नी

अनेक पर्यायी डीझाइन काढली, पण त्याची सस्टेनेबिलिटी हा प्रश्न महत्वाचा होता. कोकण रेल्वे प्रकल्पात काम केले असल्याने पावसाच्या पाण्यात विरघळणारी माती आणि डोंगराला तडे जाऊन सरकणारे पाईल्स आणि बेटमेंट यांचा दरडी कोसळणारा भीषण अनुभव निवसर येथे यां अधिकार्यांच्या सोबत होता. त्यावर केलेल्या उपाय योजनांचा फायदा काश्मीरमध्ये त्यांना होत होता. कोणताही ब्रिज उभारतांना त्याचे इरेक्शन कसे करणार यावर त्याचे डीझाइन करावे लागेल. हा मुलभूत विचार त्यांनी यावेळी सांगितला. चिनाब ब्रिज बाबत अनेक डीझाईन पुर्वी झाली होती. मात्र येथील जमिनीचा असणारा ढाचा आणि चिनाबची असणारी खोली यामुळे येथे नियमीत असणारे ब्रिज डीझाईन कामी येणारे नव्हते. यासाठी आर्च डीझाईनचा फॉर्मुला निवडण्यात आला. ही आर्च कमानी अत्यंत हेवी लोखंडाच्या एकमेकाला जोडण्यासाठी पुलाच्या डेकपेक्षा उंच १२७ मीटर उंचीची केबल क्रेन उभारण्यात आली. देशातील हा रेल्वे प्रकल्पातील पहिला प्रयोग होता. पुलाच्या




दोन बाजूला हे उंच केबल टॉवर पुर्णतः स्वयंचलीत कार्य करणारे . या माध्यमातून या कमांनीची उभारणी अगदी लिलया करण्यात आली. हे अजस्त्र वजन उचलणाऱ्या केबल अनेक वेळा नजरेला दिसत नाहीत आणि प्रश्न पडतो इतक्या वजनशीर अजस्त्र कमानी मानवी हात न लागता क्रेन नसतांना अलगद आपल्या जाग्यावर फीट कशा केल्या जातात. तेही काश्मिरच्या हिमालयन व्हॅलीमध्ये!

पुलावरील रुळही वेगळ्या तंत्रज्ञानाचे कॉंक्रीटवर फीट केले आहेत मात्र १०० किमीटर वेगाने यावरुन ट्रेन गेली तरी त्याचे सस्पेंशन नजाणवणारे, पुलावरील संपुर्ण रेल्वे ट्रकवर एक विशिष्ठ प्लेटचे आवरण आहे. बॉम्ब डीफ्यूजर सिस्टिम येथे बसविण्यात आली आहे. या रेल्वे ब्रिजवरुन दिसणारा पाकिस्तानच्या डोंगराचा भाग दाखवत तांबे यांनी सांगितले, येथे अतिरेकी हल्याचा धोका लक्षात घेऊन हा ब्रिजवर विशिष्ठ प्लेटस बसविल्या आहेत ज्यामुळे येथे बॉम्ब पडल्यास तो हवेतच निकामी (डिफ्यूज) होईल.

चिनाब ब्रिज उभारणी करतांना मुख्य अडचणी होत्या त्या येथील ८ रीक्टर स्केल भूकंपप्रवण क्षेत्र आणि २०० ते २६० किलोमीटर वार्याचा असणारा वेग तसेच हिवाळ्यात उणे २० डीग्री तपमान यांवर टिकून रहाणारे, हे डीझाईन करतांना नार्वे बेस्ड अद्ययावत संशोधित टेक्नॉलॉजीचा उपयोग येथे करण्यात आला आहे. स्पेशल क्वालिटी स्टीलचा वापर आहे. येथील बेटमेंट जी कमानीचा पाया आहे, तिची उभारणी अत्यंत मजबूत केली आहे. ब्रिजच्या पायाकडे गेल्यास या पायाच्या भव्यतेची कल्पना येते. महा अजस्त्र बेटमेंट हा सारा डोलारा आपल्या खांद्यावर घेऊन उभे आहेत. तंत्रज्ञांनी या ब्रिजची गॅरेंटी तब्बल १२० वर्षांची दिली आहे.

या ब्रिजचे आणखी एक वैशिष्ठ्य मानले जाते ते (Transitiocurve with changing radius construction) कंपोझीट कॉलम सिस्टीम संमिश्र स्तंभ स्ट्रक्चरल स्टील आणि स्ट्रक्चरल कॉंक्रीट याचा वापर यांत प्रथमच करण्यात आला आहे त्याचा परिणाम अधिक मजबूत आणि अधिक टिकावू व  आर्थिक दृष्ट्या किफायतशीर मानले जाते. विविध अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर याची प्रयोगशाळा म्हणून या प्रकल्पाकडे पहाता येईल, ानलाईन मॉनीटरींग , टो कंट्रोलींग या अत्यंत अद्यावत सिस्टीम येथे आहेत. पुलाचा डेक बदलत्या त्रिज्यांसह संक्रमण वर स्थित आहे. म्हणून ग्रेडीच्या संरेखनातील बदलानंतर टप्या टप्याने बांधकाम केले गेले. संक्रमण वळणावर वाढीव पध्दतीने पुल बांधण्याचा हा पहिलाच प्रयोग आहे। ईकॉम (ECOM) या जगातील पायाभूत सुविधा आणि संशोधनात काम करणाऱ्या कंपनीने हे काम केले आहे.

चिनाब ब्रिजपासून जवळच असणारा कटरा येथील अंजी नदीवरील वायररोप केबल स्टेड ब्रिज हे रेल्वेच्या इतिहासातील आणि कश्मिर रेल्वे प्रकल्पातील एक महत्वपुर्ण वैशिष्ठ्य आहे. हा प्रकल्पही कोकण रेल्वे कार्पोरेशनच करत आहे. चिनाब नदीची उप नदी ''अंजी'' वैष्णोदेवी मंदिराच्या पायथ्यापासून वहाणारी, दोन प्रचंड उंच डोंगरांच्या मध्ये रेल्वे मार्ग जोडतांना हा ब्रिज उभारणे हे अद्ययावत तंत्रज्ञानासमोरील मोठे आव्हान होते. याचे कारण होते, काश्मीर खोऱ्यातील तिव्र उताराचे डोंगर आणि खोल दरी यांत कटरा आणि रियासी यांना जोडणारा हा पुल सुरुवातीला चिनाब प्रमाणेच लोखंडी कमानीचा ब्रिज करावा असे ठरत होते. मात्र या कमानीचा पाया बेटमेंट साठी आवश्यक जागाच या नदिच्या किनारी मिळत नव्हती. किमान २४० मिटर जागा पाहिजे होती, प्रत्यक्षात दोन्ही बाजूने टनेल डोंगरातच संपत होते. अखेर येथे  पुलाचे इरेक्शन उभारणी कशी करावी यावर त्याचे वेगळ्या डिझाइनचा विचार झाला आणि भारतीय रेल्वेतील पहिला केबल स्टेड ब्रिज येथे उभारण्याचे ठरले. १५५२ फुट लांबीचा आणि ९५० फूट उंचीचा हा एका खांबावर असणारा अत्यंत दिमाखदार आकर्षक आणि अतिव सुंदर असा ब्रिजने कश्मिर रेल्वे प्रकल्पाला अद्ययावतेचा आणि अभिजात सौंदर्याचा नवा आयाम दिला आहे. केबल स्टेड पुलाचे तंत्रज्ञान १९ व्या शतकातील आहे. न्यूयार्कच्या ब्रुकलिन ब्रिजचे आजही पर्यटनात

आकर्षण आहे. कोकण रेल्वे कार्पोरेशनने काश्मिर रेल्वे प्रकल्पात देशात पहिल्यादाच स्टेड ब्रिज रेल्वे टेक्नॉलॉजीचा उपयोग केला.

अंजी ब्रीज हे रेल्वे मार्गाच्या बांधकाम क्षेत्रातील नाविन्यपुर्ण संशोधन आहे. (asymmetrical) प्रमाणबध्द नसलेले डिझाईन या प्रकारात ते येते, दोन्ही किनाऱ्याला आवश्यक जागा नसल्याने नदीच्या मध्यभागी ४० मिटर खोल मायक्रोपीलर आणि २० मिटर हायब्रिड वॉल असे त्याचे फाऊंडेशन उभारले आहे. नदीच्या पातळी पासून ३३१ मिटर उंचीचा हा एकखांबी मनोरा गगनाला गवसणी घालतांना या संपुर्ण पुलाचा आणि रेल्वे मार्गाचा भार पेलत आहे. या उंच मनोऱ्याच्या दोनही



बाजूला ९६ केबल आहेत. ८२ मिटर पासून २९५ मिटर लांबीच्या केबलनी हा पुर्ण ब्रिज या मध्यवर्ती खांबाने तोलून धरला आहे. काश्मिरच्या अंजी नदिवरील दोन्ही उंच डोंगरकड्याच्या मधील हा केबल पुल म्हणजे कश्मिरी ऐतिहासीक परंपरेच्या राजतरंगिणी



राजपरंपरेची कथाच ही विणाधारी कश्मिरीयत कथन करत आहे. काश्मरीच्या निसर्गसुंदरतेतील हा सौदर्याचा लखलखता आविष्कर म्हणजे नंदनवनाच्या मुकुटातील कश्मिर कोहीनुरच!

अंजी पुलावरुन पास होण्यासाठी कारचा मार्गही आहे. यांतून पुढे जाताच टी २ टनेल सुरु होतो. हा टनेल अद्ययावत संपर्क आणि प्रकाश यंत्रणेने सुसज्ज आहे. येथील टनेलचे वैशिष्ट्य असे की रेल्वे टनेल मार्गाला समांतर टनेल वाहन रस्ता मार्ग करण्यात आला आहे. यामुळे या ४-५ किलोमीटर बोगद्यात काही आपतकालीन परिस्थिती उदभवल्यास बाजूच्या टनेल मधून आवश्यक मदत रसद पुरविली जाते. या टनेलमधून आम्ही बाहेर पडलो आणि जाणवले आम्ही थेट वैशणवदेवी कटरा मंदिर डोंगराच्या गर्भातून थेट दुसर्या बाजूला,( मागील बाजूला) आलो होतो. तेथून थेट जिन्नस वाहतूक करणारी रोप क्रेन वैशणवदेवी मंदिरात जाते. हा सारा प्रवासच इतका अभियांत्रीकी चमत्कारांनी व्यापून गेला होता. कश्मिर रेल्वे म्हणजे अभियांत्रिकी चमत्काराचा एक अदभूत साक्षात्कार आहे. आणि यांतीत कोकण रेल्वेचा असणारा महत्वाचा आरएनडी मधील सहभाग हा काश्मिरच्या कोकण -महाराष्ट्र सहभागाचा एक शिलेदार आहे हे विशेष नोंद घ्यावी असे आहे.



# कातळशिल्पे हा अश्मयुगाशी दुवा

**सतीश लळीत**




**सद्याच्या कोंकण प्रदेशात आणि पश्चिम किनारपट्टी भागात प्राचीन काळी कोणती संस्कृती नांदत होती, याचे नगण्य पुरावे आढळतात. सुसरोंडी (गुहागर) आणि कोळोशी (कणकवली) या दोन अतिप्राचीन काळातील संदर्भांशिवाय पश्चिम किनारपट्टीवरील कोंकण प्रदेशात अश्मयुगात मानवी वस्ती असल्याचे कोणतेही पुरावे सापडलेले नव्हते. पण आता साधारणपणे मध्याश्मयुगाच्या शेवटच्या व नवाश्मयुगाच्या काळातील कातळशिल्पे सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सापडल्याने कोंकणातील मानवी अस्तित्वाच्या वाटचालीतील एक महत्वाचा दुवा सापडला आहे. यामुळे कोंकणातील मानवी अस्तित्वाबाबतच्या 'अज्ञाताच्या प्रांता'वर म्हणजे 'डार्क एज' प्रकाशाचा एक किरण पडला आहे, असे म्हणायला हरकत नाही.**

महाराष्ट्राच्या पुरातत्व जगतात गेली काही वर्षे 'कातळशिल्पे' हा शब्द सर्वाधिक चर्चेत आहे. हिवाळे येथील धनगरसड्यावरील कातळशिल्पांचा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पहिला शोध मी आणि माझे बंधु प्रा. डॉ. बाळकृष्ण लळीत अशा दोघांनी लावला, त्याला ६ मे २०२४ रोजी चौवीस वर्षे पूर्ण झाली. गेल्या चौवीस वर्षात सिंधुदुर्ग जिल्ह्यात हिवाळेनंतर कुडोपी, वानिवडे, असरोंडी, किर्लोस, खोटले, वाघोटणसह अनेक गावांमधील आणि रत्नागिरी जिल्ह्यातही अनेक गावातील कातळशिल्पे विशेषत: हौशी अभ्यासकांनी उजेडात आणली. अजुनही अनेक गावांमध्ये कातळशिल्पांचा शोध लागत आहे. गेली २४ वर्षे मी या विषयाचा ध्यास घेऊन सतत अभ्यास करीत आहे. नवनवीन कातळशिल्प ठिकाणांचा शोध लावत आहे. 'सिंधुदुर्गातील कातळशिल्पे' हे माझे या विषयावरचे पहिलेच पुस्तक प्रकाशित झाले आहे.

इसवी सनाच्या आधी दोनतीन शतकांपासून कोकणच्या अनेक बंदरांमधून रोमसोबत व्यापार होत असल्याचे पुरावे सापडले आहेत. सुसरोंडी गुहा (पालशेत, गुहागर) आणि कोळोशी गुहा (नांदगाव,

कणकवली) येथील उत्खननामध्ये कोंकणातील पुराश्मयुगकालीन मानवी वसाहतींचे प्राथमिक पुरावे सापडले आहेत. त्यानंतरच्या कालावधीत कोंकण प्रदेशात मानवी संस्कृतीच्या पातळीवर काय घडामोडी घडत होत्या, हे समजण्यास अजिबात वाव नाही. ही एक मोठी पोकळी आहे आणि तो अज्ञाताचा प्रांत (डार्क एज) आहे. परंतु, आता रत्नागिरी, सिंधुदुर्गातील कातळशिल्पांचा शोधामुळे या दिशेने एक पाऊल पुढे पडले आहे, असे म्हणायला हरकत नाही. या सर्वाचा एकात्मिक, तुलनात्मक व व्यापक अभ्यास पुरातत्वशास्त्रज्ञांनी केला तरच या अज्ञाताच्या प्रांतावर प्रकाश पडु शकेल.



मी २००१ सालापासून कातळशिल्पांचा अभ्यास करीत आहे. मे २००१ मध्ये मी व प्रा. डॉ. बाळकृष्ण लळीत यांनी हिवाळे (ता. मालवण) येथील धनगर सड्यावरील कातळशिल्पांचा शोध लावला. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कातळशिल्पांचा हा पहिला शोध होय. या नंतर २०१२ साली कुडोपी (ता. मालवण) येथील कातळशिल्पांचा सविस्तर अभ्यास केला. राष्ट्रीय स्तरावरील पुरातत्व परिषदांमध्ये याबाबतचे शोधनिबंध सादर केले आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातही अनेकजण यावर अभ्यास करीत आहेत. मी केलेला अभ्यासानुसार ही कातळशिल्पे अश्मयुगातील असून त्यातही नवाश्मयुगातील आहेत, असे मत मांडले. बदामी (कर्नाटक) येथील रॉक आर्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय रॉक आर्ट परिषदेत २०१२ मध्ये मी जेव्हा याबाबतचा शोधनिबंध सादर करुन याचा कालावधी इ.स.पू. सहा ते १० हजार वर्षे असा असण्याची शक्यता व्यक्त केली, तेव्हा उपस्थित अनेक पुरातत्वज्ञांनी याला दुजोरा दिला. याबाबतचा दुसरा शोधनिबंध मुंबई विद्यापीठात सादर केला, तेव्हाही माझ्या मताशी ज्येष्ठ पुरातत्वशास्त्रज्ञांनी सहमती दाखवली. ऑक्टोबर २०२३मध्ये जोधपूर (राजस्थान) येथील जय नारायण व्यास विद्यापीठात झालेल्या 'आर्किऑलॉजी ण्ड एपिग्राफी काँग्रेस' या राष्ट्रीय परिषदेतही मी कोकणातील कातळशिल्पांबाबत सविस्तर सादरीकरण करुन शोधनिबंध सादर केला. कोटा (राजस्थान) येथे झालेल्या रॉक आर्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या वार्षिक परिषदेत, तसेच निलंगा यंथील महाराष्ट्र महाविद्यालयात झालेल्या राष्ट्रीय परिषदेतही यासंदर्भातील नवे संशोधन मांडणारे शोधनिबंध सादर केले.

सन २००१ साली पुण्याच्या प्रसिद्ध डेक्कन पोस्ट ग्रॅज्युएट रिसर्च इन्स्टिट्यूटचे प्रा. डॉ. अशोक मराठे यांनी व त्यांच्या पथकाने रत्नागिरी जिल्ह्याच्या गुहागर तालुक्यातील सुसरोंडी-पालशेत (गुहागर)ची 'पुराश्मयुगकालीन गुहा' शोधून तिथे संशोधन केले. आदिमानवाचे हे वसतिस्थान किमान नव्वद हजार वर्षे जुने असावे, असा अंदाज आहे. दोन वर्षांपुर्वी राज्य शासनाच्या पुरातत्व विभागाने कोळोशी (कणकवली) येथील गुहेत उत्खनन केले. तेथे सापडलेल्या अश्मयुगीन दगडी हत्यारांचा अभ्यास करुन ती किमान पन्नास हजार वर्षापुर्वीची असावीत, असा प्राथमिक निष्कर्ष काढण्यात आला आहे. या अत्यंत महत्वपूर्ण शोधांमुळे कोंकणातील मानवी वसाहतींबाबत व पश्चिम किनारपट्टीवरील मानवी संस्कृतीचा एक धागा मिळाला आहे. आता कातळशिल्पांच्या शोधामुळे या साखळीतील पुढचा महत्वपूर्ण दुवा मिळाला आहे.

कोंकणातील मानवी संस्कृतीचा विकास आणि पुरातत्वशास्त्र यादृष्टीने ही कातळशिल्पे खुप महत्वाची आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सापडलेला कातळशिल्पांचा हा प्राचीन ठेवा जपणे, हे सर्वांचे कर्तव्य आहे. तथापि, याबाबत पुरेशी जनजागृती नाही. या कातळशिल्पांचे महत्व माहीत नसल्याने त्याकडे सर्वसामान्यांचे दुर्लक्ष होते. शासनस्तरावरही बरीच उदासिनता दिसते. अलिकडे मात्र चित्र बदलताना दिसते आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील कातळशिल्पांचे जतन करण्याच्या नागरिक व स्वयंसेवी संस्थांच्या प्रयत्नांना पुरातत्व व संग्रहालये विभागाने दिलेला प्रतिसाद उत्साहवर्धक आहे. यथावकाश सिंधुदुर्ग जिल्ह्यातही असेच काम होईल, अशी आशा करायला हरकत नाही.

हिवाळे येथील २००१ मधील आणि कुडोपी येथील २०१२ मधील कातळशिल्पांच्या शोधाला वृत्तपत्र आणि अन्य माध्यमांमधुन चांगली प्रसिद्धी मिळाली. हिवाळे येथील कातळशिल्पांचा शोध

लागण्यापूर्वी कोकणातील निवळी फाटा (जि. रत्नागिरी) येथील भौमितिक किंवा अमूर्त रचना असलेले कातळशिल्प प्रसिद्ध हो- ते. अशा रचनांसाठी मी शिल्पपट्ट या शब्द योजला आहे. ज्येष्ठ इतिहासकार श्री. दाऊद दळवी, श्री. सदाशिव टेटविलकर यांनी त्यावर संशोधन केले होते. पुण्याचे श्री. प्र. के. घाणेकर यांनीही 'कोकणातील पर्यटन' या पुस्तकात त्याचा उल्लेख केला होता. मात्र अन्य सर्व ठिकाणची कातळशिल्पे अज्ञाताच्या प्रांतात होती. फारतर त्या त्या परिसरात 'पांडवांची चित्रे' म्हणून स्थानिकांना माहिती होती.

रत्नागिरी येथील 'निसर्गयात्री' संस्थेने रत्नागिरी, राजापूर, लांजा तालुक्यातील ६५ हुन अधिक गावांमध्ये पंधराशेहून अधिक कातळशिल्पांचा शोध लावून त्यांचे दस्तावेजीकरण व संरक्षण करण्याचे काम गेल्या दहाबारा वर्षात केले. सुसरोंडी आणि कोळोशी या दोन अतिप्राचीन काळातील संदर्भांशिवाय या भागात मानवी वस्ती असल्याचे कोणतेही पुरावे सापडलेले नव्हते. पण आता साधारणपणे मध्याश्मयुगाच्या शेवटच्या व नवाश्मयुगाच्या काळातील ही कातळशिल्पे सापडल्याने कोंकणातील मानवी अस्तित्वाचा एक महत्वाचा दुवा सापडला आहे.

हिवाळे व कुडोपी येथील कातळशिल्पांची माहिती प्रसिद्ध झाल्यामुळे नागरिकांमध्ये याविषयी चांगली जागृती झाली. यामुळे अनेक ठिकाणी काही हौशी नागरिकांनी आपापल्या परिसरातील अशा प्रकारच्या चित्रांबाबतच्या आख्यायिका किंवा ऐकीव माहिती यानुसार शोधमोहिमा राबवुन काही ठिकाणची कातळशिल्पे उजेडात आणली. त्यांचेही योगदान महत्वाचे आहे. या विषयाबाबत जागृत झालेल्या सुजाण नागरिकांकडून कातळशिल्पांचे शोध लागत आ- हेत, ही आनंदाची बाब आहे. गोव्यातही उसगाळीमळ, रिवण, मौशी येथे कातळशिल्पे आढळली आहेत. (कै.) पी. पी. शिरोडकर, डॉ. नंदकुमार कामत, राजेंद्र केरकर वगैरे मंडळींनी यात चांगले काम केले आहे. सद्या गोव्यात स्थायिक झालेले मुंबई येथील श्री. ओंकार क्षीरसागर हे युवा चित्रकार 'कलाविष्कार' यादृष्टीने कातळशिल्पांचा वेगळा अभ्यास करीत आहेत. अलिकडेच त्यांनी सुनापरान्त आर्ट सेंटरमध्ये भरलेल्या 'कंटिन्युअम' कला प्रदर्शनात मौशी येथील कातळशिल्पांवर एका माहितीपटासह सुरेख सादरीकरण केले होते.

कालावधी: कातळशिल्पांचा विषय निघाला की या कलाकृती कोणत्या कालावधीत कोरण्यात किंवा खोदण्यात आल्या, हा प्रश्न हमखासपणे विचारला जातो. याचे निश्चित उत्तर देता येत नाही. पण याबाबत काही अंदाज लावण्यात आले आहेत. एक नक्की की, हे सर्व अश्मयुगात घडले आहे. परंतु, अश्मयुगाचा कालावधी हा प्रदीर्घ आहे. आद्य पुराणाश्मयुगामध्ये म्हणजे सुमारे २० लाख वर्षांपुर्वी आफ्रिकेतील आदिमानवाने दगडी हत्यारे बनवल्याचे पुरावे सापडले आहेत. अश्मयुग जगाच्या विविध भागात वेगवेगळ्या वेळी सुरु होते. त्यामुळे अश्मयुगाचा किंवा पाषाणयुगाचा कालपट प्रदीर्घ आहे. जगभरात विविध ठिकाणी सापडलेल्या पाषाणकलेचा (गुहाचित्रे आणि कातळशिल्पे किंवा पाषाणशिल्पे) विचार केला तर साधारणत: २५ ते ३० हजार वर्षांपुर्वी म्हणजे मध्याश्मयुगात याची सुरुवात झाली असावी. मानवाची बुद्धी प्रगत होत गेली, तसतशी त्याने दगडी हत्यारांची निर्मिती, अग्नीचा वापर आणि नियंत्रण, निवारा, मृतांचे दफन, वस्ती, पशुपालन, मातीची भांडी, शेती असे प्रगतीचे एकएक टप्पे पार केले. याचदरम्यान त्याच्याअंगी कलावृत्तीचा जन्म झाला. हा सर्व प्रगतीक्रम लक्षात घेतला तर पाषाणकला ही इसवीपूर्व २५ हजार ते दोन हजार वर्षे या काळादरम्यानची आहे, असे म्हणता येईल. अर्थात हा केवळ



अंदाज आहे.

अर्थ: दुसरा प्रश्न या कातळशिल्पांचा अर्थ काय ? तसे पाहिले तर कातळशिल्पांचा अर्थ लावणे, अतिशय जटिल आहे. ही कातळशिल्पे खोदण्याचा अश्मयुगीन मानवाचा नेमका कोणता उद्देश होता, त्या चित्रांचा अर्थ काय, हे प्रश्न आजही बऱ्याचअंशी अनुत्तरित आहेत. गुहाचित्रांमधील प्राणी व त्यांच्या शिकारीच्या प्रसंगांची चित्रे किंवा कातळशिल्पांमधील प्राणी यांचा अर्थ काही प्रमाणात लागू शकतो. मेमरी ड्रॉईंग या चित्रकला पद्धतीनुसार त्याने हे पुर्वी पाहिलेले, अनुभवलेले चितारले किंवा खोदले. आपल्या पुढील पिढीला याची माहिती मिळावी, असाही त्याचा उद्देश असावा. मेंदुचा सतत होत असलेला विकास, सुचणाऱ्या संकल्पना, फावल्या वेळाचा सदुपयोग हे उद्देशही त्यामागे असण्याची शक्यता आहे.

दुसरी एक शक्यता अशी वाटते, की या काळात ज्या भटक्या टोळ्या होत्या, त्या वेगवेगळ्या प्रदेशात शिकारीनिमित्त

फिरत असत. अशा अनेक टोळ्या असल्याने शिकारीवरुन त्यांचा संघर्षही होत असणार. याकरिता विशिष्ट भुप्रदेशावरची आपली मालकी किंवा सत्ता सिद्ध करण्याचाही प्रयत्न त्याने केले असावेत. वन्य प्राणीही अशा प्रकारे आपल्या क्षेत्राच्या सीमा निश्चित करुन घेतात. या सीमांच्या हद्दीत ते दुसऱ्या प्राण्याला येऊ देत नाहीत. एकाच ठिकाणी अशा प्रकारे सहज लक्ष वेधून घेतील, अशी चित्रे कोरुन त्या टोळ्यांनी आपल्या सीमारेषा किंवा हद्दी आखुन घेतल्या असाव्यात, अशीही शक्यता आहे.

कुडोपी, वानिवडे, आरे, वाघोटण येथे व अन्य काही



ठिकाणी आश्चर्यकारक अशा प्रमाणबद्ध भौमितिक अमूर्त रचना सापडल्या आहेत. अशा रचना कोरणारा मानव प्रगल्भ असला पाहिजे. बऱ्याचशा रचनांमध्ये चौकोन किंवा आयतांमध्ये आणखी काही चौकोन आखुन त्यात नागमोडी रेषा खोदलेले शिल्पपट्ट आढळतात. गुढ नकाशांप्रमाणे या रचना भासतात. अशा प्रकारचे शिल्पपट्ट रत्नागिरी जिल्ह्यातही आढळले आहेत. काही ठिकाणी वर्तुळे (circles), चक्री वर्तुळे (spirals), चक्रव्युह (labirynths) आढळून येतात. यांचा संबंध आकाशातील ग्रहतारे यांच्याशी किंवा खगोलांशी असावा का, हासुद्धा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. हिवाळे येथे बारा फुट लांबीची एक मानवाकृती खोदलेली आहे. तिच्याभोवती चौकटही आहे. याशिवाय अन्य दोन मानवाकृती आहेत. कुडोपी येथे दोन अतिशय सुस्पष्ट व अलंकारिक चौकटी असलेल्या दोन मानवाकृती आहेत. या मानवाकृती म्हणजे टोळीतील ज्येष्ठ सदस्य किंवा प्रमुख यांच्या मृत्युनंतर त्यांची स्मृती म्हणुन खोदल्या गेल्या असण्याची शक्यता आहे. ही सर्व कातळशिल्पे लांबलचक कातळपठारावर आ–हेत. या ठिकाणी जो समाज वस्ती करुन रहात होता, त्याला जवळपास दफनाची सोय नव्हती. जिथे खोदकाम करुन खड्डा करणे शक्य आहे, अशा ठिकाणी म्हणजे दूरवर दफनविधी करावा लागत असणार. मात्र मृत व्यक्तीच्या स्मृतींशी रोजच निकटचा संपर्क रहावा, विधी करणे सोपे जावे, यासाठी कदाचित वसतिस्थानाजवळ त्यांची ही स्मृतीस्थळे केली गेली असावीत, असा एक अंदाज बांधता येतो.

खोटले येथे आढळलेल्या एका कातळशिल्पाचे 'लज्जागौरी' किंवा मातृदेवतेच्या मुर्तीशी विलक्षण साम्य आहे. हे शिल्प आश्चर्यकारक आहे. लज्जागौरी ही सुफलनाचे आणि समृद्धीचे प्रतीक मानली जाते. जगभरात एक काळ मातृसत्ताक पद्धतीचा होता, असे मानले जाते. त्याकाळी ही संकल्पना रुजली असावी, असे एक मत आहे. शिवाय, स्त्रीच्या ठिकाणी असलेल्या उत्पत्तीच्या शक्तीमुळे तिला हे सन्मानाचे स्थान दिले असावे, असाही एक मतप्रवाह आहे. सिंधु संस्कृतीशी संबंधित उत्खननात लज्जागौरीच्या काही प्रतिमा सापडल्या आहेत. अनेक आदिवासी समुह या देवीची पूजा करतात. भारतात मध्य भारत, दख्खन, कर्नाटक, आंध्र भागात लज्जागौरीच्या मूर्ती, प्रतिमा सापडल्या आहेत. अमरावती येथे सापडलेली लज्जागौरीची संगमरवरी मूर्ती (सद्या चेन्नई वस्तुसंग्रहालयात आहे.) ही सातवाहन काळातील इ.स. १५० ते ३०० यादरम्यान कोरली असावी, असे तज्ञांचे मत आहे. इसवी सनाच्या सहाव्या ते बाराव्या शतकादरम्यान बदामी चालुक्य राजवंशाच्या काळातील अशा काही मूर्ती सापडल्या आहेत. लज्जागौरी ही देवता शिरविरहीत असते. डोक्याऐवजी कमळाचे फुल असते. ही देवी सुफलनाचे प्रतीक असल्याने ती जननस्थितीमध्ये दाखवली जाते. (Lotus headed Goddess in birthing posture) खोटले येथील हे कातळशिल्प आधुनिक काळातील लज्जागौरीशी विलक्षण साम्य दर्शवते. कदाचित आधुनिक काळातील लज्जागौरी हे या प्रतिमेचे उन्नत रुप असावे, अशी शक्यता आहे,

धार्मिक समजुती

अश्मयुगीन काळातील मानव समाज काही प्राथमिक स्वरुपाच्या धार्मिक समजुती आणि जादुटोणा करीत असावा. अर्थात याठिकाणी 'धार्मिक' हा शब्द आजच्या संदर्भात वापरुन चालणार नाही. कातळशिल्पांमधील काही अमूर्त कलाकृती या याचेच निदर्शक असाव्यात. मात्र यांची उकल करणे जवळपास अशक्यप्राय आहे. कमी आयुर्मान आणि फारच थोडी लोकसंख्या असल्याने ती झपाट्याने वाढावी, अशी त्याची इच्छा असणे स्वाभाविक होते. अश्मयुगीन कुटुंबपद्धती मातृप्रधान होती. त्यामुळे

बहुधा मातृदैवताची कल्पना प्रचलित झाली असावी. अशा प्रकारे निरनिराळ्या दैवतांच्या कल्पना मानवाच्या मनात साकार होत होत्या. या दैवतांना प्रसन्न करून घेण्यासाठी त्याला जादुटोण्याचा उपयोग करणे प्राप्त होते. जादुटोण्याची ही संकल्पना जगात सर्वत्र आढळते. जगाच्या अनेक भागात आजही या प्रथा आहेत. आपल्याकडे जसे पुर्वीच्याकाळी भगत होते, तसे भगत जगात सर्वत्र आदिम समाजांमध्ये आढळतात.

या शिल्पाकृती अश्मयुगीन काळातील असाव्यात. ही सर्व कातळशिल्पे एकाच वेळी खोदलेली नाहीत. कालांतराने त्यात भर पडत गेली. मध्याश्मयुग ते नवाश्मयुग (इसपु २५००० ते इसपु ५०००) या दरम्यान ती खोदली गेली असावीत. कातळशिल्प परिसरात तत्कालिन मानवी वसतिस्थानांचा पुरावा किंवा दगडी हत्यारे सापडलेला नाहीत. अद्यापपर्यंत दफनभुमीचा शोध लागलेला नाही. कातळशिल्पांमध्ये पाळीव प्राणी (मांजर, कुत्रा, बैल) यांचा समावेश नाही. प्राण्यांच्या शिकारीचे प्रसंग खोदलेले नाहीत. आतापर्यंत फक्त मालवण व देवगड या किनारपट्टीवरील तालुक्यांमध्ये कातळशिल्पे सापडली आहेत. मालवण व देवगड या तालुक्यात अन्य तालुक्यांच्या तुलनेत जास्त सडेपठारे (Laterite plateau) आहेत. या दोन्ही तालक्यांमध्ये अन्य तालक्यांच्या तुलनेत कमी वृक्षराजी व जंगले आहेत. कातळशिल्पांमध्ये प्राणी, पक्षी, मासे, मानवाकृती व अमूर्त रचनांचा समावेश आहे. हिवाळे, वानिवडे, आरे याठिकाणी अमूर्त आकार असलेले शिल्पपट्ट आढळले आहेत.

एकाच ठिकाणी सर्वाधिक कातळशिल्पे असलेल्या कुडोपी सड्यावर ६०च्या आसपास कातळशिल्पे आहेत. मात्र येथे एकही शिल्पपट्ट नाही. रचना, कामातील सफाई व झालेली झीज पाहता हिवाळे येथील कातळशिल्पे सर्वात जुनी असावीत. हेच निकष लावले असता कुडोपी येथील कातळशिल्पे सर्वात अलिकडच्या काळातील असावीत. हिवाळे येथील सुमारे १२ फुट लांबीच्या मानवाकृतीचे शिल्प मातृदेवतेचे असण्याची शक्यता आहे. कुडोपी येथे असलेले एक शिल्प मातृदेवतेचे असण्याची दाट शक्यता आहे. अमूर्त रचनांचा अर्थ लागत नाही. ती तत्कालिन धर्मविषयक समजुतींमधुन विधींसाठी (Rituals) काढली असावीत. काही शिल्पे, विशेषत:मानवाकृती ही मृत्युनंतरच्या जीवनाबाबतच्या संकल्पना, आत्मा वगैरे समजुतीमधुन जादुटोणाविषयक विधींसाठी (Shamanistic Practices) काढली गेली असावीत. ज्याकाळी मानव टोळ्यांनी व भटका शिकारी (Hunter gatherer) म्हणुन वावरत होता, त्या काळात आपल्या ताब्यातील भूक्षेत्रावरील ताबा दाखविण्यासाठी ही चिन्हे (-rea demarcations) खोदली गेली असावीत. सतत संघर्षमय जीवन आणि शिकारी यातुन मिळालेल्या फावल्या वेळेचा उपयोग यासाठी केला गेला असावा. अमूर्त रचना व चिन्हे यांचा संबंध आकाशातील ग्रहताऱ्यांशी असावा, असेही एक मत मांडले जाते. दक्षिण गोवा ते रत्नागिरी या दरम्यानच्या पश्चिम किनारपट्टीवर आढळलेल्या या कातळशिल्पांमध्ये काही परस्परसंबंध आहे का, याचा तुलनात्मक अभ्यास होण्याची गरज आहे. या भागात तत्कालिन टोळ्यांचे स्थलांतर होत होते का, याचाही अभ्यास होणे गरजेचे आहे. चिरेखाणी, आंबा कलमांची लागवड, रस्ते यामुळे या कातळशिल्पांना धोका निर्माण झाला आहे.

### संरक्षणासाठी उपाययोजना आवश्यक

राज्य शासनाच्या पुरातत्व विभागाने कोकणातील कातळशिल्पांचे व्यापक सर्वेक्षण करावे. छायाचित्रे, चित्रीकरण, ड्रोन चित्रीकरण,



वेत. यापैकी काही कामांसाठी जिल्ह्यातील नोंदणीकृत सामाजिक संस्था, अशासकीय सेवाभावी संस्थांची मदत घ्यावी. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने सर्व शाळा, विद्यालये, महाविद्यालये येथे 'कातळशिल्प जनजागृती' या उद्देशाने संशोधक, अभ्यासक, पुरातत्वशास्त्रज्ञ यांची व्याख्याने आयोजित करावीत. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने या ठिकाणांना पर्यटनस्थळे जाहीर करुन तशी प्रसिद्धी करावी.

हे सर्व झाले तर सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटनक्षेत्राला एक नवा आयाम मिळेल. या कातळशिल्पांचा अधिक शास्त्रशुद्ध अभ्यास झाला तर कोंकणातील मानवी अस्तित्वाच्या प्रवासावर नवा प्रकाश पडू शकेल. पण यासाठी शासनस्तरावर आवश्यक असलेली राजकीय व प्रशासकीय इच्छाशक्ती, स्थानिक जनतेचा सहभाग आणि रेटा निर्माण होऊन हे प्रत्यक्षात घडेल का, हा कळीचा प्रश्न आहे. या सर्वांच्या प्राधान्यक्रमात हा विषय कोणत्या क्रमांकावर असेल, हाही विचार करण्यासारखा मुद्दा आहे. या प्रश्नांची उत्तरे मिळेपर्यंत आशावादी रहायला हरकत नाही.

*****

# विकासाच्या नकाशावरील कोकणचे स्थान निश्चित करा

ॲड. विलास पाटणे



**कोकणातून निवडून आलेले व मूळ कोकणवासी असे साठ ते ते सत्तर आमदार आज महाराष्ट्राच्या विधानसभेते कार्यरत आहेत. या सर्व लोकप्रतिनिधींनी विकासाच्या प्रश्नांवर कोकणचा आवाज सगळीकडे बुलंद केला पाहिजे. त्यासाठी केवळ सरकारवर अवलंबून राहता येणार नाही. याबरोबरच कोकणवासियांनीही आपली जुनी मानसिकता सोडून सकारात्मक दृष्टी अंगिकारली पाहिजे. शेवटी आपल्या प्रदेशाचा विकास आपल्यालाच करावयाचा आहे, याची पक्की खूणगाठ मनाशी बांधली पाहिजे. असे झाले तर कोकणचा विकास दूर नाही. कोकणाला निसर्गाने भरभरुन दिले आहे. फक्त योग्य नियोजन आणि प्रभावी मार्केटिंगची गरज आहे. पर्यटन, मत्स्योत्पादन, हापूस, काजू, नारळ या संबंधाने विकासाभिमुख धोरण राबविले तर कोकणातून शहराकडे होणारे स्थलांतर थांबून गावात, वाडीवर घट्ट पाय रोवून कोकणातील माणूस समर्थपणे उभा राहील.**

कोकणाला निसर्गाने भरभरुन दिले आहे. फक्त योग्य नियोजन आणि प्रभावी मार्केटिंगची गरज आहे. पर्यटन, मत्स्योत्पादन, हापूस, काजू, नारळ या संबंधाने विकासाभिमुख धोरण राबविले तर कोकणातून शहराकडे होणारे स्थलांतर थांबून गावात, वाडीवर घट्ट पाय रोवून कोकणातील माणूस समर्थपणे उभा राहील.

केंद्रीय वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्यामुळे इंदापूर ते झाराप या ४७५ कि.मी. लांबीच्या मुंबई–गोवा महामार्गाच्या १२ हजार कोटी गुंतवणूकीचा चौपदरीकरण प्रकल्प सुरु झाला. परंतु महामार्ग केव्हा पूर्ण होणार याचे उत्तर मिळत नाही. आरवली–तळेकांटे ४० कि.मी. व तळेकांटे ४० कि.मी. व तळेकांटे वाकेड ४९ कि.मी. या टप्प्यामधील कामे संथगतीने चालू आहेत. अर्थात १.७२ किलोमीटर लांबीच्या कशेडी बोगदाही पूर्ण झाला. तसेच वडखळ–

अलिबाग, मुळशीमार्गे पुणे, पोलादपूर–महाबळेश्वर, कोल्हापूर–तरेळे आणि चिपळूण–कराड या रस्त्यांचे प्रकल्प मार्गी लागले. त्याचप्रमाणे कोकण रेल्वेचे दुपदरीकरण सुरु आहे. तर वैभववाडी–कोल्हापूर हा पश्चिम महाराष्टाला जोडणा–या रेल्वे ट्रैकला प्रलंबित आहे. रत्नागिरी एअरपोर्ट टेक ऑफच्या स्थितीत आहेत.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने प्रलंबित रेवस रेड्डी या सागरी महामार्गावरील धरमतर खाडीवरील रेवस ते उरणनजीकच्या करंजा बंदराला जोडणारा सागरी पूल अखेर मार्गी लागला हे स्वागतार्ह आहे. रस्ते विकास महामंडळ या पुलावर ८९७ कोटी ७० लाख रुपये खर्च करणार आहे. रेवस आणि करंजाला जोडणारा चार पदरी खाडी पूल बांधण्याची निविदा प्रक्रिया सुरु केली आहे. तो पूल पूर्ण झाल्यावर प्रवाशांचा वेळ आणि इंधनाची खूप बचत




होणार आहे.

४२ खाड्यांनी व्यापलेल्या डोंगराळ प्रदेशाच्या कोकणपट्टीतून जाणारा रेवस रेड्डी सागरी महामार्गामुळे मुंबईचे सध्याचे अंतर १०५ कि.मी. ने कमी होऊन प्रवासाची वेळ किमान दीड तासांनी कमी होईल. कोकणातील बहुतांशी पर्यटन केंद्रे किनारपट्टीवर असल्याने पर्यटन विकासाला गती मिळून मोठ्या प्रमाणावर पर्यटक कोकणात उतरतील. कोस्ट गार्डचा विमानतळ रत्नागिरीतच असल्याने, राष्ट्राच्या संरक्षणाच्या दृष्टीने सागरी महामार्गाच महत्त्व अधोरेखित झाले आहे.

दिघी, आगरदांडा, बाणकोट, जयगड व दाभोळ हे पूल नाबार्डकडे प्रस्तावित आहेत. १८३७ मीटर लांबीचा बाणकोट बांगमांडला पूल २०13 साली नाबार्डकडून अर्थसहाय्य मिळून देखील रखडला आहे. तसेच जयगड ऐवजी १० कि.मी. अंतरावरील कुंडली, (जांभारी) पूल प्रस्तावित आहे. परंतु जयगडमध्ये पूल बांधणे सर्वार्थाने योग्य आहे. तसेच विजयदुर्ग ऐवजी सागवे आंबेरी पूर्ण झाला आहे. सा–गरी महामार्गावरील पूल लवकर पूर्ण होणे गरजेचे आहे. केळशीपूल व जोड रस्त्याचे बांधकामास मुंबई उच्च न्यायालयाने पर्यावरण विषयाचे संदर्भात स्थगिती दिली आहे. अर्थात आता म्हाप्रळ पुलही कोसळण्याच्या स्थितीत आहे. पुलानजिक महामार्ग दाट वस्तीच्या चिंचोळ्या पट्टीतून जात असल्याने जमीन संपादन करून रस्ता रुंद करावा लागेल,

अमेरिकासारख्या बलाढ्य देशाचा आर्थिक विकास रस्त्यांच्या विकास नियोजनापूर्वक केला गेला, रस्त्यामुळे राष्ट्राला श्रीमंती येते हे आपल्या लक्षात येत नाही. कोकणातील नद्या खाड्यामधून समुद्राच्या फेसाळणा–या लाटा अंगावर घेत आंब्या पोफळीच्या बागांतून सागरी महामार्गाने जेव्हा देश विदेशीचा पर्यटकाचा प्रवासच पर्यटनाचा भाग होईल.

कोकण रेल्वेचा सुरुवातीचा प्रस्तावित खर्च एक हजार कोटी होता. परंतु नंतर तो वाढत गेला. केंद्राने १०.५ टक्के व्याजाने टॅक्स फ्री कर्ज रोखे काढण्यास परवानगी दिली. जवळपास अडीच हजार कोटीचे कर्ज रोखे काढण्यात आले. ते व्याजासह फेडायचे होते. त्यातूनही पैसे कमी पडल्याने जागतिक बँकेकडून कर्ज घ्यावे लागले. त्यातच २०१२–१३ मध्ये कोकण रेल्वेने स्कायवस प्रकल्पामध्ये पैसे गुंतवल्याने तोटा झाला. कोकण रेल्वेच्या ट्रॅकवर मोठे बंदर व मालवाहतूक नसल्याने पोषक वातावरण नव्हते. तसेच इतर रेल्वेमार्ग या मार्गाला जोडलेले नव्हते. रेल्वेच्या अर्थकारणात माल–वाहतूक महत्त्वाची असते. भारतीय रेल्वेशी करार होऊनही अपेक्षित प्रवासी वाहतूक मिळाली नाही. रोरोसारखी नवी संकल्पना, जम्मूचा नवा रेल्वेमार्ग हे यशस्वी टप्पे होते. परंतु परतफेड व डिझेल खर्च यामुळे महामंडळाची आर्थिक कोंडी झाली. परंतु विद्युतीकरणामुळे दर वर्षीचा डिझेल इंधनाचा खर्च तीनशेवरुन शंभर कोटीवर आला गोव्यात. बाळ्ळी येथे कंटेनर वाहतूक सुविधा उपलब्ध केल्याने उत्पन्नाचे नवीन मार्ग निर्माण झाले.

विजयदुर्ग–वैभववाडी कोल्हापूर, जयगड–डिंगणी व दिघी–माणगाव हे नवीन मार्ग दृष्टीक्षेपात आहेत. त्यामुळे वाहतुकीच्या नव्या संधी बंदरे, रेल्वेला जोडल्याने उपलब्ध होतील. दर सात किमी अंतरावर एक अशी नवी २१ स्थानके बनतील. विद्युतीकरणासही दुपदरी ट्रॅकच्या माध्यमातून ३४.२१ दशलक्ष प्रवाशांची वाहतूक करणा–या कोकण रेल्वेच्या खाजगीकरण अथवा विलिनीकरणाऐवजी कोकणवासियांची स्वप्ने पूर्ण करण्याकरिता केंद्राच्या आर्थिक सिग्नलची गरज आहे.

१८५७ साली स्थापन झालेल्या ७६४ महाविद्यालये संलग्न असलेल्या मुंबई विद्यापीठाच्या प्रशासन क्षमतेसंबंधी प्रश्न निर्माण झाले आहेत. सध्या विद्यापीठात कमालीचे गोंधळाचे वातावरण आहे.

पेपरफुटीचे प्रसंग, उशिरा लागणारे निकाल यामुळे विद्यापीठाचा दर्जा कमालीचा घसरला आहे. गोव्याच्या सीमेवरील दोडामार्गाच्या महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थ्यांना ५५० किलोमीटर अंतरावरील मुंबई विद्यापीठात येणे अवघड झाले आहे. यास्तव

रत्नागिरीचे ४५ आणि सिंधुदुर्गाची ३८ अशा ८३ महाविद्यालयांचे स्वतंत्र कोकण विद्यापीठ करणे न्याय्य व उचित होईल. स्थानिक गरजेप्रमाणे कौशल्यावर आधारित असे नवनवीन अभ्यासक्रम सुरु करुन या विद्यार्थ्यांना न्याय देता येईल.

एकूण मत्स्यउत्पादनाच्या ७२ टक्के म्हणजेच ४.४ लाख मेट्रिक टन उत्पादन कोकण किनारपट्टीवरच होते. याउलट जेमतेम १.४५ लाख मेट्रिक टन उत्पादन हे गोड्या पाण्यात होते. तसेच सत्तर खाड्यांच्या सभोवती असलेले १४ हजार ४४७ हेक्टर खाजण क्षेत्र हेही मत्स्यशेतीला उपलब्ध आहेत. मत्स्य उपलब्धी व्यवस्थापन, मत्स्य पर्यावरण, मत्स्य जलशास्त्र, समुद्र विज्ञान आदी अभ्यासक्रमांचा समावेश असलेले पदविका, पदवी आणि पदवुत्तर शिक्षणासाठी कोकण किनारपट्टीवर मत्स्य विद्यापीठ सुरु केले पाहिजे. केरळ, तामिळनाडूमध्ये किनारपट्टीवर मत्स्य विद्यापीठे सुरु झाली. महाराष्ट्रात मात्र मासे कोकणात आणि विद्यापीठ नागपूरच्या पशुवैद्यकीय विद्यापीठाला संलग्न, हे सारे खरोखर अनाकलनीय आहे.

सरखेल कान्होजी आंग्रे यांचा समृद्ध वारसा असलेल्या कोकणात बंदर प्रकल्पात ३० ते ३५ हजार कोटींची गुंतवणूक झालेली आहे. यास्तव, मेरीटाईम क्षेत्रातील नॉटिकल सायन्स, मरीन इंजिनिअरींग, शिप आर्किटेक्चर, शिप बिल्डींग, मरीन लॉ आदि विषयातील शिक्षण देणारे चेन्नईच्या मेरिटाईम विद्यापीठाचे उपकेंद्र रत्नागिरीत सुरु होणे आवश्यक आहे. आज मेरिटाईम क्षेत्रात आपण केवळ सात टक्के मनुष्यबळ पुरवतो. केंद्रामुळे हे प्रमाण वीस टक्के होईल. केवळ यामुळेही २७ हजार अधिका–यांना नवे रोजगार उपलब्ध होतील. तसेच मुंबई विद्यापीठाच्या उपकेंद्रात रेल्वेला लागणारे तंत्रशिक्षण मिळाले पाहिजे.

कोकणात निसर्ग विलोभनीय असूनही या सा–या अनुकूल परिस्थितीचे प्रभावी मार्केटिंग होत नसल्याने पर्यटन विकासाला अपेक्षित गती मिळालेली नाही. मलेशियाचे पर्यटनाचे वार्षिक बजेट भारताच्या दीडपट आहे. केरळमधील ॲटलेपीत २३०० हाऊस बोटीवर पंचवीस हजार तरुणांना रोजगार आणि ८७६४ कोटींचे परकीय चलन मिळाले. आपण छोट्या जेटी बांधून तरुणांना अर्थसहाय्य केले तर प्रचंड रोजगार उपलब्ध होईल. पर्यटन विकासातून केवळ कोकणच्या नव्हेतर महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेलाही आधार मिळेल.

ऊस, कांदा व द्राक्षाप्रमाणेच राज्य सरकारने हापूस आणि काजू उत्पादकांना सर्व प्रकारे सहाय्य करुन मार्केटिंगसाठी जागा आणि रास्त हमीभाव दिला पाहिजे. एकट्या आंध्र प्रदेशामधून ७२ टक्के म्हणजे चार लाख टन कोळंबी उत्पादन होते. या पार्श्वभूमीवर कोकणात कोळंबीचे केवळ दीड टक्का उत्पादन होते. मत्स्यबीज निर्मितीसाठी हॅचरिज, साठवण प्रक्रिया तसेच वाहतूक सुविधा आल्या पाहिजेत. मत्स्यशेतीला कृषी शेतीचा दर्जा दिला पाहिजे. हे काम तातडीने व्हायला हवे.

कोयना धरणाचे काम पूर्ण होऊन आता पन्नास वर्षे झाली. वाशिष्ठी नदीतून कोयनेचे साधारणतः एक हजार नऊशे दशलक्ष घनलीटर पाणी वाहून जाते. शेवटी हे सगळे पाणी समुद्राला मिळते. रिफायनरीला कोयनेचे पाणी देण्याचा प्रस्ताव आहे. परंतु ते देताना वाशिष्ठीचे पाणी पिण्याकरिता व सिंचनाकरिता रत्नागिरी व सिंध–



दुर्ग जिल्ह्यांना पुरविण्याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. परंतु कोयनेचे पाणी प्राधान्याने कोकणाला मिळाले पाहिजे. मराठवाड्याला पाणी देणे अन्यवहार्य आहे. या पाण्यावर ६५ हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येऊ शकते. पण आज हे पाणी वाया जात आहे. पावसाळ्यामध्ये अतिवृष्टीमुळे नाकातोंडात पाणी, तर उन्हाळ्यात तीव्र पाणी टंचाईमुळे डोळ्यात पाणी, हे कोकणचे दृष्टचक्र कसे थांबणार ?

कोकणातून निवडून आलेले व मूळ कोकणवासी असे साठ ते ते सत्तर आमदार आज महाराष्ट्राच्या विधानसभेते कार्यरत आहेत. या सर्व लोकप्रतिनिधींनी विकासाच्या प्रश्नांवर कोकणचा आवाज सगळीकडे बुलंद केला पाहिजे. त्यासाठी केवळ सरकारवर अवलंबून राहता येणार नाही. याबरोबरच कोकणवासियांनीही आपली जुनी मानसिकता सोडून सकारात्मक दृष्टी अंगिकारली पाहिजे. शेवटी आपल्या प्रदेशाचा विकास आपल्यालाच करावयाचा आहे, याची पक्की खूणगाठ मनाशी बांधली पाहिजे. असे झाले तर कोकणचा विकास दूर नाही.

*****

# दिवंगत साहित्यिक, बेस्ट नाटककार : प्र. ल. मयेकर





अशोक लोटणकर



'मिस्टर नामदेव म्हणे' हे नाटक यशवंतराव चव्हाण सेंटर नरिमन पॉईंटला लागले होते. मोठे मोठे विविध क्षेत्रातील लोक या नाटकासाठी आले होते. या नाटकात मराठी माणसाचा विषय होता. मराठी अस्मिता आणि महाराष्ट्रातील विशेषतः मुंबईतील मराठीपण जाग–वणारं होता. मोठ्या शासकीय, नियम शासकीय आस्थापनावर आयएएस दर्जाचा मराठी माणूस नाही. मराठीतून कामकाज करणाऱ्या शासन यंत्रणेत अ मराठी अधिकारी असा विषय उलगडत होता. प्र, ल. व बेस्ट मध्ये काम करायचे. बेस्टला तर ब्रिटिश काळापासून दीडशे वर्षांचा इतिहास. पुढे बेस्टचे महापालिकाकरण झाले. परंतु बेस्टला जनरल मॅनेजर आयएसएस मराठी मिळत नाही. ही खंत त्यांनी नाटकाच्या माध्यमातून व्यक्त केली. राज्य नाट्य स्पर्धेमधून सातत्याने यशस्वी होणारे बेस्टचे हुकमी नाटककार म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला सुपरिचित होते आणि पुढे व्यावसायिक नाटकातून त्यांनी चांगला जम बसविला.

मी १९८१ बीएसटीमध्ये नोकरीला लागलो तेव्हा मी कुलाबा येथील विद्युत विभागात काम करीत होतो. बेस्टला लेखकांचा आणि कलाकारांचा चांगला वारसा आहे. हे ऐकत होतो. फार पूर्वी श्री. ना. पेंडसे, म. पा. भावे बेस्टमध्ये होते. गीतकार नामदेव लोटणकर होते. आणि प्र. ल. मयेकर सर्वांच्या तोंडी म्हणजे सर्वांच्या तोंडी असणारं नाव. खरंतर १९८२–८५ काळात ते कथाकार म्हणून प्रसिद्ध होते. मसीहा हा त्यांचा कथासंग्रह त्याच दरम्यान प्रकाशित झाला होता आणि 'मसीहा' पुस्तकासह प्र.ल.ना भेटायचे मी ठरवले. तेव्हा प्र. ल. मुंबई सेंट्रल येथे इमारत विभागात काम करीत होते. क्लार्क म्हणजे लिपिकपदावर कार्यरत होते. जाण्यापूर्वी माझ्या कवितांची काही कात्रणे सोबत घेतली. त्यावेळी वृत्तपत्रांच्या रविवारच्या पुरवण्यांमधून माझ्या कविता, ललित लेखन, तर कधी कथा प्रसिद्ध होत असत. प्र. ल. सारखे नाटककार आपल्याच आस्थापनामध्ये आहेत, मग त्यांना भेटून त्यांचा मार्गदर्शन घ्यावं हा उद्देश होता. माझं वय २३ वर्ष होते. तेव्हा महिन्याचे सर्व दिवस कामावर वेळेवर हजर झाले. लेट नसेल तर महिना अखेरीस तीन तास पार्ट डे मिळायचा. असाच पार्ट डे घेऊन मी प्र. लं. यांच्या ऑफिसमध्ये गेलो.

प्र. ला. ना कोणतीही पूर्वकल्पना न देता मी त्यांच्याकडे गेलो होतो. तेव्हा मोबाईल नव्हते. शिवाय प्र. ल. मला वैयक्तिक रित्या ओळखतही नव्हते. मी त्यांच्याकडे गेलो. नमस्कार करून माझं नाव सांगितले. त्यांनी मला बसायला सांगितले. औपचारिकता संपूर्ण आम्ही बोलू लागलो. मी कोकणातला असल्यामुळे त्यांनी अधिक आस्थेने चौकशी केली. कवितांची कात्रण त्यांना दाखवली. त्यांनी पटापट कात्रणावर नजर फिरवली. तसा मी तेव्हा लाजरा मुजरा होतो. पण त्यांनी मला बोलतं केलं. बोलता बोलता




समोरच्या व्यक्तीच्या मनाचा वेध घेणारी त्यांची थेट नजर सहजपणे कळायची. त्यांची किरकोळ देहयष्टी, चष्मा आणि अत्यंत साधी राहणी पाहून हा माणूस म्हणजे सामान्यातला अगदी सामान्य माणूस वाटायचं आम्ही बोलत होतो ते इमारत विभागात, आणि मी विद्युत विभागात, तसा कामाचा प्रत्यक्ष काहीच संबंध नाही. परंतु आपलं काम सांभाळून आपली क्रिएटीव्हीटी कशी सांभाळायची यावर बोलले. जवळ जवळ अर्धा पाऊण तास जास्त मी बोललो चहापान झालं शेवटी जाता जाता त्यांनी मला सांगितलं

हे बघ तुला तीन गोष्टी सांगतो त्या लक्षात ठेव. पहिली गोष्ट म्हणजे आपण मनापासून लिहायचं आणि जे लिहू ते कमी दर्जाचे आहे असं न्यूनगंड मनात काही आणायचे नाही. यामुळे आपल्या लेखनात आत्मविश्वास वाढतो. दुसरी गोष्ट म्हणजे आपलं साहित्य मग कविता, ललित लेख, कथा जे काही असेल ते थेट मोठ्या वृत्तपत्राकडे साहित्याची उत्तम जाण असणाऱ्या मासिकाकडे पाठवायचे. त्यामुळे आपल्या साहित्याचे मूल्यमापन होते. फुटकळ ते पण छापतील पण दर्जा कळणार नाही. लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, सकाळ या पेपर ना पाठव आणि तिसरी गोष्ट ऐक. आणि सौम्यसे हसले, म्हणाले कामातून वेळ मिळत नसतो तेव्हा सुंदर हस्ताक्षर असलेल्या मुलीबरोबर लग्न कर. कारण टाईप करून मॅटर वृत्तपत्राकडे, मासिकांकडे पाठवणे शक्य नसते. म्हणून लेखन कामी तुला मदत होईल.

प्र. लं. चा निरोप घेऊन मी गिरगावात आलो. तेव्हा मी बहिणीच्या घरी राहत होतो. कुलाबा जवळ होते प्र.लें.ची भेट बराच काळ लक्षात राहिली. नंतर पुढे जवळजवळ २५–३० वर्षे आम्ही भेटत राहिलो. प्र.लं. एकांकिकेला लिहिण्यात माहीर होते. वेगवेगळे नाविन्यपूर्ण विषय कथा, कथानक, प्रधान विषय घेऊन ते एकांकिका लिहीत आणि त्यांना हमखास यश मिळत असे. राज्य नाट्य स्पर्धेमधून सातत्याने यशस्वी होणारे बेस्टचे हुकमी नाटककार म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला सुपरिचित होते आणि पुढे व्यावसायिक नाटकातून त्यांनी चांगला जम बसविला. रात्र आणि अग्निपंख, दीपस्तंभ, डॅडी आय लव यू, पांडगो इलोरे ही व्यावसायिक नाटके रंगभूमीवर प्रचंड गाजली. विशेष म्हणजे त्यांची नाटके, कथानक प्रधान संवाद अतिशय चमकदार आणि हुकमी यामुळे त्यांच्या नाटकांना प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळत असे अगदी सुरुवाती सुरुवातीला त्यांच्या नाटकांच्या नावांनी आपले स्वतंत्र अस्तित्व आणि वेगवेगळेपण सिद्ध केले होते. म्हणजे नाटकाच्या नावावरुन प्रेक्षकांना उलगडा होत असे. उदा. 'मा असं साबरीन' हे नाटक रंगभूमीवर प्रचंड गाजलं. त्याचप्रमाणे 'अथ मनुस जगन ह' हे नाटकदेखील गाजलं. श्रीराम लागूंसारख्या मातब्बल अभिनेत्याने त्यांच्या नाटकात काम केले.

नाटकाच्या माध्यमातून त्यांनी सगळेच विषय हाताळले. कौटुंबिक, सामाजिक, विनोदी, रहस्यमय आणि थरारक देखील रानभूल, रमले मी, आसू आणि हसू, कमळीचा काय झालं, तो परत आलाय, मिस्टर नामदेव म्हणे, तक्षक याग, अनंत अवशिष्ट, गंध निशिगंधाचा, सोनपंखी इत्यादी नाटके रसिक प्रेक्षकांनी डोक्यावर घेतली होती. त्यांची सर्वाधिक नाटके त्यांनी चंद्रलेखा संस्थेला दिली.

मिस्टर नामदेव म्हणे हे नाटक यशवंतराव चव्हाण सेंटर नरिमन पॉईंटला लागले होते. मोठे मोठे विविध क्षेत्रातील लोक या नाटकासाठी आले होते. या नाटकात मराठी माणसाचा विषय होता.

मराठी अस्मिता आणि महाराष्ट्रातील विशेषतः मुंबईतील मराठीपण जागवणारं होता. मोठ्या शासकीय, नियम शासकीय आस्थाप–नावर आयएएस दर्जाचा मराठी माणूस नाही. मराठीतून कामकाज करणाऱ्या शासन यंत्रणेत अ मराठी अधिकारी असा विषय उलगडत होता. प्र, ल. व बेस्ट मध्ये काम करायचे. बेस्टला तर ब्रिटिश काळापासून दीडशे वर्षांचा इतिहास. पुढे बेस्टचे महापालिकाकरण झाले. परंतु बेस्टला जनरल मॅनेजर आयएसएस मराठी मिळत नाही. ही खंत त्यांनी नाटकाच्या माध्यमातून व्यक्त केली. नाटक संपल्यावर माझ्यासोबत तत्कालीन महापालिका आयुक्त शरद काळे साहेब होते. मी बेस्ट मधला अधिकारी म्हणून ते माझ्याशी बोलत होते. चर्चा करत होते आणि म्हणाले. नाही कसे माझ्या माहितीप्रमाणे विद्याधर कानडे व शरयु गोखलेंनी काम केलं आहे. त्यावर मी म्हणालो सर बेस्टचे महा व्यवस्थापक डेप्युटेशनवर अथवा महिनाभर रजेवर गेले होते. म्हणून महापालिकेतील अतिरिक्त मनपा आयुक्त त्यांचे काम पहात असत. हे त्यांनी मान्य केले. मात्र त्यानंतर काहीच वर्षात स्वाधिन क्षत्रिय डॉ. जगदीश पाटील, उत्तम खोब्रागडे मराठी आयएएस अधिकारी बेस्टमध्ये व्यवस्थापक म्हणून आले होते. मराठी माणसाबद्दल प्र. लं.ना नेहमी आदर वाटत असे. अगदी शेवटी शेवटी त्यांना सुपरवायझर म्हणून जनता संपर्क विभागात पाठवण्यात आले. वृत्तपत्रातून प्रवाशांच्या ज्या तक्रारी येत त्यांना वाहतूक विभागातून उत्तरे दिली जातात. अर्थात वाहतूक विभागाशी संबंधित प्रश्नांना तेव्हा उत्तरात प्रेसच्या दृष्टीने सुधारणा करण्यासाठी ते पेपर हातात घेऊन स्वतः प्र. लं. माझ्याकडे येत. सफेद कोऱ्या कागदावर ते लिहीत. त्यांचे अक्षर मोत्या सारखे सुंदर होते. माझ्याकडे आले की आम्ही बोलत चर्चा करीत असू. पुढे ते सेवानिवृत्त झाले तेव्हा बेस्टच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये त्यांचा निरोप समारंभ झाला. अरुण नलावडे, अविनाश नारकर, ऐश्वर्या नारकर, शरद कोनसे, प्रशांत दामले, बेस्टचे कलाकार, उच्च अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडे हा निरोप समारंभ झाला. ऐश्वर्या नारकरनी मानपत्राचे वाचन केले. एका मातब्बर नटाने त्यावेळी भाषणात आवर्जुन एक खंत व्यक्ती केली. बेस्टने एवढ्या मोठ्या लेखकांसाठी घर द्यायला हवे होते. दुर्देवाने ही मागणी सफल झाली नाही. ही प्र. लं. ना. देखील याची खंत नव्हती

व्यावसायिक मराठी नाटकांची कारकीर्द पूर्ण झाल्यावर प. लं. रत्नागिरी कायमस्वरूपी राहायला आले. रत्नागिरीत ते रमले. इथल्या नाट्य उपक्रमात भाग घेऊ लागले. माझी एकदा दोनदा रत्नागिरीत त्यांची भेट झाली होती. पुढे काही वर्षांनी त्यांनी रत्नागिरी ही सोडली. मुंबई आले, वसईत राहिले, अखेर १८ ऑगस्ट २०१५ रोजी वयाच्या ६९ व्या वर्षी त्यांचा मृत्यू झाला. मराठी नाट्यसृष्टीतला एक महान नाटककराचा अंत झाला

*****



# 'स्पर्श'



**अनिल दांडेकर**

**खोलीत आता निरव शांतता कोंडून राहीली होती. निरंजन मधूनच रंजनाकडे पहात होता. एका क्षणी त्या दोघांची दृष्टादृष्ट झाली आणि रंजनाने निरंजनला एकदम घट्ट मिठी मारली, दु:ख असह्य झाल्यासारखं तिचं सर्व अंग गदगदत होतं. ते त्याला अनपेक्षीत आणि अनाकलनीय होतं, निरंजन एकदम गोंधळलाच. तिने मारलेल्या घट्ट मिठीत त्याचा श्वास गुदमरायला लागला, पण एका क्षणी त्याला ते हवंहवंस वाटायला लागलं, त्याचा विरोध आपोआप कमी झाला, आणि रंजनाचा आवेग टोकाला जायला लागला. पण कोणत्या प्रे–रणेनं ते माहित नाही एका क्षणी निरंजनने ताकद लाऊन रंजनाच्या पकडीतून निसटला आणि धापा टाकत खोलीबाहेर येऊन थांबला त्यावेळी तो प्रचंड गोंधळला होता घाबरलाही होता. ती त्याचा पाठलाग करीत येईल अशी भिती त्याला वाटली, पण ती आली नाही. रंजनाचा चेहरा काहीच न घडल्यासारखा कोरा वाटला. त्या प्रसंगानंतर कितीतरी दिवस निरंजन तो स्त्री देहाचा आक्रमक आणि गरम, स्पर्श आठवून अस्वस्थ व्हायचा.**

काळजाचा थरकाप उडविणारा रडण्याचा भेसूर आवाज ऐकून निरंजन झोपेतून खडबडून जागा झाला अगदी जवळचं कुणी माणूस गेल्याची बातमी कळली की माणसं रडतात, तसा काहिसा तो आवाज काही वेळ अंदाज घेण्यातच गेला पण त्याला तसा आ–वाज पुन्हा ऐकायला आला नाही. मग त्याला वाटलं, कदाचित तो कुत्र्याच्या रडण्याचा आवाज असावा. घसा किंचीत सुकल्यासारखा झाला होता, म्हणून उठला. शेजारी झोपलेली त्याची बायको अंजली थोडी चाळवल्यासारखी झाली. रात्रीचे अडिच वाजले होते. त्याला जाणवलं, आपल्याला काहितरी स्वप्न पडत होतं, आणि तो आवाज स्वप्नातलाच होता. कारण खराखुरा असता तर अंजूला सुध्दा तो ऐकायला आला असता. इतरवेळी जरा कसला आवाज आला तरी, ती पटकन् जागी होत असे नंतर कितीतरी वेळ त्याच्या

डोळ्याला डोळा लागला नाही. तो स्वप्नाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करत राहीला. सध्याच्या टि. व्हि. वरच्या मन विषण्ण करणार्या बातम्या, कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत होणारे जवळच्या माणसांचे मृत्यू यामूळे तर हे असं भयानक स्वप्न पडलं नसेल ना? स्वप्नातील थरारक जाणिवांची, वास्तवातील घटनांशी सांगड घालण्याचा फोल प्रयत्न तो त्याही स्थितीत करत राहीला आणि ते विचार करता करता त्याला नकळत झोप लागली

दुसऱ्या दिवशी निरंजन ऑफिसला गेला, तिथल्या कामाच्या रगाड्यात रात्रीच्या स्वप्नाचा अनुभव धुसर होत गेला. पण तेवढा वेळच! कारण संध्याकाळी घरी येता येता त्याच्या विचारात कालचं स्वप्न पुन्हा डोकाऊ लागलं. तो प्लॅटफॉर्म वर गाडीची वाट पहात उभा होता आणि अचानक त्याला काही वर्षांपूर्वीचा तो प्रसंग पुन्हा आठवला. आत्या गेली तेव्हाचा!

आत्या बाबांपेक्षा मोठी, दोघच भावंड, तरीही का कुणास ठाऊक पण त्या दोघांचे संबंध फारसे चांगले नव्हते. आत्या आणि तिची २७,२८ वर्षांची मुलगी रंजना दोघीच ! रंजना निरंजनपेक्षा ११,१२ वर्षांनी मोठी ती फार काही शिकली नव्हती, आत्या खानावळ चालवायची त्या कामात रंजना तीला मदत करायची. दोघींचं जेमतेम भागायचं. हिंडती फिरती आत्या अचानक गेली. त्यावेळी बाबांनी निरंजनला आपल्यासोबत तिकडे नेलं होतं आत्याच्या खोलीबाहेर तीन चार शेजारी रहाणारी माणसं कोर्या चेहऱ्यांनी उभी होती. त्यांच्यापासून काही अंतरावर तिरडी आणि अंत्ययात्रेचं सामान तयार होतं. बाबांच्या मागोमाग निरंजन आत गेला. खोलीत अर्धवट प्रकाश होता. शेजाऱ्यांनी आत्याला जाडसर सतरंजीवर ठेवली होती, बाजुला त्याची आतेबहिण रंजना बसली होती, निर्विकार चेहर्यानं ! कदाचित आईच्या अचानक मृत्यूने तिला बधीरता आली असावी. काही वेळानी निरंजनचे बाबा शेजाऱ्यांसोबत प्रेतयात्रेसाठी गेले. मागे ती दोघंच उरली. खोलीत आता निरव शांतता कोंडून राहीली होती. निरंजन मधूनच रंजनाकडे पहात होता. एका क्षणी त्या दोघांची दृष्टादृष्ट झाली आणि रंजनाने निरंजनला एकदम घट्ट मिठी मारली, दुःख असह्य झाल्यासारखं तिचं सर्व अंग गदगदत होतं. ते त्याला अनपेक्षीत आणि अनाकलनीय होतं, निरंजन एकदम गोंधळलाच. तिने मारलेल्या घट्ट मिठीत त्याचा श्वास गुदमरायला लागला, पण एका क्षणी त्याला ते हवंहवंस वाटायला लागलं, त्याचा विरोध आपोआप कमी झाला, आणि रंजनाचा आवेग टोकाला जायला लागला. पण कोणत्या प्रेरणेनं ते माहित नाही एका क्षणी निरंजनने ताकद लाऊन रंजनाच्या पकडीतून निसटला आणि धापा टाकत खोलीबाहेर येऊन थांबला त्यावेळी तो प्रचंड गोंधळला होता घाबरलाही होता. ती त्याचा पाठलाग करीत येईल अशी भिती त्याला वाटली, पण ती आली नाही. बाबा परत येईपर्यंत तो अंगणातच थांबला सर्व आटोपून बाबा आले त्यांनी रंजनाला धीर दिला आणि निरंजनला घेऊन ते परत घरी निघाले. निरोप घेताना त्यानं हळूच मान वर करुन पाहीले, त्यावेळी त्याला रंजनाचा चेहरा काहीच न घडल्यासारखा कोरा वाटला.

त्या प्रसंगानंतर कितीतरी दिवस निरंजन तो स्त्री देहाचा आक्रमक आणि गरम, स्पर्श आठवून अस्वस्थ व्हायचा. त्यावेळचा म्हणजे शाळा, घर, मित्र सगळे दैनंदिन व्यवहार चालू होते पण त्याच्या विचारात तो प्रसंग वावटळ घुमवीत असायचा, रंजनाने मारलेल्या मिठीचा अर्थ त्याला निश्चित करता आला नव्हता. याविषयी आई बाबांजवळ बोलणं शक्यच नव्हतं आणि विश्वासानं बोलावं असा त्याला कुणी मित्रही नव्हता. काही काळांनी विचारांचा तो आवेग कमी कमी झाला खरा पण तो त्याच्या मनात कुठेतरी मागे दडून राहीलेला. असायचा! खरंतर लग्न झाल्यानंतर, अंजलीला हे सगळं सांगून टाकावं असं त्याला वाटलं होतं पण लग्नानंतर वर्षा दिड वर्षातच शरयुचा जन्म झाला आणि निरंजनच्या मनात संसार मोडण्याची भिती अधिकच गडद झाली.

कालच्या स्वप्नामुळे निरंजनच्या मनात त्या विचारांचे आवर्त पुनः घुमायला लागायचे. ट्रेन प्लॅटफॉर्मवर आली, thank god त्याला आज खिडकीजवळची सीट मिळाली. कालचा तो हेल काढून रडण्याचा आवाज रंजनाचा होता? ती तर असा हेल काढून रडली नव्हती! आपल्याभोवती एक वेगळीच अस्वस्थ शांतता पसरली आहे असं त्याला वाटत राहीलं निरंजन घरी पोहोचला, अंजली अजूनही घरी आली नव्हती आणि शरयू तिच्या खोलीत अभ्यास करीत होती, याचं त्याला थोडसं बरंच वाटलं शरयूला बाबाच्या येण्याची चाहूल लागली. त्यानं वॉश घेतला आणि चहा घेत पेपर वाचायला लागला. पण आज नेहमीप्रमाणे घरी आल्या आल्या, 'काय बबड्या, आज काय विशेष?', असं त्यानं शरयूला विच-ारलं नव्हतं. आज सकाळी सुध्दा तो काहीसा अस्वस्थच होता, याची शरयूला पुन्हा आठवण झाली. उशीर झाला तरी अंजलीनं आल्या, आल्या कामाला सुरुवात केली चहाचं आटपल्यावर भाजी आमटी गरम करता, करता शरयूकडून, तिनं दिवसभर काय केलं ते विचारलं. आज अंजली त्याच्याजवळ काहीच बोलली नाही हे निरंजनच्या लक्षात आलं, पण त्याने आपणहून काहीच विषय काढला नाही.

रात्र झाली आणि तो चलबिचल झाला. त्याच्या विचारातल्या कालपासूनच्या अंधुक पण वेदनादायी आठवणींचं रुपांतर हळूहळू अनामिक भितीमध्ये होऊ लागलं त्यानं पुर्वी कधी पाहीलेल्या आणि अनुभवलेल्या त्या प्रसंगाने आणि स्त्री स्पर्शाने जणू आज संपूर्ण

घरच ताब्यात घेतलं आहे असं त्याला वाटायला लागलं, रंजनाने नक्की कुठल्या भावनेनं त्याला मिठी मारली हे त्याला इतक्या वर्षानंतरही ठरवता आलं नव्हतं. त्यावेळी त्याला तिचा स्पर्श 'तसा' वाटला होता. पण त्याला असंही वाटायचं की, स्पर्शाची भाषा कळण्याएवढं आपलं वयच कुठे होतं तेव्हा ! विचारांचा गुंता वाढतच जायचा पण मग एका क्षणी, आपणच त्या परिस्थितीचा गैरफायदा घ्यायचा प्रयत्न केला असंही वाटायचं आणि मग त्याला खूप अपराधी वाटायला लागायचं तो प्रत्येक वेळी नव्यानं विचार करायचा आणि प्रत्येक वेळी अधिकच confused व्हायचा, आणि तो पुन्हा स्वतःलाच दोष देत रहायचा.

बेडवर पडल्या पडल्या निरंजन विचार करीत होता. काही वेळापूर्वी अंजली येऊन त्याच्याशेजारी झोपली होती, निरंजनने हलकेच डोळे उघडले बेडरुममध्ये पुर्ण काळोख होता, नाईट लॅम्प लावायला अंजली विसरली होती, की आज तीने मुद्दामहूनच लावला नव्हता नकळे! तिच्याही सहनशक्तीला मर्यादा आहेत ! खरं तर ती आहे म्हणूनच आपला संसार टिकून आहे. आता यावेळी याविषयी तिच्याजवळ बोलायलाच हवं, पण शरयूचं काय?, तो गोंधळला, पण यावेळी बोलायचंच, असं त्यानं पक्क ठरवून टाकलं, फक्त कसं आणि कुठे बोलायचं याचाच तो डोळे मिटून विचार करीत राहीला आणि रात्र मोठी होत होत पुढे सरकत राहीली. निरंजनची अस्वस्थता अंजलीला डोळे मिटून सुध्दा सहज जाणवत होती. पण त्याला ती लगेच त्याविषयी काहीच विचारणार नव्हती. शरयू आता मोठी झाली होती, अंजलीला तिचा विचार करणंही भाग होतं. आपल्या विचारातली भिती शरयूपर्यंत पोहोचू नये याची खबरदारी ती घेत होती.

खरंतर अंजलीला निरंजनच्या मधूनच अशा वागण्याची सवय झाली होती. तिने ते इतकी वर्ष सहन केलं होतं पण शरयूच्या लक्षात यायला लागण्यापूर्वी निरंजननेच याविषयी स्वतःहून तिच्याशी बोलावं असं अंजलीला मनोमन वाटत होतं. अर्थात त्याबद्दल तिच्या मनात शंकाच होती. आणि म्हणूनच तिच्या मनाची घुसमट होत होती. तिला जाणवल्यापासून, तिने निरंजनच्या मनावरील अनामिक अशुभाची भीती पुसून टाकायचे खूप प्रयत्न केले होते. अनेकवेळा निरंजनकडे तिने वेगवेगळ्या प्रकारे हा विषय काढूनही पाहीला होता, पण त्या बोलण्यातून तिच्या हाती कधी काहीच लागलं नव्हतं. अंजलीच्या विचारांचा वेग वाढला आणि भूतकाळाची वर्ष झरझर तिच्या डोळ्यापुढून सरकत जाऊ लागली. देखणा रुबाबदार, हुशार पण काहीसा अबोल निरंजन तिला प्रथम दर्शनीच आवडला होता त्यामुळे अंजलीच्या घरची परिस्थिती सामान्य असतानासुध्दा उत्तम आर्थिक परिस्थिती असलेल्या निरंजनचा होकार आल्यानंतर खूप आनंद झाला होता. लग्नसुध्दा फारशी कटकट न होता सुरेख पार पडलं, पण लग्न झाल्यानंतर काही दिवसांतच निरंजनच्या मनातील अनामिक भितीची पडछाया अचानक अंजलीसमोर आली आणि ती भांबावूनच गेली.

**भाग दुसरा**

निरंजनबद्दल अंजलीची बाकी काही तक्रार नव्हती. पण तो मोकळेपणाने बोलत नाही, पहिल्यापासूनच ! पण त्याचाही तिने कधी **issue** केला नाही, परिस्थितीने तिला तो समजूतदारपणा आधीच शिकवीला होता. 'असतो एकेकाचा स्वभाव' असं म्हणून ती स्वतःची समजूत काढायची. अगदी हनीमूनवेळच्या त्या प्रसंगानंतर सुद्धा!

म्हणजे त्या दिवशी, नव्हे रात्री, सुरुवातीचा काही वेळ तो नव्या नवऱ्याप्रमाणेच behave करीत होता पण अचानक एका क्षणी त्याला काय झालं कुणास ठाऊक?, तो एकदम न्युट्रल झाला होता. त्यावेळीही तिने त्याला समजून घेतलं होतं, इतकंच नाही तर त्यानंतर काही दिवस स्त्रीसुलभ लाज सोडून त्याकामी तिलाच पुढाकार घ्यावा लागत असे. त्यांच्या त्या संबंधात मोकळेपणा यायला तसे एक दोन महिने जावे लागले होते. लग्नानंतर दिड वर्षात शरयूचा जन्म झाला. नोकरीमुळे अंजलीला शरयूला पाळणाघरात सोडून यावे लागे. पाळणाघर चालवणाऱ्या सुमतीकाकु खुप चांगल्या होत्या, शरयूची छान देखभाल करायच्या त्यामुळे अंजली निर्धास्तपणे शरयूला त्यांच्यावर सोपवून नोकरीला जात होती. सगळं कसं छान होतं तरी मधूनच केव्हातरी निरंजनला काही दिवसांसाठी येणारी ही मानसिक अस्वस्थता हा नेहमीच तिच्या काळजीचा विषय झाला होता.

लग्न होऊन आता १८ वर्ष होत आली होती, तरी अजुनही निरंजनला मधूनच केव्हातरी येणाऱ्या या अस्वस्थतेची तिला उकल झाली नव्हती. आज सकाळपासून तो तिला पुन्हा अस्वस्थ वाटत होता. विचार करता करता अंजली केव्हा झोपेच्या अधीन झाली हे तिलाच कळलं नाही. अंजलीला सकाळी उठायला थोडा उशीरच झाला. आज नक्की लेटमार्क, विचार करता करता ती पटापट आवरत होती. कामात निरंजनने तिला मदत करावी असं वाटत होतं, पण त्याच्या मनस्थितीचा तिला अजूनही काहीच अंदाज लागत नव्हता.

ती ऑफिसला कशीबशी वेळेत पोहोचली. अंजलीच प्रमोशन ड्यू आहे, त्यामुळे ऑफिसमध्ये आता अधिक जबाबदारीनं वागणं आवश्यक होतं, नाहीतर काहीतरी क्षुल्लक् कारणाने प्रमोशन मध्ये विघ्न आलं असतं नेमकं याच वेळी निरंजन अस्वस्थ आहे, अगदी

आताच हे घडायला हे हवं होतं? ती स्वतःशीच चडफडली! का? तिला वाटलं, आपणच का समजून घ्यायचं नेहमी, आपलं करीअर, आनंद याचा कधीच विचार करायचा नाही? नाही, यावेळी निरंजनला याविषयी चांगलं खडसाउनच विचारायचंच असं तिनं ठरवून टाकलं, पण पुन्हा निरंजनचा चांगुलपणा तिच्या आठवणीत आला. शरयूच्या जन्मानंतर काही महिन्यातीलच गोष्ट. बाळ, घर आणि नोकरी सांभाळताना तिची प्रचंड तारांबळ उडत होती, म्हणजे शरयूच्या जन्माने निरंजन प्रचंड खूष होता, बरंचस घरकाम तो स्वतःहून करीत होता, पण तरीही मधूनच क्षणभर चमकून जाणारी त्याच्या नजरेतली अस्वस्थता तिच्या जाणिवेतून सूटत नव्हती. अंजलीने त्याला त्याविषयी विचारलंसुध्दा पण खरं उत्तर मिळालं नाही. काही दिवस छान गेले की परत तो अस्थिर असायचा शेवटी तिचा भयंकर संताप झाला. आणि त्याच तिरमीरीत तीने निरंजनला ऑफिसमध्ये फोन लावला

रिसेप्शनीस्टने फोन घेतला आणि म्हणाली, मॅडम सरांचा exit interview सुरु आहे. तुम्ही थोडा वेळानं कॉल करु शकाल? रिसेप्शनिस्टचे ते शब्द तिच्या डोक्यात शिरायला थोडा वेळ गेला. exit interview? जी कंपनी उभी करण्याकरीता गेली काही वर्ष निरंजनने रक्ताचं पाणी केलं होतं त्या कंपनीत त्याचा exit interview? गेले काही महिने मॅनेजमेंटच्या वागण्यावर निरंजन खूष नाही याची तिला कल्पना होती, काम करुनही, results देऊनही त्याचा बॉस त्याच्याशी कसं dirty politics खेळतो याबाबत तो अंजलीपाशी अनेकदा बोलला होता. पण कंपनी सोडण्याचा निर्णय तो घेईल असं तीला वाटलं नव्हतं. निरंजन कोणताही चुकीचा निर्णय घेणार नाही यावर अंजलीचा विश्वास होता. तो इतक्या मोठ्या मानसिक व्दंव्दातून जात होता आणि आपल्याला त्याची कल्पनाही येऊ नये! या जाणिवेनी ती खजिल झाली आज आपण त्याला बोललो असतं तर? अशी चूक आपल्याकडून पुन्हा होता कामा नये याची खुणगाठ अंजलीनं त्याच वेळी स्वतःशी बांधली होती. आज अंजलीला तो प्रसंग पुन्हा आठवला आणि तिनं आपल्या मनातला राग पुन्हा आवरता घेतला.

ऑफिसमधून बाहेर पडतानाच निरंजनने आज काही झालं तरी अंजलीशी बोलायचं, हे ठरवूनच टाकलं होतं. काहीतरी कारण सांगून तो अंजलीला बाहेर कुठे नेणार होता. तो घरी पोहोचला तेव्हा अंजली नुकतीच घरी येऊन किचनमध्ये चहा करीत होती. बॉश घेऊन तो हॉलमध्ये येऊन बसला तोपर्यंत अंजली दोघांचा चहा घेऊन बाहेर आली. त्यानं अंजलीला विचारलं, शरयू कुठाय? 'तिचं आज extra leacture आहे, तिला घरी यायला आज उशीर होणार आहे, असं म्हणून तिनं टि. व्हि. चालू केला. त्यानं एक दीर्घ श्वास घेतला आणि म्हणाला, 'अंजू मला तुझ्याशी काही बोलायचंय!, फटकन टि. व्हि बंद करुन ती त्याच्याकडे पहात राहीली. तिच्या चेहर्यावरचं आश्चर्यमिश्रीत प्रश्नचिन्ह त्याला अगदी ठळकपणे जाणवलं. काही क्षण विचार करुन निरंजनने अंजली जवळ बोलायला सुरुवात केली इतक्यात डोअर बेल वाजली, अंजलीच्या चेहर्यावर नाराजीची सणसणीत रेषा उमटली, तिनं जाऊन दार उघडलं दारात शरयू उभी होती.

Something is unusaual बाबा आणि आईचा चेहरा पाहून शरयूच्या मनात आल! ती दारातच उभी होती, तू इतक्या लवकर कशी? अंजलीनं तिला विचारलं leacture cancel झालं! ती म्हणाली. अंजलीच्या चेहर्यावर हताशा पसरली, ती त्याच भाव–ाने निरंजनकडे पहात उभी राहीली. निरंजनने काही क्षण विचार केला आणि शरयूकडे पहात म्हणाला, बबड्या बस, मला तुम्हा दोघींजवळ काही बोलायचंय! जवळच्या खुर्चीत बसताना शरयूच्या चेहऱ्यावरचं प्रश्नचिन्ह अधिक गडद झालं.

काही क्षण थांबून अंजलीकडे तो म्हणाला, 'अंजू मी तुझी क्षमा मागतो, कारण हे सगळं मी तुला यापुर्वीच सांगायला हवं होतं, यावर अंजली काही न बोलता गप्प राहिली. शरयू आता मात्र थोडी अधिकच अस्वस्थ झाली होती काही क्षण शांततेचे गेले. निरंजनने एक दीर्घ श्वास घेतला शब्द गोळा केले आणि शांतपणे अगदी पहिल्यापासून आत्तेच्या निधनानंतरची सर्व घटना आणि त्यानंतरची त्याची मनस्थिती याविषयी तपशिलवार आणि काहीही हातचं न राखता सांगीतलं. अंजली पुर्ण गोंधळली होती, यावर काय बोलावं हेच तिला सुचत नव्हतं. शरयू निरंजनकडे एक टक पहात होती, तिच्या चेहर्यावर एक भलं मोठं प्रश्नचिन्ह दिसत होतं.

शरयू म्हणाली, 'बाबा, तुला काय सांगायचंय नक्की'?, एक क्षण निरंजनने अंजलीकडे पाहीलं आणि मग तो शरयूला म्हणाला, 'रंजूने मला जवळ घेतल्यावर माझ्या मनात तसे विचार आले, हे पाप वाटतंय मला', तसे म्हणजे? शरयूने शांतपणे विच–ारलं, त्यावर निरंजन थोड्या मोठ्यानंच म्हणाला, तसे म्हणजे शारिरिक संबंधांचे, सेक्सविषयक ! तो तसं म्हणाला आणि गप्प झाला. शरयू त्याच्याकडे स्थिर नजरेनी पहात राहीली मग काही क्षणांनी जवळजवळ ओरडूनच म्हणाली, baba you are a big fool! हे ऐकताच अंजली तिला दरडावत म्हणाली, शरयू काय बोलत्येयस तू? Yes, I said, what I mean!. शरयू शांतपणानं म्हणाली. यावर अंजली तावातावानं काही बोलणार इतक्यात निरंजनने तिला थांबवलं आणि तो शरयूला म्हणाला, बबड्या, तुला काय म्हणायचंय नक्की?

बाबा एखाद्या १५,१६ वर्षांच्या मुलाला एखाद्या बाईनं किंवा

मुलीने मिठी मारल्यावर त्यानं असं respond करणं हे काही तुला वाटतं इतकं रलपीरश्र नाही. It is natural त्याला पाप पुण्याची लेबलं नको लावू. बाबा, असं काही नसतं! It always individual and also depend upon that specific time. तूमच्या पिढीचा काय problem आहे म्हायत्येय, तुम्ही एखादा प्रश्न उगाचच complicated करता. अंजली, 'ही आपलीच मुलगी बोलत्येय ना?' असा विचार करीत शरयूकडे एकटक पहात होती. शरयू पूढे बोलतंच राहीली, 'बाबा तू फक्त तिच्या किंवा तुझ्या भावनांचा विचार करुच नकोस , शरीराचा विचार कर तिने कुठल्या intention ने तुला मिठी मारली, ते तुला माहीत नाही, फक्त त्यावेळी तुझ्या मनात sex चा feel आला म्हणून तू स्वतःला guilty मानतोयस? काय हे? खरं तर तू proud feel करायला हवंस! कारण तुझ्याच भाषेत सांगायचं तर त्या अवस्थेत सुध्दा तू शरीराच्या मोहातून बाजूला झालास आणि घराबाहेर जाऊन थांबलास. हे तू का लक्षात घेत नाहीस?, बाबा, अती चांगुलपणा, हा वाईटच. कारण बाकी जग तुमच्या विचारांनी वागत नाही, त्यामुळे बर्याच वेळा तुम्हालाच व्रास सोस–ावा लागतो ! स्वतःला कोसणं थांबव कारण तुझ्या मनातल्या या guilt ला काहीच solution नाहीए you can't change past. Think about present. भडाभडा बोलून शरयू काही वेळ थांबली. काही वेळानं निरंजनकडे स्थिर नजरेनं पहात ती म्हणाली, बाबा, आणखी एक, मुलगी म्हणून नाही, बाई म्हणून सांगते, तिला त्यावेळी तुझा तो स्पर्श नको असता, तर त्या क्षणाला तिनेच तुला बाजुला ढकलला असता. ती तुझ्यापेक्षा मोठी होती, थोबाड फोडलं असतं तिने तुझं.

शरयू बोलायची थांबली, तिच्या चेहऱ्यावर खूप अस्वस्थता साचून राहीली होती. काही क्षण थांबून ती धुसफूसत्या सुरात म्हणाली, अती आदर्शाच्या ओझ्याखाली स्वतःला उगाचच आरोपीच्या पिंजरयात उभं करणं हा मुर्खपणा वाटतो मला. बाबा तू ऐकलंस ते भेसूर रडणं त्या मुलीचं नव्हतं, तुझ्याच अंर्तमनाचं होतं कारण, इतकी वर्ष न केलेल्या पापाची शिक्षा तू भोगत होतास आणि मम्मालासुद्धा विनाकारण भोगायला लावत होतास. you fool, big fool! असं ती पुन्हा एकदा अधिक मोठ्या त्राग्यानं म्हणाली आणि शांतपणे सॅक घेऊन आपल्या खोलीकडे निघून गेली. मोकळेपणा होता आणि अंजली आपल्या मुलीचं एक वेगळंच रूप आज अनुभवत होती.

******



सर्व सभासद, ठेवीदार व ग्राहकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

# रत्नागिरी अर्बन को-ऑप. बँक लि., रत्नागिरी.

## रत्नागिरी अर्बन को-ऑप. बँक लि., रत्नागिरी.

मुख्य कार्यालय : १२, प्रमिला कॉम्प्लेक्स, कुवारबांव (रत्नागिरी) फोन नं. (०२३५२) २२९६२१, २२९७७८

Email - rucb@rediffmail.com

## संचालक मंडळ

(सन २०२४-२५ ते २०२९-३०)

**ॲड.सुजित भागोजी झिमण**
संस्थापक / अध्यक्ष

**श्री.रविंद्र राजका कांबळे**
उपाध्यक्ष

### संचालक

श्री. सुनील गोपाळ नावले
डॉ. प्रतिक सुजित झिमण
श्री. गौरव सुर्यकांत नाखरेकर
श्री. दत्तात्रय शंकर पायरे
श्री. भिकाजी लक्ष्मण फुटक
श्री. गजानन धर्माजी धनावडे
श्री. विजय दौलत कांबळे
श्री. अशोक रामचंद्र साळुंखे
श्रीमती अर्पिता बसंत शितप

### व्यवस्थापक

श्री. नानासाहेब दाजी तुपे

### विधी सल्लागार

ॲड्.श्री.अमितकुमार अ. सोलकर
ॲड्.श्री.निलेश एन्. नलावडे

**अंतर्गत लेखा परिक्षक : श्री.अमित रामचंद्र नेवरेकर**

**सराफ : श्री.चंद्रशेखर गजानन सागवेकर**

### बँकर्स

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई, मुख्य शाखा.
रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., रत्नागिरी, मुख्य व कुवारबांव शाखा.
भारतीय स्टेट बँक, रत्नागिरी शाखा.
आयडीबीआय बँक, रत्नागिरी शाखा.
बँक ऑफ बडोदा, रत्नागिरी शाखा,
येस बँक, रत्नागिरी शाखा.

बँकेच्या कामकाजाच्या वेळा : सोमवार ते शुक्रवार : सकाळी १०.०० ते ४.००
प्रत्येक पहिला, तिसरा व पाचवा शनिवार : सकाळी १०.०० ते ४.००

**दुसरा व चौथा शनिवार व रविवार तथा सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी बँक बंद राहील.**

# कविता विभाग

## चेहऱ्यांचा बाजार



हीच आहेत का ती माणसे?
नावं तर तिच आहेत!
चेहरे मात्र वेगळेच दिसताहेत आज त्यांचे!
कुणाकुणाला तर चेहरेच नाहीत!
पहिल्यापासूनच यांना चेहरे नाहीत?
हरवलेत ते? की तासलेत कुणी ?

आणि निघालेत कुठे हे सगळे, इतक्या लगाबिगीनं?
अरे बापरे इथे तर चेहऱ्यांचा बाजार पण भरलाय
केवढी झुंबड उडालीय!
मगाची ती बिन चेहऱ्याची माणसंच असावीत ही!
जो तो पारखून घेतोय एकेक चेहरा

त्या तिकडे पलिकडे मात्र
चार दोनच चेहरे दिसताहेत अगदी वेगळे
बोली लागलीय वाटतं त्यांची
जावं का आपण तिकडे!
घ्यावा का एखादा सुंदर देखणा चेहरा?
तसाही कंटाळा आलाय आता
आपल्यालाही या चेहऱ्याचा
लावावी का बोली?

खिशात तर पैसे ही आहेत आपल्या
कमी पडले तर क्रेडिट कार्ड डेबिट कार्ड पण आहेच
काही तरी बोर्ड दिसतोय तिथे
जाऊन वाचूया तरी
'इथे फक्त बिन चेहऱ्याच्या माणसांनाच प्रवेश दिला जाईल'
'ज्यांच्याकडे स्वत:चे चेहरे आहेत
त्यांनी ते तिथे काउंटर वर जमा करून यावे'
पण तो कसा उतरवायचा ते मात्र लिहिलं नाहीये तिथे
म्हणजे बाजार फार जुना दिसतोय तर
आणि प्रत्येक खरेदीदार रुळलेला
चेहरा नसतानाही एकेक जण आत चाललाय तेही न धडपडता
आणि चेहरे असलेले
सराईतपणे काऊंटरवर चेहरे उतरवून आत निघालेत

मी मात्र अगदीच नवखा
माहीतच नाही मला चेहरा कसा उतरवतात ते?
आणि त्या जागी दुसरा चेहरा कसा बसवतात ते?
आता कळलं लोक मला बघताच
आपापसात का कुजबुजतात ते!
आणि माझी पाठ वळताच माझ्यावर का हसतात ते!

**संगीता अरबुने**

# 'शोध'

मी फिरत असते
एका गल्लीतून
दुसऱ्या गल्लीत
अनवट वाटेवरून
मला माझ्या
घराकडे घेऊन जाणारी
एकही वाट
सापडतच नाही
मला माझं घर
सापडतच नाही
मी सांगत राहते
खाणाखुणा
रस्त्यावरील लोकांना
रिक्षा, टांगेवाल्यांना
पण तेही असतात
पत्त्याबाबत गोंधळलेले
मी गुगल मॅपवर शोधते
माझ्या घराचं लोकेशन
पण तरीही सापडत नाही
मला माझंच घर
मी रडते, पडते, धडपडते
शेवटी थकून जागी होते
आता डोळ्यासमोर
लख्ख उभा राहतो
माझं बालपण
जपून ठेवलेला
काळाच्या ओघात
जमिनदोस्त झालेला
माझा ऐसपैस
दोन मजली जिवंत वाडा



सगळं माहिती असूनही
मन आजही शोधतंय
जगण्यातील तोच निवांतपणा
जो आताशा हरवलेला आहे
का आहे हा माझा स्व-शोध
श्न तर संपत नाहीत
उत्तरंही सापडत नाही
वप्नं झोपुही देत नाहीत
नाचा प्रवास तर अविरत

**ज्योती कपिले**

# स्नेह म्हणू प्रेम म्हणू

स्नेह म्हणू प्रेम म्हणू प्रित म्हणू की हे स्नेहील मैत्र
तुझी माझी भेट आगळी जगावेगळी जसा मोहरलेला चैत्र

तुज आठवता चाफा बहरे जाईजुईची वेल मोहरे
बकुळ चांदण्या सावळाल्या गंधामधुनी गुपित उलगडे

तू येता पाउलवाटा गूज सांगती चहू दिशांना
हर्षाने मग त्या वाटेवर सांडे गुलमोहरी रंगसडे

तुझी भेट जणू कृष्णवेणू राधेलाही स्फुरते गाणे
त्या गाण्याच्या सुरावटीतुनी अलौकिकसे प्रेम पाझरे

तुज सुस्वर राग म्हणू अनुराग म्हणू
सुस्मित म्हणू की स्मितछाया
मनमीत तू मनप्रीत तू स्वरगंधर्व तू स्वरदूत तू,
तू माझ्या कवनातील गीतमाया

**प्रिया कालिका बापट**

# टाहो

उठल्यापासून ती पिंजतच असते
कामाचा पसारा
इतरांसाठी सोयीच्या पायघड्या घालीत.
धावतच पकडावी लागते बस –जिवाच्या आकांताने
तिथेही टाळता येत नाही स्पर्शाचं घसटणं
ते सारं खसखसून पुसावसं वाटतं तिला
पण ती स्वत:लाच घेते आक्रसून

लोकलच्या गर्दीतील घुसमट,
ऑफिसला पोहोचेपर्यंतची फरफट
भोवतालचे विखारी नजरांचे साप
उपसावा लागणारा कामाचा व्याप
ती मध्यान्हीच जाते कोमेजून



काही सुखद क्षणांशी खेळत असतानाच
मध्येच आठवत राहतात तिला
काही जुने संदर्भ – टोचत राहणारे
विस्मृतीच्या धुक्यातही कासावीस करणारे,
गुलाबाच्या ताटव्यात कचकन् खुपणा–या काट्यासारखे
अन् एकाएकी येतं तिला गदगदून

शरीर थकलं तरी
परतीचे रस्ते खुणावतच असतात तिला
आतुर डोळे तिची वाट  पाहत असतात
पुन्हा उत्साहाची मोट बांधून
घरट्याकडे वळू लागतात तिची पावलं,
घेऊन ऊर्जेचा श्वास भरभरून

घरात सगळेच थकलेले, एक ती सोडून
सा–यांचं दाणा–पाणी तिच्याच हातून
घराचा परिघ तिनेच धरायचा तोलून,
स्वत:चा तोल ढळू न देता
शिवाय... रात्री शेजेलाही
तिनेच साथ द्यायची न कुरकुरता
तिला टाहो फोडावासा वाटतो आक्रंदून!


**अनुराधा नेरूरकर**

# प्रकाशाची वाट

वठलेल्या झाडालाही फुटतेच पालवी
जगण्याच्या निग्रहातून
नदीलाही एकदाचा सापडतोच मार्ग
आंतरिक धडपडीतून.

पाखरू बांधतंच घरटं
मोठ्या शिकस्तीने
काडी काडी जमवून.

आभाळालाही फुटतोच ना पान्हा
व्याकूळ धरेला
तग धरताना पाहून.



आपल्यालाही असंच
झाडासारखं रुजून येता आलं,
नदीसारखं पुढे जाता आलं,
आभाळासारखं विशाल होता आलं
अन् पाखरासारखं
चिवटपणे जगण्याला तोंड देता आलं की,
जगणंही आपल्याकडं हरखून पाहतं
अशावेळी अंगावर धावणाऱ्या अंधारालाही
निक्षून परतवून लावता येतं.

याच विश्वासानं दिनरात राबून,
जगण्याशी दोन हात करून,
आई मुलाला शाळेत धाडतेय
सूर्यासारखा तेजःपूंज व्हायला
जो बुद्धिच्या तेजाने
काळोखात बुडालेल्या गावाला
प्रकाशाचं नवं नाव देईल.

**एकनाथ आव्हाड**



# खात्री आहे...

मनाच्या फांदीवरचे कवितेचे पक्षी
उडून गेले असले तरी
येतीलच कधी नं कधी परतून
त्याच मनाच्या फांदीवर.. खात्री आहे...
मनाच्या डोहात डोहाच्या तळात
संवेदनांचं पाणी अजून शिल्लक आहे!
मला माहितीय – माझी ही व्यथा खूप क्षुल्लक आहे!

एका ऋतूने शाल पांघरावी
अन दुसऱ्या ऋतूने हातात ढाल द्यावी
इतकं बेताल आयुष्य
कोणत्याही हिरवळीच्या डायरीत लिहावं
अन कोणत्या समुद्राच्या शाईने ते छापावं,
हा प्रश्न पडतो मला कधीकधी!

पण तरीही
मला खात्री आहे –
मनाचा डोह डुचमळतोच कधीतरी
चांदण्या चमकतातच पहाटेच्या प्रहरी
तसे
कवितेचे उडून गेलेले पक्षी
फिरतातच माघारी... कधीतरी...
खात्री आहे...

**कीर्ती पाटसकर**

# तुला मी.. मला

प्रथम पाहताक्षणीच
तुझे गोंडस रूप
कसं सांगू तुला
किती आला होता मला हुरूप

हळूहळू तू मला
समजत गेलास
तसतसे मी म्हणू लागले
का असा वागलास

तुझा तर नेहमीच
असायचा अट्टाहास
सदासर्वकाळ मी धरावा
केवळ तुझा नी तुझाच ध्यास

मी ही मला सदा प्रिय
हे होतं जन्मापासून माझंही तत्व
पण तू कधी जाणलं नाहीस
माझंही आहे एक वेगळं अस्तित्व

आदर द्यावा आदर घ्यावा
हा साधा सरळ व्यवहार
तरीसुद्धा किती तो
सहजीवनाचा भार

सहजीवन हे आपलं
प्रिय हवं एकमेकाला
तुला मी मला तू
आपणंच आपल्याला

नको मनं दुखवायला
एवढंच वाक्य आळवू रोज मनात
अवघं जगणंच सोप्पं होऊन
चैतन्य येईल आपल्या जगण्यात

**डॉ. सुरेखा धनावडे**

# ...सेपियनची सल

पाण्याला भोवळ आलीय
निपचीत पडलंय ते
डोहाच्या खोलीत.
कुणी तरी लावायला हवेत
ऑक्सिजनच्या श्वासाचे दोन तीन थेंब
त्याच्या नाकाला

ऐन सातव्या महिन्यात
नदीच्या गर्भात माजलीय खळबळ
केमिकलच्या जनुकांची.
तेवीसच्या तेवीस जोड्या
अशा हरामखोर कशा निपजल्या ?

शेतांना मारलाय लकवा
झाडांना आलाय थकवा
गावं सैर भैर झालीत
शहरं वांझ गर्दी व्यालीत

बिबट्यांचा वावर वाढलाय
भूकेच्या गर्द वस्तीत
माजलेत लांडगे
सत्तेच्या मस्तीत

जंगलं गहाण पडलीत
गर्भपाताच्या व्यापार्यांकडे
अधिकृतपणे

पोळ्याच्या दिवशीच
बैलानं धाडलीत वासरं
कसायाकडे

...सेपियन रडत रडत
ही कथा सांगत होता
होमो इरेक्टसला.
अंधार्या गुहेत.
खुणेच्या भाषेत

**सुदेश मालवणकर**

# पाझर

विहिरीच्या पाझरावरच टिकून असते का
अस्तित्व तिचे
पाझर हंगामी
पाझर बारमाही
पाझर दमलेले
पाझर शिणलेले
कधी उत्साही खळखळणारे
कधी बळेच पाझरणारे
पाझर असतात जिवंतपणाचे लक्षण
म्हणूनच पाणीदार विहिरीला असतो
हिरवाईचा काठपदर
पण
कधीतरी पाझर कोरडतात
आतल्या आत शुष्क होतात
ओलाव्याचं नामोनिशान मिटवून
वाळवंटी रूप घेतात
तसा, नूरच बदलून जातो विहिरीचा
भकासपणाच्या संगतीने
दिवस काढण्याची वेळ येते तिच्यावर
विहिरीचा मालक नि
डोकावून पाहणारा आगंतुक
काही नाही राहिले तिच्यात, बिनकामी झाली
बुजवायला हवी आता
अशी हाळी देऊन
शिक्कामोर्तब करतात तिच्या मरणावर
पण खरच मरते का विहिर
बुजवली तरीही सृजनाच्या
नैसर्गिक उर्मीने कुठे न कुठे
पाझरत जाते विहिर
हिरवे कोंब पेरत जाते विहिर

**माधुरी मरकड**

# आजकाल माझे हे



स्वप्नांसोबत जगायचे
म्हटले तर
तसे कठीणच असते

ऊन वारा
वादळ पावसात
प्रचंड गारठ्यात

आयुष्य पेलताना
किती दमछाक होते रोजंच
स्वप्नपूर्तीचा तर विचारही
उडून गेलेला असतो मनातनं

हे धकाधकीचे दिवस
या जीवघेण्या रात्री तर
कधी संपतच नाहीत
मुक्त श्वास घेणेही
जमतच नाही

कधी तरी निवांत बसावे
वर्तमानाच्या काठावर
असे खूपदा मनात येते

पण भूतकाळ
झोपू देत नाही
आणि भविष्यकाळही
अस्वस्थच
दिसत असतो

अलीकडे आयुष्याची उदास
संध्याकाळ भेटते आहे

तिला मी टाळूही
शकत नाही की,
तिच्याशी संवादही
करू इच्छित नाही
तरीही ती माझा पिच्छा
सोडतच नाहीय

स्वप्ने रोज येताहेत भेटायला
या स्वप्नांचे मी काय करू?

माझा सभोवताल पेटलाय
आणि माझ्या डोळ्यातले
पाणीही गायब झालेय

पुन्हापुन्हा माझी होतेय
धगधगती अग्निपरीक्षा

तर असे हे माझे जगणे
स्वप्नांच्या भ्रमात उडत राहू की,
आयुष्याला मिठीत घेऊ

आजकाल माझे
हेअस्वस्थपण
अधिकच घेरून आहेय

या चक्रव्यूहातनं बाहेर
पडण्यातच आयुष्य धडपडते आहे

तुर्त स्वप्नांचा विचारच
मी सोडून दिलेला आहेय

**शशिकांत हिंगोणेकर**

# भारतमाता

भारत 'मातेचा' झाला आज दारुण पराभव
चांगलेच फेडले लेकरांनी तिच्या संस्कारांचे ऋण

' सीता ' रामाची दुष्ट रावणाने पळविली
लंका नाही हो !
यांनी केवळ मेणबत्तीच जाळली

गौतमीचा सातकर्णी अन जिजाऊंचा शिवबा
परि मातृभक्तांचा घेतला पुरुषी अहंकाराने ताबा

कुठे आंबेडकर- फुल्यांची स्त्रीमुक्ती चळवळ
अन् आज ?
मंत्र्या - संत्र्यांची निव्वळ योजनांची वळवळ

पेटेल रान थोडे दिवस मग पडेल थंड सारे
प्रवृत्ती तीच राहणार अन वाहणार तेच वारे !

कुस्करती कळ्या कित्येक आजही बंद दाराआड
पण स्त्रीचं सांगते स्त्रीला असच आयुष्य काढ

झाशीची राणी अन् ताराऊ नाही आठवत तुला ?
जी आज समजतेस स्वतःच स्वतःला उगा अबला

देवीची मूर्ती पुजण्याचा करती केवळ दिखाऊ आचार
परि प्रसंगी राक्षसा घालती पाठीशी सारेच लाचार

बघ एकदा निरखून भारतमातेकडे ऐक आक्रोश
फेडतील साडी , करतील जखमा तरी देतील स्त्रीलाच दोष

बाई, सातच्या आत घरात कोंड स्वतःला , जाऊ नको दूर
सांगता नाही ग येत, कधी फाडतील लांडगे तुझा कोवळा उर !

एकच सांगते ऐक माझं ,
शस्त्र उचल द्रौपदी मार दुर्योधना , नाही येणार वाचवाया केशव
रक्तरंजित तांडव कर कालिके नाही आता थांबवणार महादेव !

**जान्हवी जोशी**

# घे भरारी प्राणसई !

पाखरा परि जीवन आपुले
उड तू स्वच्छंद
नको चिंता नको विचार
हो जराशी धुंद

अडकूनी काय मिळणार ग
तोड ते बंधन
करुनी घे मनावर तुझिया
मुक्तपणाचे गोंदण

तू समुद्र उधाणला कशाला
होतेस ओहोळ
नको बदलू स्वतःला नको
तो परिपूर्णतेचा घोळ

नसेल जीवन स्वप्नवत तरी
झुल त्या हिंदोळ्यावर
बघ टाचेखाली येतील
संकटं नाचतील तुझ्या तालावर


लपूनी कशाला राहायचे
म्हणते , कुढत का जगायचे
सोडून जायचेच आहे परि
आज काळजीने मरायचे ?

बघ तुझ्याच विजयाने
दुमदुमतील दिशा दाही
स्वतःवर ठेवुनी विश्वास घे
भरारी प्राणसई !

**जान्हवी सचिन जोशी**

# झाड...

झाड उभं असतं
मातीला घट्ट पकडून
मुळ्या आतल्याआत जखडून...
वाळवी लागते
किड अंगभर पसरते
फांद्या तुटतात कधी सहजच
पिवळी पानं गळतात नकळत
तरीही झाड उभं असतं डोक्यावर ऊन घेत
वाटसरूंना सावली देत....
फुलोरा फुलतो
फांदी फांदी फळांनी लदबदते
मधमाशा भुंगे शोषतात मध
वारा वाहून नेतो सुगंध रानभर
गुराख्याची शीळ घुमत असते शिवारात
झाड ऐकत असतं डोळे मिटून
सगळ्यांचं दुःख घेतं वाटून....
ताटकळत उभं असतं ते
पाखरांची वाट पाहत
एकटेपणाचं गाणं गात.........
झाडावर....
झुला झुलतो लेकरांचा
खोपा असतो सुगरणीचा
मधमाशांचं मोहळ असतं
कावळ्याचही असतं घरटं....
पोपटांच्या ढोलीत राहतात विंचू-साप...
रातकिड्यांची छोटुली घरंही असतात खोडावर
सुरवंटांचाही अधिवास असतो पानांवर...
कोळी झुलत असतो आपल्याच जाळ्यांवर...
झाडाच्या मुळाशी मुंग्या जमवतात खाऊ
खारूताईंची चिकचिक, कोंघ्यांची क्वांय क्वांय
पावशाचा पेर्तेव्हा, घुबडाचा घुत्कार कधीकधी



असे बरेच संसार नांदतात बिनदिक्कत झाडावर...
झाडाकडून शिकावं
संकटांवर मात करणं
उन वारा पावसात तग धरणं.....
मातीला घट्ट पकडून आभाळाकडं झेपावणं.....
ओरबाडलं कुणी तरीही देत जाणं........
नानारंगी पाखरांशी खेळ मांडून भेद विसरणं....
वावटळींशी चिवट-चिवट झुंज देणं.....
प्रसंगी विजेचाही घाव सोसणं.....
लढणं त्याचं ब्रीद असतं......
म्हणूनच झाड हिरवं असतं.......म्हणूनच झाड हिरवं असतं.......

**डॉ. सखाराम डाखोरे**

# बाप



बापाच्या फोटोकडे बघताना
सहजच पानवतात
डोळे लेकाचे..
फोटोवर असलेला चंदनी हार
काळीज कुरतवडतो त्याचे...

डोक्यावर छप्पर नाही आता
ही भावना उफाळून येते परत ..
दोन शब्द धाकाचे
दोन शब्द आधाराचे
एवढीच अपेक्षा होती खरंतर

आता तूच मोठा आहेस घरात
तुझ्याच खांद्यावर जबाबदाऱ्यांचा भार
बजावत राहतो तो स्वतः ला मनभर
पण भरूनच येते मन
अलगद पानवतात डोळे
छप्पर होणं नसतंच सोपं
छपरालाही आस असते
एका विशाल वृक्षाच्या सावलीची
उन्हा पावसात घोरपळताना
दोन घटका मायेची

फोटो वरचा चंदनी हार
नीट करण्याच्या बहाण्याने
मुलगा पुन्हा स्पर्शून घेतो
बापाची छाती गळा
दोन सेकंदासाठी मारून घेतो
उराउरी मिठी
कदाचित जगाशी लढण्याची शक्ती
एकवटत असेल तो..
बाप जिवंत असतो मुलाच्या श्वासाश्वासात ..
मुलाच्या शेवटच्या श्वासापर्यंत ..
मर्त्य, अमर्त्याचे कोडे सुटेपर्यंत

**माधुरी मरकड**


# शरीर बनाम चरबी

जितेजागतेपणी
सहन होत नाही आम्हाला
आमच्या शरीरावर चढलेली
अवाजवी थुलथुलीत चरबी
साधारणतः शरीर योग्य प्रमाणात
लोकांच्या नजरेसमोर होऊ द्यायचे असते दाखल
अपरिहार्य ठरते तेव्हा
वृक्षासारखे ठिकठिकाणी फांद्या छाटून
अवयवांना मर्यादित करणेही होत नाही शक्य
उपाय धुंडाळण्यात हळूहळू होत जातो
आम्ही थोडे चिंताग्रस्त, थोडे गंभीर
लाभ होईल वा न होईल
ते स्लिम बनवायच्या मिळवत जातो
ऑनलाईन टिप्स
शरीर नाशवंत आहे हे माहित असूनही
येवून ठेपतो 'अलर्ट'वर..
शरीरातूनच होते
प्रेमाचे स्पर्शजन्य संप्रेषण अथांग
एवढेच निमित्त पुरेसे हवेसे वाटते
आणि खटाटोप चालतो चरबी नियंत्रित करण्याचा
कुणाचे तरी थट्टेने हसणेही नियंत्रित करण्याचा

मन कधी नाकारत नाही
शरीर सुदृढ आणि सुंदर जपण्याचा मंत्र
शरीरही साधत नाही केवळ शरीराशीच गहन संपर्क
ते बोलते आपल्या मनातील सुगंधाची आसक्त भाषा
जगण्याच्या ह्या एकाच संदर्भात
जपावेसे वाटते शरीर दिलखेचक, आकर्षक वगैरे..

शरीरात कुठेतरी लपून आहे एक तरल तथ्य..
जे होते नवी पिढी अवतीर्ण करण्यासाठी
बिनपर्यायी अंश
तात्पर्य,
कोणतेच शरीर नसते दुय्यम-तिय्यम महत्त्वाचे
वा दुर्लक्षित.. ढोबळ ठेवण्याजोगे..
शरीर बनाम चरबी
असतेच असे बोलके समीकरण,
टाळण्यापेक्षा जे थोडे घेतले पाहिजे समजून
प्रेमात नक्की उमलते उत्साहाने ते सर्वंकष स्पंदन
ज्यात शरीरही असते मनासंगे 'एक खयाल, एक धून'..!


**सतीश लोथे. नाशिक**



Shree Mauli Developers
A Member of CREDAI Ratnagiri
अशी घरे निसर्गसुंदर कोकणात उपलब्ध आहेत श्री माऊली डेव्हलपर्सच्या भव्य संकुलात!
७० टक्क्यांहून अधिक जागांचे बुकिंग झाले. मोजक्याच जागा शिल्लक. त्वरित संपर्क साधा.
सान्निध्य सिंधुसागराचे,
सान्निध्य स्वयंभू गणेशाचे,
सान्निध्य कविकुलगुरू केशवसुतांचे....
मुंबई-पुणेकरांना हवे असते सेकंड होम,
तर कोकणवासीयांना हवे असते हक्काचे घर!
स्वप्नातील संकुल
सामूहिक आणि वैयक्तिक विविध अद्ययावत सोयीसुविधांसह वन आरके, वन बीएचके, टू बीएचके, दुकाने उपलब्ध
साइटचा पत्ता :
स्वामी प्रसाद अपार्टमेंट
कवि केशवसुत स्मारकाजवळ, सागरी महामार्ग, मालगुंड, रत्नागिरी
वास्तवतेकडे वाटचाल
कार्यालय :
दुकान नं. १३, स्वामी स्वरूपानंद कॉम्प्लेक्स, गोखले नाका, रत्नागिरी
हिराकांत जी. साळवी (९४२११३७८२९)
मनोज पाटणकर (९४२०५ २६४०१)
Maha Rera No: P52800024369
maharera.mahaonline.gov.in
वेबसाइट :
htttps://shreemaulidevelopers.com
एटीएम ATM
RDCC

# जयंती

प्रा. प्रकाश नाईक



**संजयनं मध्येच तोंड घातलं, भाव म्हणतुय ते खरं हाय. मागच्या हिशेबाचं बघू सवडीनं. आता टाईम बी लई न्हाय. अन्ना पैसं देणार हायती.तवा करूया जयंती. सगळ्यांनी एकमेकांच्या तोंडाकडे बघितलं. बऱ्याच जणांना संजयचं पटलं होतं. आपल्याला पट्टी काढावी लागत नाही म्हणल्यावर संजयच्या प्रस्तावला अनुकूल वातावरण तयार झालं. परिस्थितीचा अंदाज बघून भीमा भाऊनं सगळ्यांना समजावण्याच्या सुरात म्हटलं, आता बाकीचा काय वाडीचार लावू नका. संजबा जे करंल त्येला पाठिंबा देऊया. गोळ्यामेळ्यानं जयंती करूया. भाऊच्या या बोलण्यावर सगळ्यांनी माना डोलवल्या. तेवढ्यात शिवा दाभाडेचा किशोर उठला आणि म्हणाला, जयंती करण्याबद्दल काय हरकत न्हाई. पण अण्णाच्या पैशावर का जयंती करायची? इतकी वर्ष तेच केले की आपण. दुसऱ्याच्या तुकड्यावर जगत आलो. अजून पण तेच करायचं का? अण्णा आमदारकी लढवणार म्हणून आपल्याला पैसे देणार आणि आपण जयंती करणार हे मला काय पटलं नाही बाबा. आण्णा आपल्याला मिंद्यात ठेवायला बघतोय हे लक्षात ठेवा.**


जून महिना संपत आला होता. पाऊस बऱ्यापैकी सुरू झालेला. मांग वाड्यात बेंदराची लगबग सुरू झाली होती. सगळ्यांच्या दरात मुळुशीचा ढिग पडला होता. बायका- पोरं, म्हातारी-कोतारी सगळी वळायच्या मागं लागली होती. मुळशी वळून झाली की, पिंपळाची पान आणून ओवायचं काम सुरू होणार होतं. मांग वाड्यातली माणसं झाडून कामाला लागली होती.बेंदराला तोरणं बांधून बेरा मागायचा. जे काही भात मिळणार त्यावर वर्ष काढायचं.त्यामुळं बेंदरादिवशी तोरण घेऊन बायका-पोरांसह बेरा मागायला जायचं हे गणित प्रत्येकाच्या डोक्यात होतं. मांग वाड्यातल्या प्रत्येक घरात तोरण वळायचं काम सुरू होतं. अशाच एका संध्याकाळी लोखंड्याचा संजय भीमाभाऊच्या घरी आला. भाऊ, त्याची बायको चंद्रा, मुलगा रवी मुळूशी वळत बसले होते.

चुलीवर ठेवलेल्या भाताखाली लहानगी अर्चना जाळ घालत बसली होती. दारात म्हशीला बांधली होती.तिच्या शेणामुताचा वास पार घरात येत होता.मुळूशीच्या कोपरीच्या ढिगाला सरकून संजयनं बसायला जागा केली. बसत बसतच तो भाऊला म्हणाला, भाव, आवरतंय का न्हाय...?

कुटला हात लागतुय बाबा. म्हस यालीया. तिच्या येटातनं टाईम कुटं घावतुय? करतुय आपलं हळूहळू. भाऊ म्हणाला.

बरं ते नव्हं मुद्द्याला हात घालत संजय म्हणाला, अण्णा भाऊ साठे जयंती जवळ आलीय. तव्हा काहीतरी नियोजन करायला पायजेल. औंदा करायची का न्हाई जयंती?

आरं करायची का न्हाई म्हजी? जयंती दणक्यात करायची .समद्या गावानं तोंडात बोटं घातली पायजेत. काडा पट्टी .अजून



महिना हाय न्हवं? भाऊनं विचारलं. भाऊचा प्रतिसाद बघून संजय हरकला. पुढे सरकत म्हणाला, भाव, आगा पट्टीची काय गरज न्हाय. आवंदा हाय निवडनूक. तवा पट्टीची काय गरज न्हाय. अण्णा म्हनल्यात जयंती जोरात करा. लागल त्यो खर्च मी घालतो. काय भ्याच काम न्हाय.

मजी समदं पैसं अण्णा देणार म्हन की! भाऊनं विचारलं.

व्हय.बँजो, मंडप, स्टेज आणि दुतवानाची सोय करतो म्हनल्यात आन्ना संजयने सांगितलं .

कवा गाट पडलीती? भाऊनं मुळशीची कोपरी बाजूला टाकत विचारलं.

काल कॉलेजवर गाट पडली. मी आणि रंगा हुतो. दोगास्नी बुलवून सांगितलंय अन्नांनी. आता आन्ना आमदारकीला उभा रा–हणार हायतं. मत द्याच्या वक्ताला बगू काय करायचं. पन ह्येंचं काय घ्याचं?देत्यात तर घिवयाकी.आनि करुया जयंती. अर्चनानं दिलेला चहा बशीत ओतत संजय म्हणाला.

संजयच्या म्हणण्याला भीमाभाऊंनं दुजोरा दिला. चहा पिऊन संजय बाहेर पडला. संजय म्हणजे केरू लोखंडेचा मधला पोरगा. गावकीची काम करत केरू लोखंडेनं पोरांच्या शिक्षणाचं साठी बरंच केलं. थोरला विजय अण्णाच्या शाळेत शिपाई म्हणून ला–गला तर धाकटा सुरेश कोल्हापुरात एका खाजगी कंपनीत क्लार्क म्हणून लागला. मधला संजय फार काही शिकला नाही पण बारावी नंतर पांढरी कपडे घालून समाजाचं पुढारपण करायला लागला. तालुक्यातल्या आणि जिल्ह्यातल्या समाजाच्या पुढार्यांशी त्याचे चांगले संबंध होते. तालुक्यातले सगळे राजकीय पुढारी संजय ला ओळखायचे .एकदंरीत संजयची ओळख अण्णाच्या गटाला धरुन राहणारा कार्यकर्ता अशीच होती. चार–पाच दिवसांनी संजयने भीमा भाऊच्या घरातच मीटिंग बोलवली. भीमा भाऊच्याच घरात का? तर भीमा भाऊ म्हणजे समाजातला एक जाणता माणूस. समाजात काहीही चांगलं वाईट घडलं तर भाऊ कायम पुढे असायचा.लग्न ठरवायला ,भांडणं मिटवायला भाऊच पुढं .अगदी कोण मेलं तर तर भाऊच सगळं पुढं होऊन करायचा. भाऊला समाजात मान होता. मीटिंगचा दिवस उजाडला. माणसं हळूहळू जमायला लागली.भगवान आबा, पांडू तात्या, नामू आण्णा, बापू आबा, सदाभाऊ ही ज्येष्ठ मंडळी आधीच येऊन भिताडाला तक्क्या देऊन पद्धतशीर बसली होती.सचिन ,विनोद, किशोर, गणेश ,संतोष ही तरुण मंडळी रवीने टाकलेल्या घोंगड्यावर बसली होती.

आरं गणेश, आप्पा कुठाय? संताजी आल्याला न्हाय. बापूचा पण पत्ता न्हाय. त्यांस्नी सांगिटलं का न्हाय? संजयने विचारलं.

घरात जाऊन सांगून आलूय उशीर.. गणेश म्हणाला.

मग किती उशीर वाट बगायची? भाव करूया का सुरुवात? संजय म्हणाला.

आरं जरा वाट बगूया. पुन्ना ती बोंबलत बसत्यात. भाऊ म्हणाला.

गणेश बाळा,जा. आण सगळ्यास्नी बुलवून. भाऊनं सांगितल्यावर गणेश उठून गेला. तोपर्यंत संजयने खिशातला मोबाईल काढून संताजीला फोन केला. संताजी दूध घालायला गेला होता. बापू पोराला घेऊन दवाखान्यात गेला होता. गणेश आप्पाला घेऊन आला आणि मिटींगला सुरुवात झाली. संजय बोलू लागला, औंदा अण्णा भाऊ साठे जयंती करायची हाय. मिरवणूक जंगी काढायची. पैजारवाडीचा बँजो सांगायचा. दणक्यात करायची जयंती. आपल्या समाजाची ताकद दिसली पाहिजे. सभा झाली की रात्री आर्केस्ट्रा आणि जेवण ठेवायचं.

संजय, एवढा मोठा सराजाम करताय चांगलं हाय. पण पट्टीचं कसं? शंभर रुपये देताना कचवाचत्यात सगळी सुपारी कातरत बापू आबा म्हणाला.

पट्टीचं कायतरी मागं पुढं हुईल. पण जयंती करायची का

न्हाय ते सांगा, नामू आण्णा बेरकीपणानं म्हणाला. पट्टीचा मुद्दा पुढं यायला लागला हे लक्षात आल्यावर संजयने भीमा भाऊ कडे बघितलं.तसा भाऊ सगळ्यांना म्हणाला, आरं ऐकताय का? पट्टीची काळजी करू नका. अण्णानी समदा खर्च उचलायचं मान्य केलंय. आपण जयंती करायची.पन पैसं अण्णाचं असणार हाइत. आपलं काय जातंय.?पट्टीची काळजी कशाला कराय पायजे सां गा?

तसा अनिल उठला आणि म्हणाला, ही जयंती करायच्या आधी मला मागच्या जयंतीचा हिशेब द्या. मागच्या वर्षी जयंती केली तर किती खर्च आला आणि किती शिल्लक राहिली, ते सांगा. आणि आता सगळा कारभार कोण बघणार ते बी सांगा.तुमीच म्होरपाडी होताय आणि समाजाच्या पैशावर घरं भरताय .. हे न्हाय चालायच. अनिलची री ओढत संतोष बोलायला लागला,मागच्या वर्षी ठरली तेवढी पट्टी आम्ही दिली. अजून हिशेब नाही त्याचा. आमच्या पैशावर पुढाऱ्यांनी मटणं खायाची. मग आम्ही काय बोलायचं न्हाय का? आणि आमी काय बोलणार न्हाय म्टल्यावर तुमी आमच्या डोळ्यात माती टाकनारा व्हय?तुमी आदी मागचा हिशेब टाकायचा . मगच या जयंतीचं बोलायचं .

वाद वाढतोय हे लक्षात आल्यानंतर भीमा भाऊंनं शिताफीने सुत्रं हातात घेतली. भाऊनं घसा खाकरला आणि म्हणाला,पोरांनु,गुदस्ता सगळा कारभार संताजीकडं हुता.त्यात सगळ्यांची पट्टी हुती. आमची बी हुती. आता त्येनं काय हिशेब दिला न्हाय. मागचं उगळंत बसण्यापरास आत्ताचं काय करायचं ते बगूया. बगा कसं वाटतंय ?आनी संताजीबी आल्याला न्हाय.आता त्या हिशेबाचं मागनं बगूया.

संजयनं मध्येच तोंड घातलं, भाव म्हणतुय ते खरं हाय. मागच्या हिशेबाचं बघू सवडीनं. आता टाईम बी लई न्हाय. अन्ना पैसं देणार हायती.तवा करूया जयंती. सगळ्यांनी एकमेकांच्या तोंडाकडे बघितलं. बऱ्याच जणांना संजयचं पटलं होतं. आपल्याला पट्टी काढावी लागत नाही म्हणल्यावर संजयच्या प्रस्तावला अनुकूल वातावरण तयार झालं. परिस्थितीचा अंदाज बघून भीमा भाऊंनं सगळ्यांना समजावण्याच्या सुरात म्हटलं, आता बाकीचा काय वाडीचार लावू नका. संजबा जे करंल त्येला पाठिंबा देऊया. गोळ्यामेळ्यानं जयंती करूया. भाऊच्या या बोलण्यावर सगळ्यांनी माना डोलवल्या. तेवढ्यात शिवा दाभाडेचा किशोर उठला आणि म्हणाला ,जयंती करण्याबद्दल काय हरकत न्हाई. पण अण्णाच्या पैशावर का जयंती करायची? इतकी वर्ष तेच केले की आपण .दुसऱ्याच्या तुकड्यावर जगत आलो. अजून पण तेच करायचं का?अण्णा आमदारकी लढवणार म्हणून आपल्याला पैसे देणार .आणि आपण जयंती करणार हे मला काय पटलं नाही बाबा.आण्णा आपल्याला मिंद्यात ठेवायला बघतोय हे लक्षात ठेवा.

हा किशोर कोल्हापूरात एम.ए.करत होता.नवी पोरं त्याचं ऐकत होती.त्याचे विचार शिक्षणातून आणि वाचनातून आले होते. आता पुन्हा सगळे एकमेकांच्या तोंडाकडे बघू लागले. तसा संजय म्हणाला, किशोर, मोठ्यानी ठरवलंय. कोल्हापूरला जाऊन शिकलास मजी लय शहाणा झाला न्हाईस. तसा किशोर जोरात बोलू लागला, शहाणा होण्याचा प्रश्न नाही. दुसऱ्यांच्या पैशावर का म्हणून जयंती करायची .राहू दे की बेंजो सांगायचा. धनगरी ढोल सांगू. पण आपल्या पैशानं करूया जयंती .जेवान राहिलं तर राहू दी की.



किशोरच बरोबर हाय. दुसऱ्याच्या मिंद्यात का राह्याचं? अण्णाभाऊंनी आपल्याला स्वाभिमान शिकवला म्हणून स्टेजवर बोंबलायचं आणि इकडे अण्णाच्या पैशावर जयंती करायची.मला काय पटलं न्हाई. विनोदनं किशोरला पाठिंबा दिला. तसा संजय अस्वस्थ झाला. त्यांनं सदाभाऊला हळूच डिवचला. तसा सदाभाऊ खाकरला .सगळ्यांकडे कटाक्ष टाकून किशोरला उद्दे- शून बोलू लागला,पोरा तुझं म्हणणं बरोबर हाय. पण सगळ्यांच्या मनाम्होर जायला नगो. औंदा त्यांच्या मनापरमानं करूया .फुडंला बगू तुमच्या मनासारकं. तुम्ही तरण्यांनी घ्या कारभार हातात .आता वाडीचार लावत बसण्या परास समदी म्हणत्यात तशी करू जयंती. भिमाभाऊनं लगेच मध्ये तोंड घातलं,पोरांनो, औंदाच्या पावटी समद्यांच्या मनाजोकतं हुंदे.फुडचं फुडं पुढे बगू.किशोर आणि विनोद शांत बसले. तसा संजयने विषय काढला. पैजारवाडीचा बेंजो सांगतो. एक तारखेला गावातनं मिरवणूक काडायची. सागा- वचा मंडप सांगायचा. संध्याकाळी सभा घ्याची.आन्नांच्या हस्ते

पास झालेल्या पोरांचा सत्कार करायचा. जेवण करायचं आणि मग आर्केस्ट्रा. झालं.... मिटिंग झाली. जयंती करायची हे पक्क झालं. माणसं पांगली. संजय आणि भीमा भाऊ उशीर पर्यंत बोलत बसले. कसं कसं करायचं याचं बयाजवार दोघांनी मिळून नियोजन केलं. पैसे आणायला कोणी कोणी जायचं हे सुद्धा त्यांनी ठरवलं. मधल्या काळात बेंदूर येऊन गेला. बेंदराच्या दिवशी मांगाची गावभर धावपळ सुरू होती.ठरलेल्या घरांना तोरण बांधून जवळच्या पोत्यात बेरा घ्यायचा. बायका पोरांनी पोळ्या मागायच्या. दिवसभर मांगांची नुसती धांदल सुरू होती. तोरण बांधायला गेल्यावर पांडू तात्याला दादा पाटील म्हणाला होता, पांडुरंगंय, जयंती जोरात आहे म्हणा. अन्ना खर्च घालणार आहेत वाटतं. जयंती करा पन जरा तुमच्या कारभाऱ्यांच्या वर पन नदार ठेवा. लेका खाणारा खातुय आणि तुम्ही बगित बसताय. दुसरं काय न्हाय. आन्ना खर्च घालत्यात तवा पैसा कुणाच्या खिशात जाण्या परास त्यो समाजावर खर्च करा.


बेंदरादिवशीच धुमीतल्या पाटलांची घराला तोरणं कुणी बांधायची यावरुन उमाजी आणि अनिल या सख्ख्या चुलत भावांच्यात भांडणं झाली होती.अशी भांडणं दरवर्षी व्हायची. बेंदूर झाला.बेरा घरात आला. पावसानं जराशी उघडीप दिली होती. मांगवाड्यात जयंतीची तयारी सुरू झाली होती. पाण्याच्या टाकी जवळची जागा स्वच्छ केली होती. तिथं,जवळंच धनगरांची घरं होती.रामोशांची होती. जागेची साफसफाई करताना धनगर आणि रामोशी मागांच्या पोरांवर गुरगुरत होते.शेवटी भगवान पाटलानं येऊन धनगर आणि रामोशांना समजावलं होतं. सागावकर मंडपवाल्यानं आदल्या दिवशीच मंडप उभारला होता. चांगले स्टेज उभारले होते. सकाळपासून लाऊड स्पीकरवर गाणी लावली होती. चंदन कांबळेचं 'मांगाचं पोरगं गड्या तलवारीची धार आहे' हे गाणं पुन्हा पुन्हा पुन्हा लावलं जात होतं. लहान मुलांचा उत्साह ओसंडून वाहत होता. बायकांनी आपल्या ठेवणीतल्या साड्या काढल्या होत्या.मुरगूबाईच्या मंदिरापासून ते स्टेजपर्यंत पताका लावल्या होत्या. पैजारवाडीचा बाबला बॅन्जो पार्टी आली आणि मिरवणुकीला सुरुवात झाली. सजवलेल्या ट्रॅक्टरमध्ये अण्णाभाऊ साठेंचा फोटो ठेवला होता. घोषणांच्या गजरात मिरवणुकीला सुरुवात झाली. मांगवाड्यातनं मिरवणूक ग्रामपंचायतीच्या चौकातून बाजारपेठेत आली. बाबला बॅन्जो पार्टी भलतीच रंगात आली होती. बाजारपेठेच्या चौकात 'बोल मै हलगी बजाऊ क्या' या गाण्याचा वन्स मोअर मिळाला होता.मांगाची पोरं एकसारखे टी शर्ट घालून मिरवणुकीतनं चालत होती. गावातल्या माणसांची गर्दी जमली होती.काही उत्साही पोरं बेभान होऊन नाचत होती. मिरवणूक पुढे सरकली.निनाईच्या मंदिराला वळसा घालून नारायण पेठेतून मिरवणूक पुन्हा टाकी जवळ आली. बँजो वाल्यांनी मिरवणूक गाजवली होती. संजय पांढरीधोट कपडे घालून सभेच्या तयारीला लागला होता. पुढच्या वर्षीची ग्रामपंचायत निवडणूक त्याला खुणावत होती.आण्णाच्या पनेलमध्ये स्वतःसाठी त्याला जागा करायची होती.जयंती म्हणजे त्याला त्यादृष्टीने आण्णाच्या नजरेत संधी वाटत होती. सभेची तयारी झाली. स्टेजवर खुर्च्या मांडल्या होत्या. पाठीमागे अण्णा भाऊ साठेंचा फोटो असलेला बॅनर लावला होता.सभेची वेळ जवळ येऊ लागली होती. आप्पाचा नितीन माइक वरून अनाउन्समेंट करत होता. थोड्याच वेळात कार्यक्रम सुरू होणार आहे तरी सर्वांनी बसून घ्यावे भीमाभाऊं धोतर पटका नेसून अण्णाची वाट बघत होता. गावातली पंचमंडळी येऊन बसली होती. संजय नितीनला सूचना करत होता. हे बघ, फोटोला हार घातला की मी प्रास्ताविक करणार. मग अण्णांचा सत्कार करायचा .ते झालं की आपल्या लहान मुलांची भाषणं होणार. मग सत्कार .ते झालं की महिलांना साडी वाटप. आणि मग अण्णाचं भाषण .त्याच्यानंतर आभार मानायचं. नितीन हूं हूं करत होता. विनोद आणि किशोर स्टेजवरची आजूबाजूची बाकीची तयारी करत होते. तेवढ्यात कोणीतरी म्हटलं, फटाकड्या लावा रं. अण्णांची गाडी आली. पोरांनी फटाकड्या लावल्या.फटाक्यांच्या धूरांचा वास पसरला.आणि नितीनचं सुत्रसंचालन सुरु झालं.इल्या दादा आणि आबा घोलपाची हलगी कैताळाची जुगलबंदी सुरु झाली. आण्णा थेट स्टेजवर आले. फोटोला हार घातला.समाजातली ज्येष्ठ मंडळी पुढं आली.फोटो काढले गेले. संजयनं प्रास्ताविक केलं.सगळा समाज अण्णांच्या मागं आहे हे संजयनं जाहीर करुन टाकलं. किशोर आणि विनोद एकमेकांकडे बघून हसले. अण्णांचा जंगी सत्कार झाला. सगळे पंच व कार्यकर्ते यांचाही सत्कार झाला. आता लहान मुलांची भाषणं होणार होती. पण आण्णांनी नितीनला रोखलं. ते म्हणाले,हे बघा ,महिलांना साडी वाटपाचा कार्यक्रम पहिल्यांदा घ्या .मग मी बोलतो.आणि लगेच निघतो. मला माण– गावात आणखी एका कार्यक्रमाला जायचं आहे. आण्णांचा कार्यकर्ता भानू शिंदेनं अण्णांच्या गाडीतला साड्यांचा गठ्ठा संजय च्या हातात दिला. नितीन महिलांची नावे वाचू लागला. साड्या होत्या तीस आणि महिला होत्या पन्नास. अण्णांनी वीस साड्या आपल्या हातानी वाटल्या. तीस पैकी बऱ्याच महिला या संजयच्या आणि भीमा भाऊच्या बुडक्यातल्या होत्या. दाभाडे आणि पाटोळे यांच्यातल्या महिलांना साड्या मिळाल्याच नाहीत. फोटो काढले गेले. महिलांची कुजबुज वाढली.प्रत्येक आपलं नाव कधी पुकारलं जातंय याची वाट बघत होती. तशातच अण्णा भाषणाला उभे राहिले .


तुम्हा सर्वांना अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मी शुभेच्छा देतो. अण्णा भाऊ साठेंचे विचार आपणा सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत. त्यांना भारतरत्न पुरस्कार मिळाला पाहिजे.

यासाठी मी पाठपुरावा करणार आहे. आपल्या समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी मी वचनबद्ध आहे. मला पुढे कार्यक्रम असल्यामुळे मी जात आहे त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. लोकांनी जोरदार टाळ्या वाजवल्या .अण्णा भाषण करून निघाले .पाठोपाठ त्यांच्या सोबतची माणसं उठून गेली. लहान मुलांची भाषणे सुरू झाली .पण पाटोळे आणि दाभाडे भावकीतल्या महिलांनी स्टेजवरच संजय जाब विचारायला सुरुवात केली. आमच्या साड्या कुठे आहेत, म्हणून वादावादी सुरू झाली. त्यात लहान मुलांची भाषणे थांबली. ज्यांचे सत्कार होते ते माणसं पुढं आली. गोंधळ वाढला. जयंतीला आलेली बाकीची माणसं निघून गेली. सगळा गोंधळ सुरु झाला.महिला साड्यांचं विचारायला लागल्या तर ज्यांचे सत्कार होते आमचा सत्कार आण्णांच्या हस्ते का झाला नाही म्हणून संजयबरोबर भांडायला लागले. भीमाभाऊ पुढं आला. संजयजवळ पण गर्दी वाढली.आता माणसांनी भिमाभाऊ आणि संजयला घेरलं. कसाबसा कार्यक्रम पार पडला.शेवटी सगळे जेवायला बसले.तिथं पण गोंधळ उडाला.बायकांच्या पंगतीला लाडू मिळालेच नाहीत.संजय आला नी सगळ्यांना म्हणाला, माजं नियोजन जरा चुकलंच.आण्णांनी सगळं पैसं दिलं हुतंत.पण मधल्या माणसांनी मधीच खाल्ल. भिमा भाऊ पण पुढं आला .आपलं चुकलं हे त्या दोघांनी पण मान्य केलं. दुसऱ्यांच्या पैशावर जयंती करायला नाही पाहिजे होती .सगळा बट्ट्याबोळ झाला. आपल्या पोरांचा सत्कार झाला नाही.पोरांची भाषणं झाली नाहीत. आपलं चुकलं . सदाभाऊ म्हणाला.

पुढच्या वर्षी चुक सुदरुया. पोरं म्हणत हुती तेच बरूबर हुतं. समदा गोंदूळ झाला. आपली हाऊस न्हाय, काय न्हाय. सत्कार गावातल्या माणसांचं झालंत पण आपल्या मानसांचं झालं न्हाईत. आप्पा बोलला. दुसऱ्यांचं पैसे घेऊन मिंदं झालं की असंच हुणार की. अनिल म्हणाला. किशोर आणि विनोद म्हणत हुते ते खरं हुतं.बापू आबा म्हणाला. सगळी पोर जेवायला बसली. राजकारणी लोकांच्या पैशावर जयंती केल्यावर कसा विचका होतो ते सगळ्यांना कळून चुकलं होतं. जेवता जेवता सगळ्यांनी पुढची जयंती आपण आपली वर्गणी काढून करायचा संकल्प केला. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचं वाटप करायचं आणि आण्णा भाऊ साठेंच्या साहित्यावर पीएच.डी. करणाऱ्या डॉ. गुरव सरांचं व्याख्यान ठेवायचं असं ठरलं. जयंती आपल्या पैशानं करायची.गाव काय आपल्याला मिंधं करुन आपली मज्ञा बघायलाच बसलंय हे सगळ्यांना पटलं. यावर्षीची जयंती संपली.पण पुढच्या वर्षीच्या जयंतीचा चांगला विचार पेरुन संपली.

******



# रत्नागिरीत हवे सुसज्ज मार्केटयार्ड

आनंद देसाई



**आंबा व्यावसायिकांना आपला माल विकण्यासाठी वाशी, पुणे येथे का जावे लागते? रत्नागिरीत सुसज्ज असे मार्केटयार्ड का नाही, याचा विचार होणे गरजेचे आहे. ग्राहकांनी आंबा विक्रेत्यांकडे आले पाहिजे. त्यासाठी रत्नागिरीत सुसज्ज मार्केटयार्डची गरज आहे. एक असे मार्केटयार्ड जिथे शेतकरी आपला माल थेट ग्राहकांपर्यंत विकू शकतो. यातून दोन गोष्टी साध्य होतील. पहिली म्हणजे माल पुणे, वाशी येथे पाठविण्याचा वाहतुकीचा खर्च कमी होईल आणि दुसरे म्हणजे त्यानिमित्ताने कोकणाबाहेरील ग्राहक कोकणात येतील आणि पर्यटन व्यवसायालाही चालना मिळेल.**

आंबा व्यावसायिकांना आपला माल विकण्यासाठी वाशी, पुणे येथे का जावे लागते? रत्नागिरीत सुसज्ज असे मार्केटयार्ड का नाही, याचा विचार होणे गरजेचे आहे. ग्राहकांनी आंबा विक्रेत्यांकडे आले पाहिजे. त्यासाठी रत्नागिरीत एका सुसज्ज गाळे असलेल्या मार्केटयार्डची गरज आहे. एक असे मार्केटयार्ड जिथे शेतकरी आपला माल थेट ग्राहकांपर्यंत विकू शकतो. यातून दोन गोष्टी साध्य होतील. पहिली म्हणजे माल पुणे, वाशी येथे पाठविण्याचा वाहतुकीचा खर्च कमी होईल आणि दुसरे म्हणजे त्यानिमित्ताने कोकणाबाहेरील ग्राहक कोकणात येतील आणि पर्यटन व्यवसायालाही चालना मिळेल.

कोकण म्हटले की सगळ्यात आधी डोळ्यासमोर येतो तो हापूस आंबा. फळांचा राजा अशी बिरुदावली मिरवणारा हापूस त्याच्या जिभेवर रेंगाळणाऱ्या चवीबरोबरच रंग, रूपानेही सर्वांनाच भुरळ घालतो आणि म्हणूनच हापूस केवळ रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोकण आणि महाराष्ट्रापुरताच मर्यादीत न राहता तो जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोचला आहे. सगळ्यांच्या पसंतीस उतरला आहे; मात्र असे असले तरी या हापूस आंब्याला निसर्गाच्या लहरीपणाचे फटके सोसावे लागत आहेत. निसर्ग चक्राच्या फेऱ्यात अडकलेला हापूस अनेक दिव्यातून जात बाजारात येतो, पण अनेकदा तयार आंब्यात सापडणारा साका, डागाळलेला आंबा, परदेशात जाण्यासाठी असणाऱ्या किचकट प्रक्रिया याचा आंबा बागायतदाराला मोठा फटका बसतो. वर्षभर मेहनत घेऊन जीवापाड जपलेल्या आंब्यातून जेव्हा अर्थार्जनाची वेळ येते त्यावेळी अपेक्षेपेक्षाही कमी दर मिळतो.

कोकण पट्ट्यातील आंबा लागवडीच्या क्षेत्राचा विचार करता रत्नागिरी जिल्ह्यात ६६ हजार हेक्टर, तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात ३० हजार हेक्टरवर आंब्याची लागवड केली आहे. कोकणच्या म्हणजे रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड या तीन जिल्ह्यांचा विचार केला तर आंब्याच्या एकूण उत्पादनापैकी ५४ टक्के आंबा लागवड रत्नागिरी जिल्ह्यात होते. सिंधुदुर्गात ३६ टक्के, तर रायगडमध्ये १० टक्के होते. १९९० सालापर्यंत हे रत्नागिरी जिल्ह्यातील हे प्रमाण केवळ २१ हजार हेक्टर इतकेच होते. त्यांनतर म्हणजे गेल्या २० वर्षांचा विचार केल्यास ४५ लाख हापूस लागवड एकट्या रत्नागिरी

जिल्ह्यात करण्यात आली आहे. दरवर्षी आपल्याकडे सव्वा ते दीड लाख टन आंबा तयार होतो. यात ६० हजार टन आंबा फ्रेश फ्रुट (थेट फळ) म्हणून विकला जातो. २० हजार टन आंब्यावर स्थानिक पातळीवर प्रक्रिया (कॅनिंग) होते. तर ३० हजार टन जिल्ह्याबाहेर प्रक्रियेसाठी जातो. कोकणातून दरवर्षी आंबा पिकातून सुमारे ४०० कोटींची उलाढाल होते. कॅनिंगमधून १५० ते २०० कोटी अशी एकूण ६०० ते ६५० कोटींच्या आसपास आंबा व्यवसायातून उलाढाल होते. रत्नागिरी तालुक्यात आंब्यावर प्रक्रिया करणाऱ्या ७० फक्टरीज तर जिल्हाभरात दीडशेच्या आसपास फक्टरीज आहेत. ङ्गङ्गआंबा व्यवसायाचे गणित हे पूर्णतः निसर्गावर अवलंबून आहे. गेल्या काही वर्षांत तर निसर्गाच्या लहरीपणाचा फटका आंबा व्यावसायिकांना बसतोय. निसर्गाचे लहरीपण आपल्या हातात नसले तरी झाडांची काळजी घेणे हे नक्कीच आपल्या हातात आहे. म्हणूनच खते वापरताना सेंद्रीय खतांचा अधिकाधिक वापर करण्यावर भर दिला पाहिजे. दर ३-४ वर्षांनी एकदा प्रमाणात रासायनिक खत घालावे. कारण जसे आपले म्हणजे माणसाचे शरीर आहे आणि तसेच झाडांचेही आहे. सात्विक अन्न आपल्या शरीर सुदृढ ठेवते आणि विटामिन्स, प्रोटीन्स, मिनरल्सच्या गोळ्या आपली ताकद वाढवतात त्याचप्रमाणे सेंद्रिय खत हे झाडांचे पोषणमूल्य वाढवते आणि दर ३ ते ४ वर्षांचा फरकाने दिलेले रासायनिक खत हे बुस्टर डोससारखे काम करते. हे असे केल्याने झाडांची प्रतिकारशक्ती तर वाढतेच शिवाय दरवर्षी रासायनिक खतांवर जो जास्तीचा खर्च होतो तो वाचतो आणि तोच बागायतदारांचा फायदा. पण हे सर्व हवामानाच्या बदलावर ठरवले पाहिजे, हेही तितकेच खरे.

आजच्या घडीला बागायतदारांसमोर असलेली सर्वात मोठी समस्या म्हणजे बागेत काम करण्यासाठी मजूर, कामगार मिळणे. आज ग्रामीण भागातील कोणीही तरुण शेती बागायतीकडे वळायला मागत नाही. आता तर पैरी ही संकल्पनाच बंद झाली आहे. आज ग्रामीण भागातील तरुण शिक्षण घेतल्यानंतर नोकरीच्या निमित्ताने मुंबई, पुणे अशा शहरांकडे वळत आहे. त्यामुळे पूर्वीस-ारखे रोजंदारीवर काम करणारे कामगार मिळणे बंद झाले आहे. अगदी चुकरू पूर्वीपासून जोडून ठेवलेलं कामगार असतील तर आता त्यांचा रोजही दिवसामागे ७५० ते ८०० रुपयांवर जाऊन पोचला आहे. त्यामुळे शेतकरी काय किंवा बागायतदार काय आहे ती जागा जमीन किंवा बागा विकण्याच्या मानसिकतेत असतात. ङ्गङ्गया सगळ्यासाठी काही गोष्टी सरकारने केल्या पाहिजेत, जसं की झाडांसाठी वापरल्या जाणाऱ्या खतावर १८ टक्के जीएसटी आकारला जातो, तो काढून टाकला पाहिजे. त्याने तोटा होत आहे. त्याचप्रमाणे औषधांच्या किंमती नियंत्रणात ठेवल्या पाहिजेत. थ्रीप्स या रोगाचा हाहाकार दरवर्षी माजतो; पण त्याची औषधे महाग आहेत. बरं ही औषधे मारूनही रोग जाईल याची शाश्वती नाही. या औषधांच्या वापराने केवळ ६० टक्के कीडे मारतात. उर्वरित ४० टक्के किड्यांची पैदास दुप्पट वेगाने होते. त्यामुळे यावर जेव्हा ठोस औषधे बागायतदारांना मिळतील तेव्हाच आपण १०० टक्के जिंकलो असे म्हणू शकू. दुसरीकडे अवजारे, मशिनरी यांना सबसीडी मिळते ते ठीक आहे पन तीही कमीत कमी किंमतीत उपलब्ध झाली तर बागायतदारांना ती परवडतील. यातला आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शेतकऱ्यांना बँकेकडून दिले जाणारे कर्ज. शेतकऱ्यांना मिळणारे कर्ज हे १० ते १२ टक्के व्याजानेच दिले जाते. ते २/३ टक्के व्याजदराने दिले गेले पाहिजे. सरकारकडून शेतकऱ्यांना दिली जाणारी नुकसानभरपाई ही अगदी तुटपुंजी असते. त्यामुळे एकवेळ ही तुटपुंजी रक्कम नाही मिळाली तरी चालेल पण शेतकऱ्यांसाठी कमीत कमी म्हणजे २ ते ३ टक्क्याने कर्ज किंवा तारण कर्ज मिळायला हवे, तरच शेतकरी उभा राहू शकतो. आजच्या घडीला बघायला गेले तर महागाई सगळीकडेच आहे. त्याला अर्थातच आंबा व्यवसायही अपवाद नाही. त्यामुळे फवारणीचा खर्चही परवडत नाही. त्यातून हंगामातील सर्व फवारणीचा खर्च हा लाखोंच्या घरात जातो.

आंबा व्यावसायिकांना आपला माल विकण्यासाठी वाशी, पुणे येथे का जावे लागते? रत्नागिरीत सुसज्ज असे मार्केटयार्ड का नाही, याचा विचार होणे गरजेचे आहे. ग्राहकांनी आंबा विक्रेत्यांकडे आले पाहिजे. त्यासाठी रत्नागिरीत एका सुसज्ज गाळे असलेल्या मार्केटयार्डची गरज आहे. एक असे मार्केटयार्ड जिथे शेतकरी आपला माल थेट ग्राहकांपर्यंत विकू शकतो. यातून दोन गोष्टी साध्य होतील. पहिली म्हणजे माल पुणे, वाशी येथे पाठविण्याचा वाहतुकीचा खर्च कमी होईल आणि दुसरे म्हणजे त्यानिमित्ताने कोकणाबाहेरील ग्राहक कोकणात येतील आणि पर्यटन व्यवसायालाही चालना मिळेल. गोवा हे लहान राज्य आहे. पण तिथे पर्यटन रुजले आहे. त्या तुलनेने आपल्याकडे पर्यटन रुजलेले नाही. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या मुलभूत गरजा आपल्याकडे नाहीत, कटू वास्तव आहे. दळणवळणासाठी चांगले रस्ते, अखंडित वीज, चांगली हॉटेल्स हे सर्व पर्यटन व्यवसाय रुजण्यासाठी आवश्यक आहे. त्या दृष्टीनेही प्रयत्न होणे गरजेचे आहे. आंबा, काजू, मच्छिमारी, स्वच्छ समुद्रकिनारे, नारळ-पोफळीच्या बागा हे कोकणचे वैभव आहे आणि ते टिकवायचे असेल तर शेतीला आणि पर्यायाने शेतकऱ्याला, बागायतदाराला उभे करण्यावाचून सरकारकडे पर्याय नाही.

**(शब्दांकन : कोमल कुळकर्णी-कळंबटे)**

# बर्ड अँड वाईल्ड फोटोग्राफी : छंदपूर्ती



तेजा मुळ्ये



**सप्टेंबरमध्ये एक छोटी टूर केली पुण्याजवळ सासवड भागात. अप्रतिम निसर्गसौंदर्य अनुभवलं. या सर्व टूर पुण्याचे प्रसाद दातार आणि मनीष निकते या मित्र आणि फोटोग्राफी टूर आयोजकांच्या सहकार्याने मला करणे शक्य झाले. एका छंदपूर्ती बरोबर आपले शिक्षण, अनुभव संपन्नता आपले आयुष्य समृद्ध करते.**

२०२४ वर्ष आता अखेरच्या टप्प्यात आले आणि आज सहज मनात विचार सुरू झाला,,, या वर्षी आपण आपल्या बर्ड अँड वाईल्ड फोटोग्राफी या छंदापायी किती भटकलो जरा वळून पहावं. आणि स्मृतीपटल डोळ्यांसमोर उलगडू लागला.

फेब्रुवारी मध्ये दहा दिवस वेस्ट बेंगोल टूर झाली. बागडोगरा विमानतळावर उतरलो आणि हवेतील फरक थंड हवेचा शिडकावा जाणवू लागला. आम्ही चार फोटोग्राफर होतो. एक गाईड आणि ड्रायव्हर अशी सहा जणांची फॅमिली झाली. पुण्याचे ऑर्गनायजेशन होते. सर्व ठिकाणी उत्तम सोय होती. काही ठिकाणी होम स्टे ला असल्याने पहाडी लोकांचे जनजीवन अगदी त्यांच्यात राहून अनुभवता आले. तेथील भाज्या, पदार्थ, बनवण्याची पद्धत हे सर्व अनुभव फोटोग्राफी बरोबरअगदी फ्री असतात. रिशोप, लावा, नैरोव्हाली, शिवखोल असे जवळजवळ चौदा, पंधरा भागात आम्ही भटकंती केली. बऱ्याच ठिकाणी अगदी दुर्गम भाग असल्याने कित्येक किलोमिटर छोट्या पाऊलवाटेने विद्यार्थी चालताना



भेटले, शेतकरी ओझे घेऊन जाताना दिसले. स्वतःची सर्व कामे स्वतः केली जात होती. आपण रोज जगताना सहजपणे वापरतो

सुखसोयी त्यांनी अद्यापि पाहिल्या देखील नाहीत. कधीही पसरणारे दाट धुक्याचे पडदे समोरचा जंगलचा नजारा देखील गायब करत. अत्यंत थंडीसाठी बनवलेला चहा कपातून तोंडत जाईपर्यंत गार होत असे. पातळ सुती कपडे वापरणारे आम्ही डोळे आणि नाक उघडे ठेवून पूर्ण लोकरी कपड्यांनी लपेटलो जात होतो. तशातही आम्हाला जवळजवळ १४७ प्रकारचे लहान मोठे पक्षी पहायला मिळाले. त्यांचे फोटो काढता आले.

यानंतर यावर्षी माझी अत्यंत महत्वाची टूर जून मध्ये झाली मसाई मारा केनिया परदेशवारी. आयुष्यातील पहिलीच परदेश यात्रा. मझ एक स्वप्न पूर्ण करत होते. यासाठी देखील पुण्याचे आर्गनायझर होते. या टूरसाठी आम्ही सहा फोटोग्राफर होतो आणि विशेष म्हणजे त्यात आम्ही चार लेडीज होतो. मी कोकणातून, एक गुजराथ मधून, एक पुणे आणि एक औरंगाबादमधून. आम्ही सहा जणांनी खूप मजा केली. नैरोबी विमानतळावर उतरलो.



पासपोर्ट व्हिसा सगळे सोपस्कार पूर्ण झाले आणि वेगळ्या देशात आली याची जाणीव झाली. नैरोबी, सांबरू, नाकुरू, मसाईमारा अशा विभागात फिरून कधी पाण्यातील जीवसृष्टी पाहिली. कधी जिराफ, झेब्रा, एकशिंगी गेंडा, सिंह, चित्ता अशी स्वापदे पाहिली. या प्रत्येकाची फोटो घेण्याची पद्धत शिकता आली. माझ्यासारख्या छोट्यात छोट्या पक्षी टिपण्याचा प्रयत्न करणाऱ्या फोटोग्राफरला जिराफ अख्खा फ्रेममध्ये बसवताना कसरत करावी लागली. तेथील लांबबचलांब पसरलेल्या. गवताळ मैदानातून असंख्य हत्तींचा कळप जाताना, झेब्रे, जिराफ फिरताना ते दृश्य पाहू की कॅमेरात कॅच करू, अशी सर्वांची तारांबळ होत होती. पक्षी देखील खूप न्याहाळता आले. मला एकदा रिसॉर्ट जवळ पाण्यात मोठ्याने फर्र फर आवाज करणारा हिप्पो पहायचं मोह झाला आणि खरच रात्री रिसॉर्टच्या आवारात मंद प्रकाशात आरामात गवत खात फिरणारा मांसल डोंगर म्हणजे हीप्पो दिसला.

पूर्वी येथील मसाई हे लोक शिक्षण व्यवसाय या मध्ये मागे होते पण आता सर्व हॉटेल पर्यटन व्यवसायामध्ये या लोकांनी चांगली प्रगती केली आहे. हे लोक उत्तम असे मण्यांचे विणकाम, लाकुडकाम करतात. येथे फळांची लागवड होते. शेती केली जाते.



अशा भागात जायचं तर पशू पक्षी यांच्या फोटो बरोबरच लॅण्डस्केप करायलाही मजा येते.

सप्टेंबर मध्ये एक छोटी टूर केली पुण्याजवळ सासवड भागात. अप्रतिम निसर्गसौंदर्य अनुभवलं. या सर्व टूर पुण्याचे प्रसाद दातार आणि मनीष निकते या मित्र आणि फोटोग्राफी टूर आयोजकांच्या सहकार्याने मला करणे शक्य झाले. एका छंदपूर्ती बरोबर आपले शिक्षण, अनुभव संपन्नता आपले आयुष्य समृद्ध करते.

******



# श्री रामनाथ हॉस्पिटल, कोकण हृदयालय

## आणि ममता इन्स्टिट्यूट ऑफ गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी अँड हिपॅटोबिलिअरी सायन्सेस

SR

MIG
Mamata Institute of Gastroenterology and Hepatobiliary Sciences

Konkan Cardiac Centre
Caring for the Hearts of Konkan

**डॉ. संजय प्र. लोटलीकर**
एम. डी. (चेस्ट)
कन्सल्टंट चेस्ट फिजिशीयन
डायरेक्टर – श्री रामनाथ हॉस्पिटल

PATIENT SAFETY & QUALITY OF CARE
NABH
ACCREDITED

**अन्नपचन संस्था, लिव्हर, पित्ताशय, स्वादुपिंड आणि पाणथरी यांवर एण्डोस्कोपी आणि लेप्रोस्कोपीच्या आधाराने**
**अत्याधुनिक उपचार करणारे कोकणातील पहिले वैद्यकीय केंद्र**

### रुग्णालयात उपलब्ध असलेल्या विविध सेवा

अधिक माहितीसाठी

- कार्डियक कन्सल्टेशनपेस
- ई. सी. जी.
- २-डी इको-कार्डियोग्राफी आणि कलर डॉपलर
- लहान मुलांसाठी इको-कार्डियोग्राफी
- स्ट्रेस इको-कार्डियोग्राफी
- २४ तास होल्टर मॉनिटरिंग
- २४ तास अॅम्बुलेटरी बी.पी. मॉनिटरिंग
- पेस मेकर इव्हॅल्युएशन
- अँजिओग्राफी
- अँजिओप्लास्टी (पिवळ्या व केशरी रेशन कार्डधारकांसाठी मोफत शस्त्रक्रिया)
- बायपास सर्जरी (पिवळ्या व केशरी रेशन कार्डधारकांसाठी मोफत शस्त्रक्रिया)
- डायलेसिस (पिवळ्या व केशरी रेशन कार्डधारकांसाठी मोफत)
- सिटी स्कॅनिंग सुविधा.
- अस्थिविकार कन्सल्टेशन (पिवळ्या व केशरी रेशन कार्डधारकांसाठी मोफत शस्त्रक्रिया)
- मूत्रविकार सर्जरी (पिवळ्या व केशरी रेशन कार्डधारकांसाठी मोफत शस्त्रक्रिया)
- जनरल सर्जरी (पिवळ्या व केशरी रेशन कार्डधारकांसाठी मोफत शस्त्रक्रिया)
- किडणीरोग कन्सल्टेशन
- रक्तदोष कन्सल्टेशन

### याशिवाय विविध आजारांवरील तज्ज्ञ चिकित्सकांची सेवाही रुग्णांसाठी उपलब्ध.

**मेडिसीन डिपार्टमेंट**
डॉ. संजय लोटलीकर
एम. डी. (चेस्ट)
कन्सल्टंट चेस्ट फिजिशीयन
मेडिकल डायरेक्टर

**कार्डिओलॉजी डिपार्टमेंट**
डॉ. अमेय आमोणकर
एम.डी., डी.एम. (कार्डिओलॉजी),
एफइएससी (युरोप)
एफएससी आय (युएसए)
कन्सल्टंट इंटरवेंशनल कार्डिओलॉजिस्ट
डायरेक्टर (कोकण कार्डियॅक सेंटर)

डॉ. विदुर कर्णिक
एम. डी. (मेडीसीन),
डी.एन.बी. (कार्डिओलॉजी)

डॉ. कौस्तुभ माचनुरकर
एम.डी., डी.एम. (कार्डिओलॉजी)

डॉ. युवराज पोवार
डी.एन.बी. (मेडिसीन),
डी.एन.बी. कार्डिओलॉजी

**कार्डीयॅक सर्जरी डिपार्टमेंट**
डॉ. तुषार धोपाडे
एम.एस., एम.सी.एच.
(कार्डिओव्हॅस्क्युलर थोरॅसिक सर्जन)

**न्युरोसर्जरी डिपार्टमेंट**
डॉ. श्रीविजय फडके
एम.बी.बी.एस., एम.एस.,
एम.सी.एच. (न्युरोसर्जन)
डी.एन.बी. (न्युरोलॉजी),
डब्ल्यु.एफ.एन.एस.
फेलोशिप कन्सल्टंट ब्रेन अँड स्पाईन सर्जन

**हेमॅटोलॉजी डिपार्टमेंट**
डॉ. अरूण अशोक बाफना
डी.एन.बी. (मेडिसीन), डी.एन.बी. (हेमॅटो)
कन्सल्टंट हेमॅटॉलॉजिस्ट
अँड हेमॅटो-ऑन्कॉलॉजिस्ट
बोन मॅरो अँड स्टेम सेल ट्रान्सप्लांट
फिजिशियन

**नेफ्रोलॉजी डिपार्टमेंट**
डॉ. प्रविण घुळे
एम.डी., डी.एम. (नेफ्रॉलॉजी)

डॉ. दादा मारुती कोळी
एम.बी.बी.एस. (नेफ्रॉलॉजी)
एम.एन.ए.एस.एस.

**युरोलॉजी डिपार्टमेंट**
डॉ. सुनिल गोगटे
एम.एस., एम.सी.एच. (युरोलॉजी)
डी.एन.बी. (युरोलॉजी), एफ.आर.सी.एस.

**गॅस्ट्रोएंट्रोलॉजी डिपार्टमेंट**
डॉ. ममता आमोणकर
एम.डी., डी.एम. (गॅस्ट्रोएंटरालॉजी)
पोट विकार व लिव्हर विशेष तज्ज्ञ

डॉ. गौरव बाबर
एम.डी., डी.एम. (गॅस्ट्रोएंटरालॉजी)
पोट विकार व लिव्हर विशेष तज्ज्ञ

**सर्जरी डिपार्टमेंट**
डॉ. मनोज मणचेकर
एम.एस. (जनरल सर्जरी)
अॅडव्हान्स लॅप्रोस्कोपिक
अँड कॅन्सर सर्जन

**ऑर्थोपेडिक डिपार्टमेंट**
डॉ. निलेंद्र भोळे
एम.एम. (ऑर्थो)

**डरमॅटोलॉजी डिपार्टमेंट**
डॉ. अरूण राठोडकर
एम.बी.बी.एस., डी.वी.डी.

**पॅथॉलॉजी डिपार्टमेंट**
डॉ. प्रमोद मारूळकर
एम.बी.बी.एस., डी.सी.पी.

डॉ. माधवी धोपाडे
एम.डी. पॅथॉलॉजी

**रेडिओलॉजी डिपार्टमेंट**
डॉ. निनाद नाफडे
एम.डी. (रेडिओलॉजी)

डॉ. निलेश नाफडे
एफ.सी.पी.एस. (एएनएइएस),
डी.एम.आर.ई. (सी.पी.एस.)

डॉ. तारकेश्वरी औरंगाबादकर
डी.एम.आर.ई. (सी.पी.एस.)

**अॅनिस्थेशिया डिपार्टमेंट**
डॉ. शीतल देसाई
एम.डी.कार्डियॅक (अॅनस्थेशिया)

डॉ. भाग्यश्री गोगटे
एम.डी. (अॅनस्थेशिया)

डॉ. सुह्द प्रभूदेसाई
डी.ए.

डॉ. गुरुदास दांडेकर
डी.ए.

**लोटलीकर प्लाझा, मारुती मंदिर, रत्नागिरी-४१५६१२, संपर्क : (०२३५२) २२११९१/९५/९६**

# नवनिर्माण संस्था वाटचाल अनवाणी ते समृध्दी....

**अभिजित हेगशेट्ये**




**स्वातंत्र्यपूर्व काळापासून एक महाविद्यालय. जिल्हा ठिकाण, साहजिकच मक्तेदारी प्रवेशा-पासून सर्वच घटकात पसरलेली. नवनिर्माणच्या आगमनाने प्रस्थापितांना वाटत असे आम्ही त्यांच्याशी स्पर्धा करत आहोत. पण आमचे म्हणणे तुमच्याशी स्पर्धाच नाही. कारण मुळ उद्देशातच फरक आहे. नवनिर्माणचा उद्देश महाविद्यालय चालविणे, त्याची प्रचंड भरभराट करणे, मोठ्या इमारती बांधणे, त्यांत अत्यंत अद्यायावत सुविधा देणे, भपकेबाजपणा करत आणि आपल्या फी मोठ्या प्रमाणावर वाढविणे हे नाहीच तर आमचा उद्देश आहे, या परिसरातील एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित रहाता कामा नये. अशा घटकापर्यतं शिक्षण पोहोचविणे गरजेचे आहे. पारंपारिक अभ्यासक्रमासोबत व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम जोडले. यात कॉम्प्यूटर, आयटी, बँकीग, मॅनेजमेंट जोडले.**

नवनिर्माण शिक्षण संस्थेचे हे रौप्य महोत्सवी वर्ष. पाव शतकाचा हा कालावधी कधी उलटून गेला याची खबरच लागली नाही. संस्थेच्या स्थापना आणि उभारणीतील महत्वपुर्ण कालावधी. मारुती मंदिर येथील हॉटेल गोपाळच्या टपरीवर चहाच्या गप्पांची मैफल, बदलत्या रत्नागिरी शहराचा कानोसा आणि त्याच काळात या उपेक्षित मुलांसाठी काही करावे, पर्याय द्यावा यातून सुचलेली नव्या महाविद्यालयाची संकल्पना. नवनिर्माणाच्या प्रवासाकडे मागे वळून पहातांना असे प्रकर्षाने जाणवते की, १९९८-२००१ मध्ये अनवाणी पायांच्या महाविद्यालयाने सुरु झालेला नवनिर्माणाचा हा प्रवास आज एका शैक्षणिक समृध्दीच्या प्रवासाकडे परिवर्तीत (रुपांतरीत) होत आहे.

या प्रवासाची सुरुवात मोठी गमतीशीर झाली. टंचाई, तुटवडा, उपेक्षितता आणि त्यातून नाविन्याचा शोध. गरज ही शोधाची जननी असते.. असे म्हणतात.. (Necessity is the mother

of invention) रत्नागिरी येथे एम.ए.ला प्रवेश आणि छात्रभारती विद्यार्थी संघटनेचे काम यातून जिल्ह्याच्या ठिकाणी विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रमासाठी न मिळणारे प्रवेश, बहूजन विद्यार्थ्यांना आर्थिक क्षमतेअभावी सतत अपमान आणि प्रवेशापासून वंचित होण्याचे प्रसंग, त्या विरोधात विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून उभारलेला संघर्ष, मंत्र्यांच्या गाडीला घातलेला घेराव, जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील धरणे, आंदोलने, मोर्चे, बी.एड. आंदोलनातील दोन दिवसाचा तुरुंग. हा सततचा संघर्ष मात्र प्रस्थापित यंत्रणेवर कोणताच परिणाम करत नव्हता. बहुजनांना शिक्षणाचा अधिकारच नाही हिच मानसिकता होती. या सततच्या अपमानाने मनात पर्याय उभारण्याचे बीज अंकुरले. मनात गीत सतत गुंजत राही..

शापल्या शिळेत प्राण जागवित आला  
पांगळ्या मुठीत जिद्द जखमातून ज्वाला !!  
थांबला ना सुर्य कधी, थांबली न धारा  
आणि धुंद वादळास गोठला किनारा !!

यातूनच एका किनाऱ्याच्या शोधात निघालेले आम्ही.. त्या काळातील उनाडच... वेडे मुसाफीर...

२५ वर्षापुर्वी रत्नागिरी शहर दोन कारणाने ओळखे जात होते. त्यातील पु. ल. देशपांडे यांचा ‘अंतु बर्वा’ ही ओळख, येथील स्वभाव वैशिष्ठ्य आणि काही करमणूकही करणारी. मात्र त्याचवेळी उर्मीला पवार यांचे ‘आयदान’ ही रत्नागिरीच्या जातीयतेच्या भीषण विषमतेची जळजळीत ओळख करून देणारी. तोच अनुभव विद्यार्थी चळवळीत काम करतांना येत होता. रत्नागिरी परिसरातील उच्च शिक्षणाची परिस्थिती अत्यंत भीषण आणि भयावह होती. महाविद्यालयीन शिक्षणासाठी फक्त एकमेव पर्याय आणि तोही अभिजनांच्या कडव्या सनातनी मानसिकतेने घेरलेला. या विरो–धातील विद्यार्थी संघटन आंदोलनाने आम्हालाच तुरुंगवास दिला. हल्ले सोसावे लागले. बदनामी आणि अवहेलना तर सतत होती. आमच्या म्हणण्याची दखलच घेतली जात नव्हती तर आम्हाला हिणवले जात होते.

यांतूनच एक स्वतंत्र पर्याय का होऊ शकणार नाही या इर्षेने मनाचा ठाव घेतला. आणि खिशात दमडी नसतांना एका क्षणी रत्नागिरी शहरात बहुजनांचे महाविद्यालय उभारण्याचे स्वप्न आम्ही रंगवू लागलो.

मुंबई विद्यापीठासोबतही तो ‘टकराव’ सलग दोन वर्षे सुरुच होता. डॉ. भालचंद्र मुणगेकर आमचे कुलगुरु झाले, म्हणूनच नवनिर्माण हे बहुजनांना आणि सर्वसामान्यांना हक्काचे वाटणारे महाविद्यालय आज येथे उभे राहीले.

एकमेव महाविद्यालय असल्याने येथे सभोवतालच्या खेड्या–पाड्यातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशच मिळत नव्हता. आर्टस, कॉमर्स, सायन्स या पारंपारिक अभ्यासक्रमाच्या प्रथमवर्ग प्रवेशासाठी जे फॉर्म विक्रीला होते त्याची रांग पहाटे ३ वाजल्यापासून लागत होती. महाराष्ट्रात छात्रभारती पदाधिकारी म्हणून काम करताना हे विशेष वाटत राही. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा येथे एक एका तालूक्यात २–३ महाविद्यालये आणि कोकणात मात्र महाविद्यालयाचाच पत्ता नाही.

महाविद्यालयात टक्केवारी अधिक असण–ारा विद्यार्थी नको तर गावकुसाबाहेर फेकलेल्या घरातील विद्यार्थी आला पाहिजे ही भूमिका होती. पहिल्या वर्षी या गावकुसाबाहेरील विद्यार्थ्यांच्या कॉलेजला मुलेच यायला तयार



नाहीत. कोणत्याही विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांची मानसिकता असते प्रस्थापित मोठ्या महाविद्यालयात जाण्याची. याचा फटका तर महाविद्यालयाला मान्यता मिळालेल्या पहिल्याच वर्षी जाणवला. मात्र त्यातून आम्ही नव्या क्लूप्त्या शोधू लागलो. पहिल्या २० पावत्या स्टॅपल करत पहिले ॲडमिशन मिळविले.

पैसे असतील तरच महाविद्यालयात प्रवेश मिळतो असा ठाम समज समाजात होता. दुसरा कल होता मुलांना प्राधान्याने उच्च शिक्षण देणे. मुलींना काय करायचे आहे? शिक्षण आणि त्यासाठी पैसा कोठून मोजायचा? समाजातील या समजाच्या प्रश्नांवर आम्ही काम सुरु केले. विद्यार्थ्यांच्या थेट घरात पोहोचण्यासाठी प्रत्यक्ष संपर्काबरोबरच पोस्टकार्ड स्ट्रॅटीजी वापर केला. महाविद्यालयाच्या

प्रवेशाचे पोस्ट कार्ड खेड्या पाड्यातील घरात पोहोचले. यांचे मुलांना पालकांना मोठे अप्रुप वाटे. पोस्ट कार्ड घेऊनच मला ॲडमिशन मिळाले सांगत मुले येत.

तरीही मुलींचा महाविद्यालयीन प्रवेश कल दिसत नव्हता. त्यासाठी 'सावित्रीच्या लेकी आता घरी बसणार नाहीत', मुलींना 'मोफत प्रवेश' कॅम्पेन फार मोठ्या प्रमाणावर राबविले. प्रत्येक शाळा कनिष्ठ महाविद्यालयात नवनिर्माण शिक्षक, स्टाफ पोहोचत होता.

कॉम्प्यूटर सायन्स, आयटी, हॉटेल मॅनेजमेंट या व्यवसायाभिमुख अभ्याक्रमाबाबत तर बहुजन समाजात प्रचंड भिती होती. हे व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम हे फक्त अभिजन, डॉक्टर्स, इंजिनिअर शासकीय कर्मचारी यांच्या मुलांसाठीच आहेत. आपल्या मुलांसाठी हे झेपणारच नाहीत. त्यांच्या प्रवेशाचे डोनेशन कोण भरणार? पालक प्रवेशाच्या अगोदर विचारत किती डोनेशन द्यावी लागेल?

एका प्रसंगाने आम्हाला या वास्तवाचे भान आणले. एफ.वाय. कॉमर्सच्या प्रवेशासाठी एक महिला आपल्या मुलाला घेऊन आली होती. प्रवेशाचा कालावधी संपत आला होता. बहूदा तो अखेरचाच दिवस होता. बिन दरवाजाची पार्टीशन केलेली केबीन बाजूलाच प्राचार्यांची केबीन. ती महिला थेट माझ्याकडेच आली. मी तिला म्हटले. जागा असेल तर मिळेल प्रवेश. प्राचार्यांना भेटा. ती फार अस्वस्थ होती. अगदी काकुळतीला येऊन सांगत होती, काही करून माझ्या लेकराला प्रवेश द्याच. मला तिचे फक्त दोन डोळे दिसत होते. त्या डोळ्यात पराकोटीची अस्वस्थता दिसत होती. मिळेल ॲडमिशन, काळजी करु नका मी तिला सांगत होतो. मात्र तरीही ती प्रचंड अस्वस्थ होती. एका क्षणात तिने बुरख्यातून १०,००० चे बंडल काढून माझ्यापुढे ठेवले, एवढेच आहेत. प्लिज ॲडमिशन द्या. समोर पैशाचे बंडल पाहून पार गोंधळून गेलो. मला काहीच समजत नव्हते. एफ.वाय. कॉमर्सच्या ॲडमिशनला २००२ साली दहा हजार रुपये. एक भीषण वास्तव माझ्या समोर होते. मी त्या बाईंना समजावले, असे पैसे देण्याची काहीच गरज नाही. ते पैसे उचला.. आणि दुसऱ्याच दिवशी आम्ही नवनिर्माणचे कॅम्पेन केले 'नो डोनेशन, नो कॅपीटेशन, थेट ॲडमिशन' या कॅम्पेनने नवनिर्माणला रत्नागिरीच्या ग्रामीण आणि उपेक्षित भागात एक स्थान मिळवून दिले. विद्यार्थी संख्या वाढत गेली आणि वाढतच गेली.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून एक महाविद्यालय. जिल्हा ठिकाण, साहजिकच मक्तेदारी प्रवेशापासून सर्वच घटकात पसरले–ली. नवनिर्माणच्या आगमनाने प्रस्थापितांना वाटत असे आम्ही त्यांच्याशी स्पर्धा करत आहोत. पण आमचे म्हणणे तुमच्याशी स्पर्धाच नाही. कारण मुळ उद्देशातच फरक आहे. नवनिर्माणचा उद्देश महाविद्यालय चालविणे, त्याची प्रचंड भरभराट करणे, मोठ्या इमारती बांधणे, त्यांत अत्यंत अद्यायावत सुविधा देणे, भपकेबाजपणा करत आणि आपल्या फी मोठ्या प्रमाणावर वाढविणे हे नाहीच तर आमचा उद्देश आहे. या परिसरातील एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित रहाता कामा नये. अशा घटकापर्यतं शिक्षण पोहोचविणे गरजेचे आहे. म्हणूनच पारंपारिक अभ्यासक्रमासोबत व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम जोडले. यात कॉम्प्यूटर, आयटी, बँकीग, मॅनेजमेंट जोडले.

जयगड ते पुर्णगड रत्नागिरी तालुक्यातील किनारपट्टी भागाचा विचार करताना जाणवत राही या परिसरातील सर्वच गावांतील अनेकजण मुंबई–पूणे हॉटेलमध्ये पोऱ्या ते आचारी असे काम करणारे आहेत. काही घरांतून दोन दोन पिढ्या या क्षेत्रात आहेत. या कष्ट करणाऱ्या, राबणाऱ्या हातांना मुलभूत कौशल्य असणाऱ्या हातांना अद्ययावत कौशल्य दिले तर.. हा विचार.. तेथून हॉटेल मॅनेजमेंटसारखा अभ्यासक्रम सुरु करत या व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमात मोफत प्रवेशाचा फंडा राबविला. आज या माध्यमातून मुंबई–पुणे, गोवा, हैद्राबाद, सिंगापूर, मलेशिया, मालदिव, फ्लाईट किचन, क्रूज येथे शेकडो विद्यार्थी उच्च पदावर काम करत आहेत.

**मुलींचा शिक्षणातील टक्का वाढविला**

मुलींना मोफत प्रवेश, सावित्रीच्या लेकी आता घरी बसणार नाही आदी उपक्रम राबवित असतांना रत्नागिरी परिसरातील मुस्लिम मुलींचा शिक्षणात टक्का वाढविला पाहिजे यावर विशेष भर दिला. यासाठी शांततेचे नोबेल पारितोषिक विजेत्या आणि मुलींच्या शिक्षणासाठी जागतिक पातळीवर काम करणाऱ्या मलाला युसुफझाईच्या नावे मुलींसाठी विशेष स्कॉलरशीप सुरु केली. २५ ते ३० टक्के मुस्लिम समाज असणाऱ्या या भागातील मुस्लिम मुलींच्या शिक्षणाचा विचार प्रथम नवनिर्माणने केला. बुरख्याआडच्या मुलींना उच्च शिक्षणात आणण्याचे प्राधान्य हा नवनिर्माणचा ध्यास होता. आज अनेक उच्च शिक्षित मुस्लिम मुली विविध क्षेत्रात उच्च पदावर पोहोचल्या आहेत.

उच्चभ्रू प्रवेशांची मक्तेदारी मोडीत काढायची आणि सर्वसामन्यांना या उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणायचे, हॉटेल मॅनेजमेंटनंतर हा प्रयोग कॉम्प्यूटर, आयटी, बँकीग इन्श्यूरन्स यात राबविला. हाच प्रयोग सीबीएसई शाळा प्रकल्प राबविताना केला. यातील एक कथा. रत्नागिरीत पहिली सीबीएसई शाळा नवनिर्माणने सुरु केली. कमीत कमी फीमध्ये दिल्ली बोर्डाची शाळा अद्यावत शिक्षण उपलब्ध करून द्यावे असा संस्थेचा उद्देश. याला फार उत्तम प्रतिसाद

मिळाला. डॉक्टर, उद्योजक, व्यापारी, वकील या सामाजातील उच्चभ्रू सामाजाची मुले नवनिर्माणला अधिक येऊ लागली. यावेळी काही पालक माझ्याकडे प्रस्ताव घेऊन आले. शाळेने मुलांची फी वाढवावी, दुप्पट करावी असा प्रस्ताव होता. मला आश्चर्य वाटले मुलांची फी वाढवा असे पालकांनीच म्हणावे, मी त्यांच्याशी बोललो. त्यांचे बोलणे ऐकून मला मोठा धक्का बसला. या ४-५ पालकांनी मला सांगितले, शाळेची फी दुप्पट करा. त्यामुळे विशिष्ट उत्पन्न आणि स्टेटस असणाऱ्या पालकांच्या मुलांनाच येथे प्रवेश मिळेल. त्यावर माझा त्यांना प्रश्न होता. असे का तुम्हाला वाटते? त्यावर त्यांचे उत्तर होते. आमच्या मुलांसोबत रिक्षा चालक, आचारी यांचा मुलगा शिक्षण घेणार हे योग्य संस्कार करणारे नाही. माझा संयम राखत मी अत्यंत शांतपणे त्यांना सांगितले, आपल्या सभोवतालच्या समाजापासून तुम्ही मुलांना दूर ठेवू नका. त्यांना सभोवतालचा समाज माहित पाहिजे, हे त्यांचे मुख्य शिक्षण आहे. या शाळेत सर्वस्तरातील मुले येणार, आपणाला जमत नसेल तर आपण जाऊ शकता. पुन्हा असे धाडस करु नका.

**वैचारिक प्रबोधन चळवळ**

रत्नागिरी शहरात आणि परिसरात शैक्षणिक संस्थात पुरोगामी आणि वैज्ञानिक वैचारिक प्रवाहाची उभारणी करण्याचे सुरुवात नवनिर्माणने केली. छत्रपती शाहू महाराज, आण्णाभाऊ साठे, बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई, महात्मा फुले यांच्या जयंती, पुण्यतिथी या माध्यमातून अनेक उपक्रम सुरु केले. आज सर्वच महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांनी तो आदर्श घेतला आहे. अंधश्रध्दा निमुर्लन चळवळ, लोकशाही पुरोगामी विज्ञाननिष्ठ आणि विवेकवाद जोपासणारी चळवळ जोपासतांना तसे विषय घेत व्याख्याने, अभ्यास मंडळ, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, अभिवाचन स्पर्धा, वाचस्पती स्पर्धा आयोजित करणे आणि वैचारिक उत्थापनांचे केंद्र नवनिर्माणने उभे करण्याचा प्रयत्न केला आहे.

संस्थेत पुर्णतः सेक्यूलर वातावरण आहे. विविध कार्यक्रम निमित्ताने निखील वाघळे, अनिल अवचट, श्रीमंत कोकाटे, न्या. कोळसे पाटील, साहित्य संमेलन माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस, भारत सासणे, दिनकर गांगल, नितीन वैद्य, डॉ. गणेश देवी, डॉ. भालचंद्र मुणगेकर, डॉ. झहीर काझी, पुष्पा भावे, अरुण साधू, कुमार केतकर, जी. जी. पारिख, भाई वैद्य, बाबा आढाव, आण्णा हजारे अशा मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले आहे.

चौकटीच्या बाहेर जाऊन ग्रामीण भागातील मुलांसाठी शिक्षणाची सुविधा यातूनच संगमेश्वरसारख्या अत्यंत दुर्गम भागात महाविद्यालय उघडण्याचे धाडस केले. येथील सह्याद्रिची शृंगारपूर-नायरी, किंजळेवाशी, कडवई-चिखली, कुंभारखाणी, खोरी आणि मेढे, मांजरे, उक्षी, खाडी पट्टा दुर्गम भागात मुलींना शिक्षणाची संधीच नव्हती. तेथे नर्सिंग महाविद्यालय सुरु करत येथील मुलींना उच्च शिक्षणाची संधी दिली. राज्याच्या २७ जिल्ह्यातील मुली. आज शिक्षण घेत आहेत. स्थानिक मुलींसाठी जनजागरण अवेअरनेस अभियान राबविले. आजही माझी तुकडी, माझा शिक्षक यासाठी मुलांना त्यांच्या आवड आणि क्षमतेचा विचार न करता चुकीच्या शाखांत ढकलले जाते. हे येथील मुलींचे मोठे नुकसान करत आहेत. येथे गोकुळ अनाथालय आणि घोरपी वाड्यातील पहिली मुलगी नर्सिंग शिक्षण घेते याचा मोठा आनंद आहे.

अनवाणी पायांना आम्ही अत्यंत मजबूत बौध्दिक आवरणे शिक्षणाच्या माध्यमातून देण्याचा हा प्रयत्न आहे. यासाठी दोडामार्ग, संगमेश्वर, रत्नागिरी येथे हॉटेल मॅनेजमेंट सुरु केली. संगमेश्वरमध्ये नर्सिंग तर आता रत्नागिरी येथे फिजिओथेरपी महाविद्यालय सुरु केले आहे.

यातील वैचारिक भूमिका आहे, या अनवाणी पायांना सबळ करण्याचा. त्यांच्या अनवाणीपणाचे, दारिद्र्याचे उदात्तीकरण करण्यास आम्ही नेहमीच विरोध केला तर या परिस्थितीवर मात करत स्वाभीमानाने जगण्याची उमेद आणि जीद्द देण्याचे कार्य नवनिर्माण सतत करत रहाते.

अनवाणी पायांची 'अस्मिता घाणेकर' मुंबई विद्यापीठात धावण्यात गोल्ड मेडल मिळवते, रायगड प्रथम सर करते. फी भरु न शकणारी, रात्री जेवण मिळू शकले नाही म्हणून महाविद्यालयात मुर्छा येऊन पडलेली 'आफ्रीन मुल्ला' आज डॉक्टर होते. प्रस्थापित महाविद्यालयाने पैसे नाही म्हणून प्रवेश नाकारलेली 'प्रियदर्शनी' 'शिव छत्रपती पुरस्कार' विजेती होते हेच नवनिर्माणचे 'आयडॉल' आहेत.

आज संस्थेचे रत्नागिरी संगमेश्वर दोडामार्ग येथे भव्य कॅम्पस आहेत. ६५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आजपर्यत २२००० पेक्षा अधिक विद्यार्थी बाहेर पडून उत्तम ठिकाणी मोठ्या पदावर देश परदेशात काम करत आहेत. अद्ययावत कॉम्प्यूटर लॅब अन्य लॅबरोटरीज, रोबोटीक आदी अद्ययावत तंत्रज्ञान हे वैशिष्ठ्य आहे.

पारंपारिक शिक्षण पध्दती आणि कोर्स यांच्या मर्यादा सांभाळत अद्यावत शिक्षण पध्दती आणि कोर्सेस जोडले जात आहेत. सतत नाविन्याचा शोध हे नवनिर्माणचे वैशिष्ठ्य आहे. त्यामुळे शिक्षण, स्पर्धा परिक्षा, स्पोर्टस, कल्चरल या सर्वच क्षेत्रात नवनिर्माणचे विद्यार्थी आघाडीवर आहेत.

नव्याने फिजीओथेरपी कोर्स रौप्य महोत्सवात सुरु होत आहे. या निमित्ताने संस्थेच्या नव्या पर्वास सुरुवात होत आहे. एआयचे मोठे आव्हान आहे. ज्याचे भान आजच्या न्यू एज्यूकेशन पॉलीसीला

ठेवणे गरजेचे आहे. येत्या दशकात सध्याच्या बहुतांश शिक्षण पध्दती उध्वस्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कल्पानाशक्तीच्या पलीकडचे नवे अभ्यासक्रम आणि पध्दती या क्षेत्रासमोरील आव्हाने आहेत. यासाठी या क्षेत्रात सतत ब्रेन स्टॉर्मींग सुरु रहाणे ठेवणे काळाची गरज आहे. शिक्षक आणि विद्यार्थी यांना ज्ञानाच्या नवनवीन उर्जाकेंद्र सतत देत रहाणे हे मोठे आव्हान आहे.

नवी आव्हाने आहेत. एका बाजूला कोकणची औद्यागिक क्रांती, प्रगती याची स्वप्ने आम्ही पहात आहोत आणि ही स्वप्ने ज्या मनात अंकुरत आहेत, ती आज १० वी, १२ वी झालेली मुले मात्र मोठ्या प्रमाणावर स्थलांतरीत होत आहेत. मायग्रेशनचा प्रश्न. येथे घरे, वाड्या, गाव ओस पडत आहेत. मुंबईच्या टॉवरमध्ये माझ्या सावित्रीच्या लेकी घरकाम शोधण्यास जातात ती वेदना असह्य होत आहे. काय नक्की चुकत आहे आणि यावरील मार्ग काय हा शोध घेणे सुरु आहे.

रौप्य महोत्सवी वर्ष आजपर्यंत २२ हजार विद्यार्थी या शिक्षण संस्थेतून शिक्षण घेऊन बाहेर विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. शिक्षण संस्थेच्या उभारणीत माजी अध्यक्ष आ. कपिल पाटील यांचे मोठे योगदान आहे. तसेच संस्थेचे कार्यवाह आर्किटेक्ट परेश पाडगावकर यांनी तिनही कॅम्पसचा प्रत्येक आराखडा तयार केला आहे. अत्यंत सुंदर असे आर्किटेक्चरल रूप देत तो साकारला आहे. या उभारणीत त्यांचे मोठे योगदान आहे. संस्था अध्यक्ष अशोक बेलसरे सर, उपाध्यक्ष डॉ. अलिमियाँ परकार, शरद कदम, वर्षा कांबळे, मृत्यूंजय खातू, खालीद दलवाई यांचे सहकार्य आणि योगदान संस्थेचा आधार आहे. माझी पत्नी सीमा ही संस्थेच्या शाळा विभागाची जबाबदारी अत्यंत कुशलतेने सांभाळत आहे. संस्था कार्यातील तिचा आधार विशेष उल्लेखनीय आहे. संस्थेचे माजी कार्यवाह कै. मोहन खातू, कै. डॉ. बालाजी कामत, कै. प्रा. पांडूरंग येजरे, संस्था अध्यक्ष कै. भास्कर शेट्ये यांचे संस्थेच्या वाटचालीतील योगदान आणि मार्गदर्शन फार मोलाचे आणि संस्थेच्या प्रगतीतील एक महत्वाचा टप्पा गाठणारे आहे.

संस्थेच्या प्रगतितील अत्यंत महत्वाचे योगदान असणारा शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्ग त्यांच्या अभूतपुर्व योगदानातून आणि परिश्रमातून संस्था आज या टप्प्यावर उभी आहे. प्राचार्या डॉ. आशा जगदाळे (एस.पी. हेगशेट्ये कॉलेज ऑफ आर्टस, कामर्स, सायन्स), प्राचार्या डॉ. संजना आंब्रे–चव्हाण, (नवनिर्माण कॉलेज, संगमेश्वर), प्राचार्या डॉ. प्रज्ञा कदम, (नवनिर्माण नर्सिंग कॉलेज, संगमेश्वर), प्राचार्य अरविंद पाटील, (नवनर्माण हाय.), प्राचार्य डॉ. सुभाष सावंत (हळबे कॉलेज, दोडामार्ग), माजी प्राचार्या नजमा मुजावर आणि त्यांची टीम यांचे योगदान मोठे आहे.

संगमेश्वर महाविद्यालय कमिटी, दोडामार्ग येथील आमचे मार्गदर्शक ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक सुर्यकांत परमेकर, हितचिंतक वैभव नाईक आणि सहकारी, मा. खासदार सुनिल तटकरे, उद्योग मंत्री ना. उदय सामंत, आ. राजन साळवी, शिक्षणमंत्री ना. केसरकर, आ. राजन तेली, पर्यावरण तज्ज्ञ राजेंद्र केरकर, डॉ. हेमंत पेडणेकर, आ. शेखर निकम, डॉ. तानाजीराव चोरगे या मान्यवरांचे नवनिर्माण शिक्षण संस्थेला लाभणारे प्रेम, सहकार्य आणि मार्गदर्शन अत्यंत मोलाचे आणि आपलेपणाचे आहे. या निमित्ताने त्यांचे विशेष आभार व्यक्त करतो.

मागे वळून पहातांना समाधान आहे परंतू खूप मोठा पल्ला पार करणे बाकी आहे. यावेळी फैज अहमद फैज यांच्या शेरची आठवण येते.....

**यह दाग–दाग उजाला, यह शब गजीदा सहर**
**वो इंतजार था जिसका यह वो सहर तो नही**
**यह वो सहर तो नही जिसकी आरजू लेकर**
**चले थे यार कि मिल जाएगी कही न कही!!**

******


दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!!





Navnirman Shikshan Sanstha
S.P.HEGSHETYE
college of Hotel Management & Hospitality Studies
(Affiliated to University of Mumbai & recognized by Gov. of Maharashtra)
S. P. HEGSHETYE
नवनिर्माण शिक्षण संस्था
शिक्षणाच्या हक्कासाठी
100%
JOB PLACEMENT
Best Hotel Management College in Ratnagiri
Admissions Open for Hotel Management
AVAILABLE COURSES
• B.SC. Hospitality Studies
• Autonomous Courses in Hotel Management
• PMKVY Courses in Hotel Management
APPLY NOW!
S.M. Joshi Vidyaniketan, P-63, MIDC, Mirjole, Ratnagiri-415639
7719851025
navnirmancollege@rediffmail.com
navnirmancollegehm@gmail.com
www.navnirmancollege.in

# 'वाशिष्ठी डेअरी'ची यशस्वी वाटचाल!




**कोकणात या अगोदर काही लोकांनी दुग्धप्रकल्प उभारण्याचा प्रयत्न केला. परंतु विविध कारणांमुळे हे प्रकल्प अल्पावधीतच बंद पडले. सन १९६६ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यात शासकीय दूध योजना सुरू झाली होती. त्यामुळे शेतकऱ्यांना या प्रकल्पाचा मोठा फायदा झाला होता. दरम्यान, काही महिन्यांपूर्वीच जिल्ह्यातील शासकीय दूध योजना सुद्धा बंद पडली आणि या परिस्थितीत हवालदील झालेल्या शेतकऱ्यांना वाशिष्ठी मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा. लि. या प्रकल्पामुळे मोठा दिलासा मिळाला. इथल्या शेतकऱ्यांच्या दुधाला योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने वाशिष्ठी डेअरीचा प्रकल्प सुरू होण्यापूर्वीच डेअरीच्या माध्यमातून दुधाचे संकलन सुरू करून शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला दर १० दिवसांनी त्यांच्या खात्यात जमा करून दिला गेला. त्यामुळे येथील शेतकऱ्यांनी या प्रकल्पाला भरघोस प्रतिसाद दिला आहे. या पाठबळामुळेच वाशिष्ठी डेअरीच्या दर्जेदार दुधाची ट्रायल यशस्वीपणे घेता आली.**

कोकणात दुग्धव्यवसाय यशस्वी होत नाही, अशी नकारात्मक भावना गेल्या अनेक वर्षांपासून रुजलेली. मात्र याला छेद देत दृष्ट लागावी अशा भव्यदिव्य दुग्धप्रकल्पाची उभारणी करून सातत्यपूर्ण सर्वोत्कृष्ट दर्जेदार उत्पादनांमुळे

अल्पावधीतच ग्राहकांच्या पसंतीस उतरलेला मे. वाशिष्ठी मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा. लि. हा प्रकल्प यशस्वीपणे दमदार वाटचाल करीत आहे. वाशिष्ठी मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा. लि.च्या माध्यमातून शेतकऱ्यांचे मोठे जाळे तयार होत आहे. दुधाला योग्य हमीभाव तर दिला जातोच; पण तोही खात्रीशीर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत असल्याने शेतकऱ्यांचा विश्वास आणि 'वाशिष्ठी' डेअरीकडे त्यांची ओढ वाढत आहे. चिपळूण तालुक्यातील पिंपळी खुर्द येथे उभारण्यात आलेल्या या प्रकल्पाची यशस्वी वाटचाल पाहता हा प्रकल्प भविष्यात संपूर्ण कोकण आणि राज्यातला सर्वोत्कृष्ट, आदर्शवत दुग्धप्रकल्प म्हणून गणला जाईल, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

Washishti DAIRY ™
कणा कणात कोकण

कोकणातील शेतकऱ्यांना आर्थिक समृद्धी मिळवून द्यावी, इथल्या तरुणांना रोजगार उपलब्ध करून द्यावा, या उद्देशाने वाशिष्ठी मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा. लि. हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. प्रति दिन एक लाख लिटर क्षमतेचा




आणि संपूर्णपणे अत्याधुनिक व स्वयंचलित यंत्रणा असलेला हा प्रकल्प तीन एकरमध्ये साकारण्यात आला आहे. हा प्रकल्प उभा करण्याची संकल्पना खऱ्या अर्थाने या प्रकल्पाचे मार्गदर्शक आणि चिपळूण नागरी

सहकारी पतसंस्था, लि. या पतसंस्थेचे संस्थापक–अध्यक्ष मा. सुभाषराव चव्हाण साहेब यांची. सहकाराच्या माध्यमातून कोकणातील शेतकऱ्यांना पतसंस्थेच्या माध्यमातून अर्थपुरवठा करून समृद्ध करण्यासाठी त्यांनी मोठे काम केले आहे. त्यांच्याच हस्ते ७ सप्टेंबर २०२१ रोजी या प्रकल्पाचे भूमिपूजन झाले. ५ फेब्रुवारी २०२३ रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय एकनाथजी शिंदे साहेब यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने तर राज्याचे उद्योगमंत्री आदरणीय उदयजी सामंत साहेब यांच्या हस्ते प्रत्यक्षपणे या प्रकल्पाचे उद्घाटन झाले.

चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेने महाराष्ट्रात एक आदर्श पतसंस्था म्हणून नावलौकीक प्राप्त केला आहे. याचाच पुढचा टप्पा म्हणून वाशिष्ठी डेअरीच्या माध्यमातून कोकणातील शेतकरी व बेरोजगारांना आर्थिक बळ देण्याचे काम पुढील काळात या प्रकल्पातून होणार आहे.

कोकणात या अगोदर काही लोकांनी दुग्धप्रकल्प उभारण्याचा प्रयत्न केला. परंतु विविध कारणांमुळे हे प्रकल्प अल्पावधीतच बंद पडले. सन १९६६ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यात शासकीय दूध योजना सुरू झाली होती. त्यामुळे शेतकऱ्यांना या प्रकल्पाचा मोठा फायदा झाला होता. दरम्यान, काही महिन्यांपूर्वीच जिल्ह्यातील शासकीय दूध योजना सुद्धा बंद पडली आणि या परिस्थितीत हवालदील झालेल्या शेतकऱ्यांना वाशिष्ठी मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा. लि. या प्रकल्पामुळे मोठा दिलासा मिळाला. इथल्या शेतकऱ्यांच्या दुधाला योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने वाशिष्ठी डेअरीचा प्रकल्प सुरू होण्यापूर्वीच डेअरीच्या माध्यमातून दुधाचे संकलन सुरू करून शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला दर १० दिवसांनी त्यांच्या खात्यात जमा करून दिला गेला. त्यामुळे येथील शेतकऱ्यांनी या प्रकल्पाला भरघोस प्रतिसाद दिला आहे. या पाठबळामुळेच वाशिष्ठी डेअरीच्या दर्जेदार दुधाची ट्रायल यशस्वीपणे घेता आली. त्याचबरोबर वाशिष्ठी मिल्क ण्ड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा. लि. या प्रकल्पातून दही, ताक, लस्सी, श्रीखंड, आम्रखंड, पनीर, तूप, सुगंधी दूध, बासुंदी, पेढे या दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादनही बाजारात उपलब्ध झाली आहेत. या प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दुग्धोत्पादनात सक्षम करण्यासाठी त्यांच्या जनावरांकरिता खाद्य, वैद्यकीय सुविधा, दुग्धोत्पादन वाढीसाठी मार्गदर्शन आदी विविध सोयीसुविधा पुरविण्याचेही नियोजन



करण्यात आले आहे.

वाशिष्ठी डेअरीच्या माध्यमातून रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे जाळे तयार होत आहे. सध्या सुमारे पाच हजार शेतकरी या प्रकल्पाशी जोडले गेले आहेत. त्यांच्या माध्यमातून सुमारे ३० ते ३५ लिटर दुधाचा पुरवठा वाशिष्ठी डेअरीला केला जात आहे. वाशिष्ठी डेअरीच्या माध्यमातून मालघर, वेरळ, दस्तुरी–चिंचघरी, आंबडस, पिंपळी खुर्द येथे वाशिष्ठी डेअरीच्या परिसरात, कापसाळ, खेरशेत, शिरगाव, शृंगारतळी आदी ठिकाणी दूध संकलन केंद्रे सुरू करण्यात आल्याने दुधाचा पुरवठा करण्याबाबत शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी दूर झाल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या वेळेचा अपव्यय टळून त्यांना दुधापोटी योग्य हमीभाव मिळत असल्याने शेतकरी सुखावले आहेत.

वाशिष्ठी प्रकल्पात आंतरराष्ट्रीय दर्जाची अत्याधुनिक यंत्रसामग्री वापरण्यात आली आहे. या प्रकल्पाची क्षमता प्रती दिन एक लाख लिटरची आहे. दर्जेदार उत्पादन ग्राहकांपर्यंत पोहोचावे, यासाठी प्रकल्पात

अद्यावत यंत्रसामग्री असलेल्या प्रयोगशाळांचा अंतर्भाव




करण्यात आला आहे. त्यामुळे दूध संकलनापासून पिशवीबंद दूध किंवा दुग्धजन्य पदार्थ ग्राहकांपर्यंत पोहचेपर्यंत अनेक वैज्ञानिक चाचण्या करण्याची यंत्रणा कार्यान्वित आहे. सध्या या प्रकल्पातून सुरुवातीला सुमारे १०० हून अधिक लोकांना रोजगार आणि सुमारे १००० हून अधिक शेतकऱ्यांना या प्रकल्पाच्या माध्यमातून फायदा मिळत आहे. हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर सुमारे २५० कामगारांना आणि सुमारे पाच हजार शेतकऱ्यांना रोजगाराची संधी मिळणार आहे. तसेच छोट्या मोठ्या व्यवसायिकांनाही विविध माध्यमातून या प्रकल्पामुळे आर्थिक बळ मिळेल.

या प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना विविध सोयीसुविधांचा पुरवठाही केला जाणार आहे. त्यामुळे दुग्धोत्पादन वाढीसाठी आम्ही अनेक गोष्टी कार्यान्वित केल्या जात आहेत. शेतकऱ्यांना अल्पदरात पशुखाद्याचा पुरवठा करण्यापासून दूध वाढीसाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजनांपर्यंत शेतकऱ्यांना डेअरीच्या माध्यमातून मार्गदर्शन केले जाणार आहे. वाशिष्ठी डेअरीचे स्वतःचे पशुवैद्यकीय डॉक्टर्स नियुक्त करण्यात आले आहेत. जनावरे विकसित करण्यासाठीचे तंत्रज्ञान व मार्गदर्शन करणारे तज्ज्ञ अशा अनेक सोयीसुविधा पुरविण्याचे धोरणही यापुढे अवलंबले जाणार आहे.

दर्जेदार दूध, दर्जेदार दुग्धजन्य पदार्थ यामुळे अल्पावधीतच वाशिष्ठी डेअरीची उत्पादने ग्राहकांच्या पसंतीस उतरली आहेत. शेतकरी आणि ग्राहक या डेअरीशी जोडला जात आहे. 'कणा कणात कोकण' या ब्रिदवाक्याप्रमाणे सर्वांना आपला वाटणारा हा प्रकल्प भविष्यात कोकणच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रात एक आदर्शवत प्रकल्प म्हणून नावारुपास येत आहे..

*****

With Best Compliments From

EXOTIC FRUITS PVT. LTD

Manufacturer & Exporter of Fruit Pulp & Juices

plot no. G -20, MIDC, Mirjole, Ratnagiri-415 639, Maharashtra, INDIA.

Tel : (02352) 229 653 Fax : (02352) 229 583

email : efl-ratna@exotic-fruit.com

# Social Media -
# समाज माध्यमांचा वापर करताना

डॉ. सुहास वासावे



**सध्या विविध प्रकारचे सोशल मीडिया हे संपर्काचे सुयोग्य, स्वस्त, जलद व अत्यंत परिणामकारक साधन असल्याचे सर्वमान्य आहे. त्यामुळे सध्याच्या काळात सोशल मीडियाचा वापर अधिक होत आहे. त्यामुळे पैसा, वेळ, कागद इ. अनेक संसाधनांची बचत तर हो–तेच पण आपली माहिती जलदगतीने जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवता येते. परंतु, या सोशल मीडियाचा विवेकी पद्धतीने प्रभावी वापर केल्यास समाजाला उपयुक्त ठरेल. हे समजून घेणे गरजेचे आहे. समाज माध्यमे ही संपर्काची प्रभावी माध्यमे असून समाज मन घडविण्याची ताकद या माध्यमांमध्ये आहे. त्यामुळे समाज घडविण्यासाठी याचा वापर समाजातील प्रत्येक घटकांनी विधायक आणि सकारात्मक करणे काळाची गरज आहे.**

आजच्या प्रगत तंत्रज्ञान स्नेही युगात आजची सोशल मीडिया म्हणजे अत्याधुनिक समाजमाध्यमे दिवसेंदिवस अधिकाधिक शक्तीशाली बनत आपल्या आयुष्याचा आणि जगण्याचा एक अविभाज्य घटक बनत चालली आहेत. पोस्टच्या माध्यमातून आशय निर्मिती करून अख्ख्या जगाचं लक्ष आपल्याकडे वेधून घेण्याची ताकद देणारी ही आजची समाज माध्यमे अभिव्यक्ती स्वातंत्र्य बहाल करतात.

समाज माध्यमांचा प्रभावी वापर कसा करावा..?

फेसबुक, ट्विटर , व्हाट्सअप आणि इतर सोशल नेटवर्किंग साईटवर व्यक्ती समूहाने राहत आहे. यात सदस्यांच्या संख्येला मर्यादा नाहीत. प्रत्येक सदस्य हे सारख्या विचारसरणीचे नसता–तच. कारण प्रत्येकाचे वय, शैक्षणिक पात्रता, बौध्दिक क्षमता, आकलनशक्ती निरनिराळी असते. प्रत्येक सदस्य शिक्षित असू शकतो, परंतु सुशिक्षित असेलच असे नाही.

आपल्या राज्यघटनेत १९ (१) (अ) नुसार प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिले आहे. स्वातंत्र्यासह काही मर्यादाही राज्यघटनेत नमूद केल्या आहेत. पण त्याची नेमकी अंमलबजावणी समाज माध्यमांवर होताना दिसत नाही. या माध्यमांना 'माध्यमे' म्हणायचे तर सत्य, अचूकतेसारख्या तत्त्वांचा काही प्रमाणात अभाव आहे. माहितीचा वापर एक शक्ती म्हणून होताना दिसत

आहे. त्यामुळे एकांगी, सनसनाटीपणा, बटबटीतपणा असलेला आशय समाज माध्यमांवर पसरवला जात आहे.

प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात सकारात्मक व नकारात्मक! सकारात्मक गोष्ट शिकायला शिस्त व वेळ लागते, परंतु नकारात्मक गोष्टींसाठी तसं काही नाही. पण साधा आणि थोडासा आपण विचार, तर्क केला तर खरे, खोटे किंवा अफवा यातील फरक लक्षात येतो. समाज माध्यमांवर बरेचसे सदस्य अशा पोस्ट टाकतात की विचार पडतो की या सदस्यांनी आपली अक्कल गहाण ठेवली आहे की काय?

आपल्याला कायदेशीरपणे अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळालेले आहे. परंतु, असे स्वातंत्र्य मिळालं म्हणून त्याचा उपयोग समाजोपयोगी कामासाठी न करता समाजघातक कामासाठी करावा काय? सोशल मीडिया नेमका कसा हाताळावा? त्यातून काय करावं आणि काय टाळावं? हे जर अजूनही कळलेलं नसेल तर आपली गणना कोणत्या कॅटेगरीमध्ये करावी? हा प्रश्न पडतो. वेळेबरोबर काळही



बदलत असतो. जो काळाबरोबर बदलत असतो तोच समाजामध्ये टिकतो. सध्या विविध प्रकारचे सोशल मीडिया हे संपर्काचे सुयोग्य, स्वस्त, जलद व अत्यंत परिणामकारक साधन असल्याचे सर्वमान्य आहे. त्यामुळे सध्याच्या काळात सोशल मीडियाचा वापर अधिक होत आहे. त्यामुळे पैसा, वेळ, कागद इ. अनेक संसाधनांची बचत तर होतेच पण आपली माहिती जलदगतीने जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवता येते. परंतु, या सोशल मीडियाचा विवेकी पद्धतीने प्रभावी वापर केल्यास समाजाला उपयुक्त ठरेल. हे समजून घेणे गरजेचे आहे. समाज माध्यमे ही संपर्काची प्रभावी माध्यमे असून समाज मन घडविण्याची ताकद या माध्यमांमध्ये आहे. त्यामुळे समाज घडविण्यासाठी याचा वापर समाजातील प्रत्येक घटकांनी विधायक आणि सकारात्मक करणे काळाची गरज आहे.

समाज माध्यमांची सुरक्षितता ही समाज माध्यमे हाताळ–ताना त्यांचं रीतसर ज्ञान, आकलन, जबाबदारी, सुरक्षितता आणि नियमावली याविषयी वेळोवेळी अज्ञानही दिसून येत आहे. दैनंदिन जीवनात चार चौघात, मित्र–मंडळीत आपला वावर मुक्त असतो. पण सोशल मीडियावर प्रत्येक क्षण अन् क्षण आपला राग, व्यक्त केलेल्या भावना, दुःख, आनंद, ऑनलाईन गप्पा–टप्पा, जीवन–चर्या, आवडी–निवडी, स्थान–वेळ, स्थिती, ऑनलाईन वर्तन ..ई. सर्वच गोष्टी डिजिटल स्वरूपात लिखित नोंद होतात.. हे विसरू नका. त्यामुळे आपण आत्यंतिक भावनेच्या भरात सोशल मीडियावर व्यक्त केलेल्या गोष्टी आपणांस कायदेशीरपणे अडचणीत आणू शकतात, याच भान मनात असू द्या. कुणाचेही/कशाचेही समर्थन किंवा विरोध व्यक्त करताना आपल्यालाकडे त्याबाबत कायद्याच्या आधारावर टिकणारी माहिती नसेल तर अशा विषयात न पडणे अधिक संयुक्तिक! थोडक्यात कुणाचेही/कशाचेही समर्थन किंवा विरोध हा आंधळेपणाने नको.

आपल्या ग्रुपवरील सुशिक्षित, सुसंस्कृत, विचारवंत, बुद्धिजीवी वेळोवेळी ग्रुपमधील सदस्यांना सूचना देत असतात, विनंती करीत असतात. त्यांचे पालन करण्याचा प्रयत्न करा. आजच्या प्रगत तंत्रज्ञानाच्या काळात वेगवेगळ्या प्रकारचे आपल्या गरजेनुसार आणि व्यवसायिक स्वरूपातील अनेक सोशल मीडिया ॲप्स आ–हेत, त्याचा कसा आणि किती वापर स्वतः साठी किंवा आपल्या व्यवसायासाठी करायचा हे आपल्याचं नियंत्रणात आहे.

आपली व्यक्तीगत आणि सामाजिक प्रतिमा आणि प्रतिभा समाजासमोर सोशल मीडियाच्या माध्यमातून मांडताना विवेकी विचार आपल्या कडे असणे गरजेचे आहे.

सोशल मीडियावरील आजकल प्रतिबंधात्मक सुरक्षितता वेळीच समजून घेतली तर, पुढील अनावश्यक मानसिक त्रासाप–ासून आपण वाचू शकतो. तरुणांनी समाज माध्यमांच्या मदतीने करिअर, शिक्षण, व्यक्तीमत्व विकास यासारख्या क्षेत्रांचा अभ्यास करावा. स्वत:च्या प्रगतीसाठी समाज माध्यमांचा वापर केल्यास स्वतःची व त्याचबरोबर समाजाची प्रगती होईल. त्यांना नवनवीन संधी उपलब्ध होतील, ह्यात शंका नाही. तसेच सोशल मीडियाचा काळजीपूर्वक वापर आपल जगणं समृद्ध करेल.

******

Navnirman Shikshan Sanstha's

नवनिर्माण शिक्षण संस्था

शिक्षणाच्या हक्कासाठी

A/P : Lovale, Sangameshwar,
Dist., Ratnagiri,

**Institute Code - 9179**



# NAVNIRMAN COLLEGE OF NURSING

# B.SC. NURSING

## 2024-25

**ADMISSION OPEN**

**Hurry up !!!**

## Limited
## Seats Available

**Last Date : 15 Nov. 2024**

**Eligibility**

12th Pass
PCB Marks : 135 (Open Cast)
120 (Resreserved Cast)

MH-CET Nursing 2023
(No need for a percentage)

+ Hostel & Transport Facility Available
+ Govt. Scholarship, MUHS Scheme,
+ Education Loan Available

**Contact No.** : 02354 299196 / 9096134712 **Website** : navnirmanedu.org




S. P. HEGSHETYE
Navnirman Shikshan Sanstha
S.P.HEGSHETYE
college of Hotel Management & Hospitality Studies
(Affiliated to University of Mumbai & recognized by Gov. of Maharashtra)
नवनिर्माण शिक्षण संस्था
100%
JOB PLACEMENT
Best Hotel Management College in Ratnagiri
Admissions Open for Hotel Management
AVAILABLE COURSES
• B.SC. Hospitality Studies
• Autonomous Courses in Hotel Management
• PMKVY Courses in Hotel Management
APPLY NOW!
S.M. Joshi Vidyaniketan, P-63, MIDC, Mirjole, Ratnagiri-415639
7719851025
navnirmancollege@rediffmail.com
navnirmancollegehm@gmail.com
www.navnirmancollege.in



दिवाळीचा
आनंद वाढवा..
वाशिष्ठी डेअरी
प्रॉडक्टस् सोबत !
आमच्या सर्व
ग्राहक व हितचिंतकांना
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा!
SHRIKHAND
AMRAKHAND
Ghee
निर्भेळ,
पौष्टिक व
चविष्ट...
दूध | दही | लस्सी | श्रीखंड | आम्रखंड | बासुंदी | तूप | ताक
फ्लेव्हर्स मिल्क | पनीर | पेढा | खवा मोदक
Washishti
DAIRY
कणा कणात कोकण
वाशिष्ठी मिल्क अ‍ॅन्ड मिल्क
प्रॉडक्टस् प्रा. लि.,
पिंपळी खुर्द,
काळकाई मंदिरा समोर,
ता. चिपळूण,
जि. रत्नागिरी.
90 89 89 97 97
80 10 87 88 89
SQUARE ADVERTISING : 8999348694


Navnirman Shikshan Sanstha's
S M JOSHI COLLEGE
OF PHYSIOTHERAPY (BPTH)
Abhijit Hegshetye
Founder & Chairman
Navnirman Shikshan Sanstha
रौप्य महोत्सव
२५
BPTH
Bachelor of
Physiotherapy
For Admission Contact
7020905726 / 9082686405
S. M. JOSHI VIDYANIKETAN, PLOT NO. P-63, MIDC, TAL., DIST. RATNAGIRI - 415639. E-mail : nsssmjpt@gmail.com


Nobody knows Mango better than us
DESAI Bandhu Ambewale
AMAR
Experience the
real Taste of
Ratnagiri
Alphonso Mango
१९३२ पासून सेवेत
देसाई बंधू
आंबेवाले
पावस पुणे
High Fibre Contents
No Preservatives & Additives
Product of India
ISO 9001 & ISO 22000 Certified
At & Post Pawas, Dist Ratnagiri- 415616
02352- 237007 | +91 7499836043
desaiproducts@gmail.com
www.desaiproducts.in


फिनोलेक्स
पाईप्स & फिटिंग्ज
शुभ दीपावली!
तुमचं जीवन उजळू दे आणि समृद्धीचा प्रवाह चालत राहू दे.
FinOlex CPVC
finolexpipes.com
1800 200 3466